
# रेशमी कवडसे

मधुरिमा

डबली



# रेशमी कवडसे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# रेशमी कवडसे

(कथासंग्रह)

लेखिका

## मधुरिमा मिंलिंद डबली

# रेशमी कवडसे (कथासंग्रह)

लेखिका: मधुरिमा मिलिंद डबली

ईमेल: madhumilind@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.

**प्रकाशन : २२ ऑगस्ट २०२० (श्रीगणेश चतुर्थी)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे-



# सौ. मधुरिमा मिंलिंद डबली

जन्म- अमरावती, महाराष्ट्र

वास्तव्य- कॅन्सस राज्य, अमेरिका

नागपूर विद्यापीठातून M. Sc. ची पदवी घेतली. १९९७ पासून अमेरिकेत वास्तव्य.

कथा आणि काव्य लेखनाची आवड. वृत्तपत्रे व मासिकांमधे कथा व कविता प्रसिद्ध.

त्यांचे प्रसिद्ध होणारे हे पहिलेच पुस्तक असून आंतरजालावर त्यांनी लिहिलेल्या काही कथांचे संकलन आहे

# अर्पणपत्रिका

माझी पहिली शिक्षिका आणि पहिली मैत्रीण

होणाऱ्या माझ्या आईच्या स्मृतींना

हे पहिलेवहिले पुस्तक अर्पण...

# मनोगत

‘रेशमी कवडसे’हा माझा पहिलावहिला कथासंग्रह वाचकांच्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. या सर्व कथा यापूर्वी मी’मायबोली’या संकेतस्थळावर लिहिल्या होत्या. त्या कथांचे संकलन पुस्तकरूपाने करण्याची कल्पना माझे पती श्री. मिलिंद डबली यांनी फार पूर्वीच मांडली होती. दोन्ही भगिनी भाग्यश्री परांजपे व स्नेहा बावचकर यांनीही ती लगेच उचलून धरली होती. काही ना काही कारणाने विलंब होत गेला. पण शेवटी हा संकल्प पूर्ण झाला.

आपल्या सर्वांच्या आयुष्यात नात्यांना फार महत्व आहे. काही हळुवार, तर काही गुंतागुंतीची अशी ही नाती आपले आयुष्य घडवण्यात फार मोलाची ठरतात. यातल्याच काही रेशमी नात्यांची वीण गुंफण्याचा प्रयत्न मी या कथांमधून केलेला आहे. खिडकीच्या छोट्याशाच फटीतून डोकावणारा कोवळया उन्हाचा कवडसा जसा अंधारी खोली उजळून टाकतो, तसे आपल्या जीवनातली ही

लोभस नाती आयुष्य उजळत असतात. हे नात्यांचे रेशीमस्पर्शी कवडसे वाचकांना आवडतील ही आशा आहे.

या पुस्तक प्रकाशनात ई-साहित्य चे श्री. सुनीळ सामंत यांचे फार मोठे योगदान आहे. प्रत्येक वेळी इ-मेल्सला ताबडतोब उत्तर देणे तसेच या सर्व प्रक्रियेत सर्वस्वी नवीन असलेल्या मला वेळोवेळी सविस्तर मार्गदर्शन करणे या गोष्टींचा खरोखर फार उपयोग झाला. त्यांचे तसेच ई-साहित्य च्या सर्व टीमचे अगदी मनापासून आभार.

-सौ. मधुरिमा मिलिंद डबली

# कथा-अनुक्रम

बंदिनी

अनुभूती

हक्क

मुक्ता

रेशीमधागे

आधार

नाती

बेरीज वजाबाकी

चांदणवेल

निर्णय

# बंदिनी

वरच्या मजल्याच्या खिडकीतून रेवतीने खाली एक नजर टाकली. सगळीकडे नोकरमाणसांची गडबड उडालेली दिसत होती. सत्यनारायणाची जय्यत तयारी सुरू होती. सुगंधी अत्तराचा, फुलांचा अन सुग्रास अन्नाचा वास कसा एकात एक मिसळून गेला होता. हातात केळीचे खांब, शेवंतीचे हारे घेऊन गड्यांची लगबग चालली होती.

खिडकीपासून दूर होऊन रेवती आपल्या भल्यामोठ्या कपाटाकडे गेली. ते कपाट उघडताना जुन्या सागवानी लाकडाचा किंचितसा करकर आवाज झाला. त्या आवाजाने का कोण जाणे, तिला जरा शहारल्यासारखं झालं.

‘एकच दिवस झाला या घरी येऊन आपल्याला. खरंतर या वाड्याची, इथल्या साऱ्या वैभवाची मालकीण आहोत आपण. पण

कालपासून काहीतरी रुखरुख वाटतेय मनाला. काय ते सांगता नाही येत...’

अंतरीचे सारे उदास विचार तिनं झटकून टाकले. ‘लग्नाला एकच दिवस तर झालाय आपल्या. कालच्या दगदगीनं, सीमान्तपूजनाच्या जागरणानं थकून गेलोत आपण. म्हणून ही हुरहुर वाटतेय. दुसरं काही नाही. लवकर तयार व्हायला हवं आता.’

सासूबाईंनी कालच तिचं म्हणून सांगितलेल्या त्या कपाटात तिनं एक नजर फ़िरवली. तिच्या दोन्ही सूटकेसेस मधले कपडे रात्रीच सत्यभामेनं नीट आत लावून ठेवले होते. सासर माहेर दोन्ही सधन असल्याचा ते सारे कपडे जणू पुरावाच देत होते. त्यातल्या सलवार कमीजच्या घड्यांकडे बघून तिच्या मुद्रेवर एक हलकीच हास्यरेखा उमटली.

‘या वाड्यात हे कधी घालणं शक्यच नाहीय. इथलं सारं वैभवी खरं, पण अगदी जुन्या पद्धतीचं. इथल्या सुना गर्भरेशमी जरीच्या साड्यांमधेच वावरणार सतत.’तिच्या मनात आलं.

हलक्याशा टकटकीनं तिची तंद्री भंगली. दार हळूच ढकलून सासूबाई आत आल्या.'अजून तयार नाही झालीस बाळ?'

त्यांच्या चेहेऱ्यावर स्मित होतं. गर्द जांभळया शालूत त्या विलक्षण रेखीव दिसत होत्या. इतक्या की'आज आपल्यापेक्षा लोक कदाचित ह्यांच्याकडेच बघतील' असा गमतीशीर विचार रेवतीच्या मनात चमकून गेला.

हातातल्या पैठणीची घडी त्यांनी उलगडली, अन रेवती भान हरपून बघतच राहिली. फ़िकट गुलाबी रंगाचं, चंदेरी बुट्ट्यांनी सजलेलं ते महावस्त्र खरंच फार सुंदर होतं.

'बघ, आवडेल का तुला ही नेसायला? तुझ्या मनानं हं. नाहीतर तुझा शालू नेसणार असशील तरी चालेल.'

'आवडेल मला आई. खरंच फार सुरेख रंग आहे हा...'

रेवतीचं वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच सत्यभामा एक सुबक कोरीव काम केलेली मोठी पेटी घेऊन आली. हातातलं मखमली

कापड तिनं हलकेच पलंगावर अंथरलं अन अदबीने दार ओढून ती बाहेर गेली.

पेटीतले दागिने काढून उर्मिलाबाई- रेवतीच्या सासूबाई त्या मखमलीवर एकेक करून ठेवू लागल्या.'बघ तुला काय काय घालावंसं वाटतंय या पैठणीवर...'

त्या अलंकारांकडे बघताना रेवती अगदी विचारमग्न झाली.

'खरंच, आईबाबांची एकुलती एक मुलगी आपण. बाबाही मोठ्या हुद्यावर. लग्न त्यांच्या परीने अगदी उत्तम केलं त्यांनी. पण या वाड्यातल्या श्रीमंतीची कल्पनाच नाही यायची कोणाला. आपण नुसतेच सधन, पण हे लोक खरे गर्भश्रीमंत...'

ते सारे दागिने बघून झाले, तशी अगदी आर्जवानं ती म्हणाली, 'आई, खरं सांगायचं तर लग्नात घातलेल्या दागिन्यांचंच ओझं होतंय मला. त्यापेक्षा असं करू का? मी या पैठणीवर सगळे मोत्यांचेच दागिने घालू का? हलकंही वाटेल मला, अन छानही दिसेल.'

‘पण... बरं, तुला आवडेल तसं.’ जराशा साशंकतेनंच उर्मिलाबाई म्हणाल्या.

मात्र, रेवती सारा जामानिमा करून आली, अन त्यांच्या मनातल्या साऱ्या शंका पार नाहीशा झाल्या.

त्या साडीच्या गुलाबी रंगावर मोत्यांचे दागिने खूपच खुलून दिसत होते. नाकातली नथ त्या सगळ्या शृंगाराला एक वेगळाच उठाव आणीत होती.

समाधानानं तिच्याकडे एक दृष्टीक्षेप टाकून उर्मिलाबाईंनी सत्यभामेनं आणून दिलेला चमेलीचा गजरा तिच्या केसांत माळला, अन त्या जाण्यासाठी उठणार... तोच रेवतीचं लक्ष त्या पेटीतल्या दोन सुवर्णसाखळ्यांवर गेलं.

‘हा कसला दागिना, आई?’नवलानं तिनं प्रश्न केला.

‘त्या पायातल्या साखळ्या आहेत बाळ. आपल्या घरात फार पूर्वीपासून चालत आलेल्या. पण त्या कोणीच फारशा वापरलेल्या नाहीत.’

‘असं का आई?’

‘अं... म्हणजे काय आहे की... रेवती, सोनं पायात घालू नये म्हणतात ना. लक्ष्मीचा अपमान होतो तो. फ़क्त राजघराण्यातल्या व्यक्तींनी, किंवा अतिशय भाग्यवान व्यक्तींनीच घालावं म्हणतात ग...’

रेवतीचं कुतुहल आता चांगलंच जागृत झालं होतं. पण उर्मिलाबाईंनी भर्रकन विषय आवरता घेतला. त्या बाबतीत बोलायला जरा नाखुशच दिसत होत्या त्या.

तोच तयार होऊन माधवही खोलीत आला, अन त्यानं सांगितलं,’गुरुजी वाट बघताहेत. चला लवकर.’

रेवतीकडे बघून तो क्षणभर थबकला अन मग पसंतीची मान डोलावून बाहेर गेला.

दोघी सासवासुना घाईनं उठल्याच.

जिना उतरून तिघं खाली येतात ना येतात तोच बाबासाहेब, म्हणजे रेवतीचे सासरे लगबगीनं सामोरे आले. ‘किती उशीर? गुरुजी केव्हाचे खोळंबले आहेत.’

त्यांच्या सुरात नाराजी होती. उर्मिलाबाई काहीतरी उत्तर द्यायच्या बेतात होत्या, तोच बाबासाहेबांची नजर रेवतीवर गेली. त्यांच्या नजरेतही तीव्र नाखुशी उमटलेली दिसली तिला. एक क्षणभर आपलं काय चुकलं हे तिला कळेचना.

‘अन हे काय? अंगावर दागिने का नाहीत सूनबाईंच्या?’

‘अहो, कालपासून अवजड अलंकार घालूनच वावरतेय. म्हणून आज तिला वाटलं...’

उर्मिलाबाईंचं वाक्य पूर्ण होण्याच्या आधीच बाबासाहेब उसळले,’तिला काहीही का वाटेना- तुम्ही या घरच्या जाणत्या, तुम्हाला अक्कल नको?’

संताप अन अपमानानं उर्मिलाबाईंचा चेहरा पुरता विवर्ण झाला. पण दुसऱ्याच क्षणी खालचा ओठ घट्ट दाबून त्यांनी रेवतीचा हात धरला.

‘चल जा बाळ. सत्यभामेकडून पेटी घे अन दागिने घालून ये सारे.’

इतका वेळ सारं जणू स्वप्नात घडतंय असं वाटणाऱ्या रेवतीला भान आलं. तिच्या डोळयात रागाची एक लहर तरळली. झटक्यानंच तिनं माधवकडे पाहिलं. त्याचा चेहेरा अगदी निर्विकार होता. या प्रसंगी तो आपली बाजू घेईल असं रेवतीला फार फार वाटलं होतं. पण त्याच्या दगडी मुद्रेकडे बघून ती थक्कच झाली.

वर येऊन सारे दागिने तिनं यांत्रिकपणेच अंगावर चढवून घेतले. पूजेला बसल्यावरही तिचं कुठेच लक्ष नव्हतं.

भल्यामोठ्या आकडी मिशा अन हातात चांदीच्या मुठीची काठी अशा थाटात बाबासाहेब समारंभात वावरत होते. मधूनच डोळयांच्या कोपऱ्यातून रेवती त्यांच्याकडे बघत होती.

‘ही काय पद्धत झाली बायकोशी वागायची? अन सासूबाई बिचाऱ्या एक शब्द बोलल्या नाहीत.’ तिच्या मनात आलं.

रात्री माधव खोलीत आल्यावरही ती रुष्टच होती. तिच्या मुद्रेकडे बघून तो उलट गंभीर झाला.

‘रागावलीस ना रेवा? पण बाबांचा स्वभाव जरा विक्षिप्त असल्याचं मी बोललो होतो ग तुझ्याजवळ. अन एक महिनाभरच

तर निभवायचंय तुला. मग लंडनच्या घरी आपणच राजाराणी. अगदी तुझ्या मर्जीनं होईल सारं.'

त्या कल्पनेनं ती खुदकन हसून त्याला बिलगली.

सकाळी रेवतीला लवकरच जाग आली. खाली वाड्यात चाललेली धावपळ, लगबग, वरही स्पष्ट ऐकू येत होती. माधवची झोप मोडणार नाही याची खबरदारी घेत ती उठली अन भराभर आंघोळ करून तयारच झाली.

जिना उतरून खालच्या मजल्यावर येताच रेवतीला कुणाचा तरी चढलेला आवाज ऐकू आला. मनात नसतानाही तिची पावलं सासूबाईंच्या खोलीशी रेंगाळली. हा बाबासाहेबांचाच आवाज होता. शंकाच नको.

मधूनच उर्मिलाबाईंचा दबलेला आवाज अन त्यांचे हुंदके ऐकू येत होते. रेवती चांगलीच बुचकळ्यात पडली. आत जाणंही शक्य नव्हतं तिला. अन तिथे उभं राहाणंही प्रशस्त वाटेना. काय करावं या संभ्रमात ती नुसतीच उभी राहिली. तेवढ्यात त्यांच्या खोलीच्या दाराची कडी काढल्याचा आवाज आला. रेवती चपळाईनं

खिडकीजवळ जाऊन उभी राहिली. जणू बाहेरची बाग बघतोय असा देखावा करत.

पाठमोरी असूनही तिला बाबासाहेबांच्या पायातल्या बुटांचा आवाज कळला. ताडताड ते बाहेर निघून गेलेलेही कळलं तिला. पण ती तशीच स्तब्ध उभी राहिली जागेवरच.

उर्मिलाबाईंच्या हातातल्या बांगड्या किणकिणल्या, अन ती मागे वळली. त्यांच्या चेहऱ्याकडे बघताच त्या रडत होत्या हे तिच्या ध्यानात आलं.

‘उठलीस का बाळ? ये चल स्वैपाकघरात. नीट घरही दाखवते तुला सवडीनं.’

मघाच्या वादळाचा लवलेशही त्यांच्या आवाजात नव्हता. डोळयांच्या किंचितशा लालसर कडा अन कोमेजलेला चेहरा मात्र सहज समजून येत होता.

शब्दही न बोलता ती त्यांच्या पाठोपाठ गेली. प्रत्यक्षात मात्र सारं विचारावसं फार फार वाटत होतं.

‘काय दुःख असेल या ऐश्वर्यात न्हाणाऱ्या रेखीव पुतळीला? दिसायला इतक्या सुरेख, प्रेमळ. अगदी खानदानी सौंदर्याची मूर्तीच जणू. अन नवऱ्याचं असं वागणं का सहन करतात ह्या?’

विचारांचं काहूर मनातच ठेवून ती सहजपणे त्यांनी दाखवलेली एकेक खोली नजरेआड घालू लागली. मात्र माधवशी सारं काही स्पष्ट बोलायचा ठाम निर्धार करूनच.

घर, घर कसलं छोटासा महालच होता तो. सारं बघून झाल्यावर उर्मिलाबाईंनी तिला स्वैपाकघरात नेलं. सत्यभामेनं तिच्यासाठी चांदीच्या फ़ुल्यांचा पाट अन समोर केशरी दुधाच्या पेल्याबरोबरच सांज्याची ताटली तयारच ठेवली होती.

‘तुम्ही नाही घेणार आई?’

‘नाही ग. मी सकाळी फ़क्त दूध घेते उठल्याबरोबर. अन संकोच न करता खाऊन घे. माधवनं मला सांगितलंय तुला नाश्त्याची सवय आहे म्हणून.’

‘अं... थांबू का ते उठेपर्यंत?’

‘नको. घे तू खाऊन. मग आपण दोघी देवळात जाऊन येऊ.’

रेवतीनं चवीनं नाश्ता केला. गेल्या दोन दिवसात प्रथमच आपण पोटभर खातोय असं वाटत होतं तिला.

त्या दोघी देवळातून आल्या, तोवर माधवही उठला होता. तयार होऊन तो झोपाळ्यावर बसून त्यांची वाटच पहात होता.

‘आई, रेवतीला बागा दाखवून आणतो जरा. तू येतेस का?’

‘नको रे. जा तुम्ही दोघंच. जेवायच्या वेळेपर्यंत या परत. अन फार उन्हात हिंडवू नकोस रे तिला. अजून हळदही वाळली नाहीय पुरती.’

‘आलोच लवकर. आज तू माझी आवडती खांडवी करणार आहेस ना ग?’

उर्मिलाबाई माधवकडे बघून स्निग्धपणे हसल्या. त्यांच्या त्या शांत डोळ्यांकडे बघून देवघरातल्या समईचीच आठवण आली रेवतीला.

भलीमोठी गाडी इनामदारांच्या बागांजवळ थांबली, ड्रायव्हरनं गाडीचा दरवाजा उघडला अन दोन्ही खांद्यांवरून पदर घेत रेवती

माधवबरोबर खाली उतरली. ड्रायव्हरनं अदबीनं सलाम केला अन गाडी बाजूला लावली.

माधवबरोबर फ़िरत, रमत गमत रेवती त्या विशाल बागा बघू लागली. आंबा, पेरू, लिंबू, कित्येक प्रकारची झाडं नुसती बहरली होती. बागेत काम करणाऱ्या गड्यांनी एका मोठ्या झाडाच्या सावलीखाली सतरंजी पसरली अन एका ताटात सारा बागेतला ताजा मेवा आणून ठेवला.

गुलाबी पेरूचा लचका हळूच तोडणाऱ्या रेवतीकडे बघून माधव मजेत हसला.

‘मला कौतुक वाटतंय रेवा तुझं कालपासून.’

‘का? असं काय केलं मी?’

‘शहरात वाढलेली, उच्चविद्याविभूषित मुलगी तू. सतत आधुनिक कपड्यांची, वर्तणुकीची सवय असलेली. अन आमच्या घरात कालपासून दुधातल्या साखरेसारखी मिसळून गेलीयस. मोठ्ठं कुंकू काय, दोन्ही खांद्यावरून पदर काय.’

रेवतीच्या चेहऱ्यावरचं हसू थोडं फ़िक्कं झालं.

‘अगदी प्रामाणिकपणे सांगू का माधव? हे सारं फार कठीण आहे अंगवळणी पडायला. केवळ महिन्या दोन महिन्यांनी व्हिसा मिळाला की लगेच मी तुझ्याजवळ लंडनला येणार, याची जाणीव आहे म्हणून जमतंय हे सारं. नाहीतर…’

‘ते सारं बरोबर रेवा, पण तुझ्या या वागण्यानं तू आईला फार आनंदी करतेयस ग…’

आईंचा विषय निघताच रेवा सावध झाली.

‘माधव, मला तुला काही विचारायचंय.’

‘नको विचारूस रेवा. तुला धक्का बसेल ऐकून…’

ती काय विचारणार याची जाणीव माधवला आधीपासूनच असावी.

‘ते चालेल माधव मला. पण आईशी बाबासाहेबांचं वागणं सहन करण्याच्या पलिकडचं आहे रे. मी सून असूनही मला इतका संताप येतो. तू तर पोटचा मुलगा आहेस त्यांचा. कसं सहन करू शकतोस तू हे?

‘थांब रेवा. मला वाटलं नव्हतं हे सारं इतक्या लवकर तुला सांगावं लागेल. पण आता इलाजच नाही ग.’

एक दीर्घ श्वास घेऊन माधवनं बोलायला सुरुवात केली.

‘माझी आई ही बाबांची द्वितीय पत्नी आहे रेवा. गावात अजून एक घर आहे त्यांचं. पुतळाबाई, म्हणजे त्यांच्या प्रथम पत्नी अजून जिवंत आहेत...’

वीज अंगावर कोसळली असती तरी रेवाला इतका धक्का बसला नसता. डोळे विस्फ़ारून ती माधवकडे बघू लागली. काय नव्हतं त्या नजरेत? आईबद्दल सहानुभूती, या साऱ्या गोष्टीचं आश्चर्य, अन हो..., ही गोष्ट लपवून ठेवल्याबद्दल माधवबद्दल प्रचंड संताप.

‘काय सांगतोयस तू माधव? अन हे इतक्या दिवसात तू कधीच बोलला नाहीस? अरे लग्नाआधी कितीदा भेटलोत आपण...’

रेवतीचा स्वर इतका तीक्ष्ण होता की ती पटकन उठून चालायला लागणार असं वाटलं माधवला.

मनावर प्रचंड ताण आल्याने माधवनं रेवतीचा हात एकदम घट्ट धरून ठेवला.

‘आपलं लग्न ठरल्यापासून सतत याच अपराधीपणाच्या जाणीवेतून जातोय ग मी. सारखं तुला सांगावसं वाटत होतं पण

तुला गमावून बसण्याच्या भीतीनं मात केली या साऱ्यावर. विश्वास ठेव रेवती, तुला बघायला आलो त्या दिवसापासूनच इतकी आवडली होतीस तू मला... माझ्या लंडनच्या राहणीमान, जीवनपद्धती या साऱ्याला अगदी अनुरूप वाटलीस तू मला. त्यात तुझा हा धीट, बोलका स्वभाव. माझ्यात जी धडाडी नाही ती पुरेपूर आहे तुझ्यात. या साऱ्या गुणांचं फार फार आकर्षण वाटतं ग मला...'

त्याच्या निर्मळ कबुलीजबाबानं रेवती किंचित वरमली.

'खरंच किती साधा, सरळ आहे हा स्वभावानं. अन आपणही लगेच चिडतो काहीही झालं की. सांगितलं नाही त्यानं हे खरंय, चुकलंच त्याचं. पण समजा सांगितलं असतंही, तरी आपल्या निर्णयात फ़रक पडायची शक्यता नव्हतीच. आपल्यालाही तितकाच आवडला होता तो. अन तसंही त्याच्या बाबतीत नाव ठेवण्यासारखं काही नाहीच. एवढा हुशार, देखणा, स्वभावानं मृदु अन घरचाही सधन. त्याच्या आईवडिलांच्या खाजगी गोष्टींनी आपल्याला तसं म्हटलं तर काय फ़रक पडतोय?'

रेवतीच्या विचारमग्न चेहेऱ्याकडे पाहून माधव आणखीनच चरकला. तो खूप दडपणाखाली आलाय हे जाणलं तिनं, अन पटकन त्याच्याजवळ सरकून त्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं तिनं.

‘नाही रे मी रागावले तुझ्यावर. पण मला हे सारं काय प्रकरण आहे हे जाणून घ्यायची खूप उत्सुकता लागलीय. तुझ्या मनाला त्रास होणार असेल तर नको सांगूस...’

‘त्रास?’ माधव खिन्नपणे हसला. ‘मी या साऱ्याच्या पलिकडे गेलोय रेवती. पण आज तुला सारं सांगूनच टाकतो. पुन्हा या विषयाची काळी छाया नको आपल्या सुखी संसारावर... "

‘रेवती, आमचं घराणं हे गावातलं एकदम खानदानी अन श्रीमंत. माझे बाबाही आजी आजोबांचे एकुलते एकच. लहानपणापासून खूप हट्टी अन तापट. त्यात घरात नेहेमी ऐश्वर्यात वाढल्याने त्याची पुरेपूर जाणीव असलेले. आजोबांच्या मनाविरुद्ध बाबा शहरात कॉलेजमधे शिकायला गेले, अन तिथंच शिकत असलेल्या पुतळाच्या प्रेमात पडले. घराणं जातपात, अन या साऱ्या गोष्टींचा जबर पगडा मनावर असलेल्या आजोबांना हे लग्न मान्य होणं शक्यच नव्हतं.’

‘घरून जिवापाड विरोध झाला. पुतळाच्या घरी विरोध करणारं कोणी नव्हतंच. लहानपणीच अनाथ झालेल्या पुतळाला मामानं

आजवर वाढवलं हेच तिचं नशीब. तो तिच्या घरातून जाण्याची वाटच बघत होता.’

‘आजोबांना साऱ्या प्रकाराची कुणकुण लागताच त्यांनी बाबांचं लग्न आईशी ठरवलं. आईसुद्धा तोलामोलाच्या घराण्यातली, सुरेख. म्हणून आजी आजोबांना फार पसंत होती. गावात अन नातेवाइकांत सगळीकडे ही वार्ता पसरली. बाबा मनातून फार चिडलेले होते. आपल्या जन्मदात्यावरचा सूड त्यांनी त्यांच्या पद्धतीनं उगवला.

लग्नाला पंधरा दिवस राहिलेले असताना ते सरळ पुतळाशी देवळात लग्न करून तिला घरी घेऊन आले.’

‘आजी आजोबांवर वज्राघातच झाला. आजीनं तिला घरात कशालाही हात लावायला मनाई केली. आजोबांनी तर अन्नपाणी त्यागलं. ते दम्याचे रुग्ण होते. त्यांची प्रकृती इतकी बिघडली की शेवटी बाबांना पुतळाला गावात दुसऱ्या घरात ठेवणं भाग पडलं.’

‘कुणालाही पत्ता लागू न देता बाबांचं लग्न माझ्या आईशी नियोजित वेळी लावण्यात आलं. तिला बिचारीला अर्थातच या

साऱ्याची सुतराम कल्पना नव्हती ग. बाबा तिच्याशी नेहेमी फ़टकूनच वागत. त्यांचा सारा वेळ पुतळाकडे जाई. ही गोष्ट एवढ्याशा गावात लपून राहणं अशक्यच होतं.'

'आईच्या लक्षात सारं आलं अन तिचा तिळपापड झाला. तिनं संतापून जाऊन बाबांना जाब विचारला. बाबांनी तिला बोलणं, तिरस्कारानं वागणं हे तर नेहेमीचंच होतं, पण त्या दिवशी त्यांनी आईवर हात उचलला.'

'एकुलत्या एका मुलाच्या संसाराचे धिंडवडे बघून आजी आजोबा कमालीचे व्यथित झाले. त्यातच आईच्या घरचे येऊन थडकले. त्यांनी सगळयांना खूप शिव्याशाप दिले. बाबांचं वागणं साऱ्या पंचक्रोशीत पसरलं.'

बोलता बोलता दम लागल्याने माधव जरासा थांबला...

'सगळया बाजूंनी असा विरोध झाला, लोकही कुजबुजू लागले, अन बाबा थोडेसे ताळयावर आले. नाही म्हटलं तरी आईच्या माहेरचा दबावही बराच होता. तिचं घराणं चांगलंच वजनदार होतं ना. वाड्यात ते राहू लागले हे खरं, पण आईला

पत्नीचा जो मान, दर्जा द्यायला हवा तो कधीच नीटपणे दिला नाही त्यांनी. माझा जन्म झाल्यावर ते आता सुधारतील ही आशा होती सगळ्यांना. ती फ़ोल ठरवली त्यांनी. आई माझ्या संगोपनात गुंतली अन ते परत गावातल्या दुसऱ्या घरात रमले. घरी आले तरी आईशी कधीच ते धड वागत नसत. इनामदार घराण्यात बाईनं तोंड वर करून बोलण्याची प्रथा नव्हती. आई मात्र सतत अन्यायाला शाब्दिक का होईना, प्रतिकार करते हे सहन होत नसे त्यांना... तिनं गप्प राहून सारं सोसावं ही अवाजवी अपेक्षा होती ग त्यांची.’

‘असाच संघर्ष करत, माझ्यावर कायम पाखर घालत संसार झाला बिचाऱ्या आईचा. माझ्याबद्दल फारसं ममत्व बाबांनी कधीच दाखवलं नाही. हं, नाही म्हणायला माझ्या शिक्षणात, लंडनला जाण्याच्या निर्णयात कशातच फारसा विरोध केला नाही त्यांनी. अन मलाही फारसा जिव्हाळा नाही त्यांच्याबद्दल. आईनंच मला वाढवलं खऱ्या अर्थानं.’

भावनावेग असह्य होऊन माधव थांबला.

‘पण, इतकं सारं होऊनही, त्या इतक्या या संसारात दुःखी असूनही सोडून का गेल्या नाहीत बाबांना? अन सुशिक्षित असूनही

पुतळाबाईंनी हे सारं का होऊ दिलं?' रेवती अजूनही संभ्रमातच होती.

माधव हसला.

'रेवा, एकतर घटस्फ़ोट अजूनही आमच्या घराण्यातच काय, गावातच इतका लोकमान्य नाहीय बरं. शहरी वातावरणात वाढलेल्या तुला या गोष्टींची कल्पनाही येणार नाही कधी. अन पुतळाबाईंचा दोष नाही, दोष त्यांच्या परिस्थितीचा आहे ग. माहेरी कुठलाच आधार नाही. एकदा बाबांशी नाव जोडल्या गेल्यानं दुसऱ्या कोणाशी लग्नही अशक्य. खेडापाड्यात हे सारं अजूनही फार गुंतागुंतीचं आहे ग. त्यात बाबांवर विश्वास ठेवून शिक्षणही अर्धवटच सोडून आली होती ती. डोक्यावर छप्पर अन जन्मभराची सोय पाहिली बिचारीनं. मला तिचा राग येतच नाही. अन तसंही या साऱ्यात दोषी कोण हे ठरवणं फार अवघड आहे. घराणं अन खानदान या खुळ्या कल्पनांपायी बाबांचा विरोध करणारे आजीआजोबा, की आईला काही न सांगता खुशाल तिच्याशी दुसरं लग्न करणारे बाबा, की सारं कळून आमच्या घरच्यांना दोष देणारे, पण स्वतच्या बदनामीच्या भीतीने तिला माहेरी थारा न देणारे तिचे आईवडील. सारंच कठीण आहे ठरवणं.'

सगळं कळल्यानं रेवती आता शांत झाली होती. तिनं हलकेच माधवच्या हातावर थोपटलं. तिचा तो आश्वासक स्पर्श फार सुखावून गेला त्याला.

‘अन रेवा, खरं सांगू, मला तुझी फार फार काळजी वाटतेय ग. मी लंडनला गेल्यावर तू आईबाबांच्या मधे पडू नकोस मुळीच. अन्याय समोर होत असला की विरोध करायचा पिन्ड आहे तुझा. तशीच घडली आहेस तू. पण बाबा फार तापट अन वेगळेच आहेत. तेव्हा जे दिसेल त्याकडे कानाडोळा कर, अन तुझा व्हिसा झाला की लगेच विमानात बस.’

‘काही वचन बिचन मागू नकोस रे बाबा. मी बोलणार नाही त्यांच्या खाजगी गोष्टींत, पण माझ्यावर हाही विश्वास ठेवून जा की कुठल्याही परिस्थितीत योग्य असंच वागेन मी.’रेवा हसून म्हणाली.’

‘त्या विश्वासावरच तर हा दीड महिना काढणार आहे मी.’ माधवनं तिला प्रेमानं जवळ घेतलं.

माधवला लंडनला जाऊन दोन आठवडे झाले होते. या कालावधीत रेवती अन उर्मिलाबाईंमधे एका हळुवार नात्याचा बंध विणल्या गेला होता. रेवतीच्या सगळ्या सवयी, आवडीनिवडी जपण्याचा त्या कसोशीने प्रयत्न करीत असत. सकाळी तिच्यासाठी म्हणून खास नाश्त्याला तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ त्या सत्यभामेकडून बनवून घेत. जेवणात एकतरी गोड पदार्थ असेच. तिच्यासाठी म्हणून वरच्या मजल्यावरची माधवच्या आजोबांची लायब्ररी त्यांनी उघडून ठेवली होती. रेवती बरेचदा उशिरापर्यंत वाचत बसे. तेव्हा झोपण्याआधी तिच्यासाठी केशरी दूध त्या स्वत घेऊन येत. त्यांच्या मायेनं रेवती अगदी सुखावून जात असे.

अशीच एक दिवस रेवती मध्यरात्रीपर्यंत वाचत बसली होती. वाचता वाचताच तिचा डोळा लागला. केव्हातरी कुणाच्यातरी चढलेल्या आवाजाने तिला जाग आली. आवाज अर्थातच खालच्या मजल्यावरच्या उर्मिलाबाईंच्या खोलीतून येत होता.

पाऊल न वाजवता रेवती जिना उतरून खाली आली. बाबासाहेबांचा आवाज तर चढलेला होताच, पण उर्मिलाबाईंचा स्वर प्रथमच इतका तीव्र झालेला ऐकत होती ती.

‘मुकाट्यानं किल्ली दे. मला जास्त बोलायला लावू नकोस.’

‘मुळीच देणार नाही मी. त्या दागिन्यांना हात नाही लावायचा. आत्तापर्यंत तुम्ही कितीतरी अलंकार तिला नेऊन दिलेत. मी ब्र नाही काढला. पण ती नथ आईंची आहे. आपल्या घरात पिढ्यानपिढ्या चालत आलेली. ती माधवच्या पत्नीलाच मिळायला हवी.’

हे ठरवणारी तू कोण? अन माझ्या वाडवडिलांच्या संपत्तीचा विनियोग मी कसाही करीन. त्यात तू बोलायची गरज नाही. चल, आण किल्ली...’

‘जीव गेला तरी देणार नाही मी...’

नंतरचे झटापटीचे आवाज इतके स्पष्ट होते की रेवतीनं दाराकडे जाण्यासाठी पाऊल उचललं, तोच मागून हलकेच आलेल्या सत्यभामेनं तिच्या खांद्यावर हात ठेवला.

रेवतीनं सत्यभामेकडे पाहिलं. त्या क्षणी रेवतीच्या डोळ्यात काय होतं हे त्या अडाणी, अशिक्षित बाईलासुद्धा स्वच्छ वाचता आलं. या घरात या ठिणग़ीचा काहीही उपयोग नाही हे

तिच्याशिवाय कोण जास्त समजू शकणार होतं? तिच्या आजीपासूनची पिढी या वाड्याच्या अन्नावर पोसल्या गेली होती.

दोन्ही खांद्यांना धरून तिनं रेवतीला थोडं अधिकारानंच स्वैपाकघरात नेलं.

‘राग आवरा वहिनीसायब. त्यानं काय बी होनार न्हाय. त्या माऊलीच्या नशिबी ह्ये सदाचंच हाय.’

रेवती काही बोलणार तोच बाबासाहेबांच्या दूर जाणाऱ्या पावलांचा अन उर्मिलाबाईंच्या विव्हळण्याचा आवाज तिच्या कानांनी टिपला. सत्यभामेचा हात झटकून ती तीरासारखी उर्मिलाबाईंच्या खोलीकडे धावली.

गुडघ्यात तोंड घालून त्या पलंगाजवळ खालीच बसल्या होत्या. टेबलावरचं मोठं पुष्पपात्र खाली पडून फ़ुटलं होतं. त्याच्या काचांमधला एक छोटासा तुकडा त्यांच्या अंगठ्याजवळ रुतला होता. कोणीतरी हिसडा दिल्यासारखे केस सुटून पाठीवर पसरले होते. हुंदक्यांनी सारं शरीर गदगदत होतं.

रेवती हळूच त्यांच्याजवळ बसली. पुढचा अर्धा तास ती भराभर काम करीत होती. सत्यभामेनं अन तिनं मिळून त्यांची पायाची जखम नीट पुसून पट्टी बांधली. त्यांच्या डोळ्याखाली

सुजायला सुरुवात झाली होती. तिथं तिनं बराच वेळ शेक दिला. दोघींनी मिळून त्यांना नीट झोपवलं. सत्यभामेला जायची खूण करून रेवती तिथेच आरामखुर्चीत बसून राहिली. सकाळी सकाळी केव्हातरी त्यांना झोप लागल्यावरच ती बाहेर आली.

पूर्वेकडे तांबडं फ़ुटायला सुरुवात झाली होती. विमनस्कपणे रेवती झोपाळ्यावर बसली. सत्यभामेनं आणलेला दुधाचा पेलाही तिनं परत पाठवून दिला.

‘कसलं नशीब हे?’

तिच्या मनात आलं. ‘रूप, वैभव, सारंकाही असून हे कसं पोतेऱ्यासारखं जिणं या बाईच्या कपाळी लिहून ठेवलंय विधात्यानं?’

दुपारपर्यंत ती अस्वस्थच होती. रोजचे सारे व्यवहार यांत्रिकपणे पार पाडत होती.

उर्मिलाबाईंच्या खोलीतून चाहुलीचा आवाज आला तशी रेवती घाईघाईनंच आत गेली.

त्या झोपेतच चाळवत होत्या. त्यांच्या कपाळावर रेवतीनं हात ठेवला मात्र, अन त्यांना फ़णफ़णून ताप भरल्याचं लक्षात आलं तिच्या.

सत्यभामेला विचारून तिनं सखाराम गड्याला तालुक्याला पाठवलं. निरोप मिळताच डॉक्टर तातडीनं आले.

त्या आजारातून बरं व्हायलाच उर्मिलाबाईंना पुरता एक आठवडा लागला. रेवतीनं त्यांची सतत शुश्रुषा केली. अगदी मऊ भात भरवण्यापासून सारं ती करी. बाबासाहेब मात्र एकदाही घराकडे फ़िरकले नाहीत.

आठवड्याभरात उर्मिलाबाई हिंडू फ़िरू लागल्या. अशक्तपणा मात्र होताच. रेवतीचे जायचे दिवस जवळ येत होते. तिच्यासाठी म्हणून खास एक साडी भरतकाम करायला काढली होती त्यांनी. ओसरीवर बसून त्या आता तासनतास त्या साडीवर फ़ुले भरत असत. रेवतीनं त्यांना आराम करण्याबद्दल खूप विनवण्या केल्या पण त्या मुळीच ऐकत नसत.

‘आई,’...

एकदा अशाच त्या दोघी बसल्या असताना रेवतीनं हलकेच प्रश्न केला, ‘मी गेल्यावर नीट रहाल ना? मला तुमची खूप काळजी वाटते हो...’

‘बाळ, काळजी कशाची? प्रत्येकाचं प्राक्तन असतं ग हे. तुम्ही दोघं मजेत रहा. सुखी रहा... मग सारं मिळालं बघ मला. माझ्या लाडक्या माधवला त्याच्या मनासारखी, खंबीर बायको मिळाली, त्याचा संसार माझ्यासारखा होणार नाही, याचाच आनंद फार मोठा आहे ग...’

‘ती किल्ली नेली शेवटी त्यांनी?’ रेवतीनं धीर करून विचारलंच.

‘छे, ती मिळाली नाही शेवटपर्यंत, त्यासाठीच तर मारलं त्यांनी मला. जाऊ दे. चल जेवायची वेळ झाली बघ. आज रखमा अन साऱ्या गड्यांना सुट्टी दिलीय मी दुपारपर्यंत. देवीच्या जत्रेसाठी. बिचारे राब राब राबतात ग एरवी...’

उर्मिलाबाईंचं वाक्य अर्धंच राहिलं. वाड्याचा भला मोठा दरवाजा उघडून बाबासाहेब दारात उभे राहिलेले दिसले रेवतीला.

हातातलं पुस्तक बाजूला ठेवून ती उभी राहिली. अवघडून जाऊन, खोलीत जावं की इथेच उभं रहावं याचा निर्णय मनात न झाल्याने.

भक्कम पावलं टाकत बाबासाहेब उर्मिलाबाईंजवळ आले.

‘किल्ली न्यायला आलोय मी...’ त्यांच्या सुरात विखार होता.

‘रेवती, तू खोलीत जा तुझ्या...’ तशाही परिस्थितीत उर्मिलाबाई उद्गारल्या.

जाण्याचा विचार केव्हापासून केला होता रेवतीनं, पण कसल्याशा अदृश्य शक्तीने तिचे पाय जमिनीलाच खिळून राहिले.

‘देणार नाही. त्यादिवशीच सांगितलय मी तुम्हाला...’

संतापानं बाबासाहेबांच्या कपाळावरची शीर ताडताड उडू लागली होती.

‘खबरदार... उलटून उत्तरं नकोत मला... चल, सांग कुठे आहे किल्ली...’

तिरस्कारानं उर्मिलाबाईंच्या दंडाला धरलं त्यांनी. पण तितक्याच चिडीनं त्यांनी हात सोडवून घेतला.

‘तुम्हाला थोडी तरी शरम असू द्या. सूनबाईच्या समोर असं वागताना काहीच कसं वाटत नाही ?’

‘माझी लाज काढतेस?’ रागानं आता बाबासाहेब पुरते बेभान झाले होते.

अन रेवतीच्या ध्यानीमनी नसताना ते घडलं. बाबासाहेबांच्या हातातल्या चांदीच्या मुठीच्या काठीचा जोरकस प्रहार उर्मिलाबाईंच्या डोक्यावर बसला. त्यांच्या जखमेतून रक्ताची धार वाहू लागली.

विजेच्या वेगाने रेवती जागची हलली. सारा जोर पणाला लावून तिनं काठीचा दुसरा प्रहार होण्याआधीच बाबासाहेबांचा

हात घट्ट धरला. एरवी त्यांच्या मजबूत शरीरासमोर तिचा पाड लागला नसता. पण ते बेसावध होते, अन तिच्या संतापानं शंभर हत्तींचं बळ दिलं होतं तिला. त्यांच्या हातातली काठी तिनं झटक्यानं हिसकावून घेतली.

‘काय करताय तुम्ही हे? माणूस आहात की कोण?’ एखाद्या रणरागिणीसारखी ती कडाडली.

‘तुझी ही मजाल? काल घरात आलेली पोर तू. चल हो बाजूला.’

उत्तरादाखल रेवतीनं फ़क्त डोळे रोखून त्यांच्याकडे बघितलं. त्या मोठमोठ्या डोळ्यातल्या अंगारानं तेसुद्धा क्षणभर चरकले. पण रागानं आता त्यांच्या साऱ्या असल्यानसल्या विवेकबुद्धीचा ताबा घेतला होता.

रेवतीच्या हातातली काठी ओढून घेण्याचा प्रयत्न ते करू लागले. सारा जोर एकवटून रेवतीनं ती काठी आडवी धरूनच त्यांना ढकललं. तोल जाऊन पडू नये म्हणून ओसरीचा खांब त्यांनी धरला अन ते अघटित घडलं.

खांबाला धरून उभे राहताराहताच ते खाली कोसळले. तोंड वेडवाकडं झालं अन ओठातून फ़ेस बाहेर आला.

इतका वेळ डोकं गच्च धरून बसलेल्या उर्मिलाबाई लटपटत उभ्या राहिल्या, अन त्यांनी रेवतीच्या हातातली काठी काढून घेतली.

‘रेवा, ताबडतोब तुझ्या खोलीत जा. मी हाक मारेपर्यंत बाहेर यायचं नाही हे लक्षात ठेव.’

त्यांच्या आवाजात विलक्षण जरब होती.

रेवती खोलीत आली अन थरथरत पलंगावर बसून राहिली.

खालचे आवाज अगदी स्पष्ट ऐकू येत होते रेवतीला. उर्मिलाबाईंनी शेजारच्या देशमुखांच्या घरी हाक मारलेली ऐकली तिनं. अन थोड्याच वेळात देशमुखांचा नोकर जिन्यावरून धडधडत वर आला.

‘बिगीनं चला वयनीसायेब. मोठ्या मालकांची तब्बेत खराब जालीया. तालुक्याच्या गावाहून दाक्तर बोलिवलाय.’

अजूनही हातापायात होणारी सूक्ष्म थरथर लपवीत रेवती खाली आली. बाबासाहेबांना त्यांच्या खोलीत झोपवलं होतं. बऱ्याच लोकांचा घोळका कुजबूज करत होता. उर्मिलाबाई त्यांच्या उशाशी बसल्या होत्या. चेहरा कमालीचा शांत.

काही वेळातच डॉक्टर घरी आले. त्यांनी बाबासाहेबांना नीट तपासलं. अन गंभीर चेहऱ्यानं निदान केलं.

‘अतिशय संतापामुळे मेंदूत गुठळी होऊन यांना पक्षाघाताचा जबरदस्त झटका आलेला आहे. त्यांचं वय बघता सुधाराची शक्यता जवळजवळ नाहीच.’

रेवती सुन्न होऊन ऐकत होती.

‘हे काय विपरित घडलं आपल्या हातून? असं काही होईल असं स्वप्नातही वाटलं नाही आपल्याला. काय होईल आता? आई तर तिरस्कारच करतील आपला. त्यांच्या कुंकवावरच घाला घातला आपण...’

औषधपाणी देऊन डॉक्टर गेले, अन सारे लोकही पांगले. उर्मिलाबाईंनी देशमुखांच्या गड्याला माधवला फ़ोन करायला पाठवलं.

'रेवा,'

उर्मिलाबाईची हाक आली तशी ती जड पावलांनी त्यांच्या खोलीत गेली. त्या पलंगावर अविचल बसल्या होत्या. डोक्याच्या जखमेवर पट्टी बांधलेली होती. तिला आत आलेली बघताच त्या लगेच उठल्या अन हाताला धरून तिला त्यांनी ओसरीवर नेलं.

आपल्याशेजारी झोपाळ्यावर बसायची खूण त्यांनी केली मात्र, रेवती कोसळलीच. त्यांच्या मांडीवर डोकं ठेवून ती स्फुंदू लागली.

मी मुद्दाम नाही हो केलं आई. तुमचा त्रास बघून तोल सुटला माझा...'

'गप्प पोरी. आधी शांत हो पाहू. तुझा मुळीसुद्धा दोष नाही या साऱ्या प्रकारात. त्यांच्या अतिरेकी संतापानं घात केला त्यांचा. अन मी मुद्दाम हे सांगायलाच बोलावलं तुला. मला वचन दे पाहू एक तू...'

अश्रूंनी ओला झालेला चेहरा उचलून रेवतीनं प्रश्नार्थक नजरेनं त्यांच्याकडे बघितलं.

आज जे काही घडलं ते फ़क्त तुझ्या माझ्यातच राहील. तू कुणा कुण्णाजवळ बोलणार नाहीस कधी. माझी शप्पथ आहे तुला. अन त्यांना सावरताना तोल जाऊन मी पडले असं सांगितलंय मी साऱ्यांना...'

रेवती थोडी घुटमळली. पण उर्मिलाबाईंनीच तिच्या लांबसडक बोटांमधे आपली बोटं गुंफ़ली अन तिच्या मस्तकावर मायेनं थोपटलं.

नंतरच्या घटना फार वेगानं घडत गेल्या. निरोप मिळताच माधव तातडीनं निघाला. रेवतीचा व्हिसाही तेवढ्यातच आला. दोघांनीही महिनाभर राहून बरोबरच निघायचं ठरवलं. बाबासाहेबांची अवस्था अगदी तान्ह्या बाळासारखी असहाय्य झाली होती. पण उर्मिलाबाई अगदी प्रेमानं त्यांचं सारं करीत. त्यांच्या वागण्यात कुठेही एवढासा विषाद नव्हता.

निघायच्या दोन दिवस आधी माधव अन रेवतीला त्यांनी जवळ बसवून घेतलं.

‘तिकडे नीट रहा. स्वतला जपा. माझ्या जिवाला काळजी लावू नका...’

माधवचे डोळे भरून आले.

‘आई... तुझ्याच काळजीने वेडा होईन ग मी तिकडे. तुला काही दिवस लंडनला न्यायचा विचार होता माझा, पण आता तर तू नेहेमीकरताच अडकलीस.’

‘नाही बाळ. असं बोलू नये. अडकले कसली? जन्माची गाठ बांधलेली आहे रे आमची. अन इथे मी एकटी थोडीच आहे रे. इथे सगळे आपले जुने नोकरचाकर आहेत की सोबतीला. या वाड्यातच आयुष्य गेलं माझं. मला इथे अगदी शांत वाटतं. माझी मुळीच काळजी करू नका तुम्ही दोघं. दर वर्षी येत जा मात्र. अन हो, पुतळाला महिन्याकाठी चोळीबांगडी लावून दिलीय मी मुनीमजींकडून. माझ्यानंतरही ती मिळत राहील ही काळजी घ्या.’

संभाषण संपवून त्या उठल्याच.

निघायची सारी तयारी झाली. सखारामनं सगळं सामान गाडीत भरलं. कुलस्वामिनीच्या पाया पडायला म्हणून रेवती अन माधव देवघरात गेले. बाहेर येऊन दोघांनीही उर्मिलाबाईंना मिठी मारली. त्यांनीही प्रेमभरानं लेकाला अन सुनेला जवळ घेतलं.

नमस्काराला म्हणून दोघेही उर्मिलाबाईंच्या पायाशी वाकले अन रेवतीचे डोळे जागीच खिळून राहिले.

उर्मिलाबाईंच्या पायात रेवतीनं सत्यनारायणाच्या दिवशी बघितलेल्या सोनसाखळया चमकत होत्या.

# अनुभूती

टी व्ही वरच्या चित्रपटातला गलका एकदम वाढला तशी मला दचकून जाग आली. हातातला रिमोट केव्हाच गालिचावर गळून पडला होता. एकाच कडेला इतका वेळ झोपल्याने मान अवघडून दुखायला सुरुवात झाली होती.

सोफ़्यावरून पाय हळूच खाली घेत मी स्लिपर्समधे सरकवले. आळस कसा अंगात भरून राहिला होता. केसांचा हलकासा सैलसर अंबाडा बांधून घेत मी स्वैपाकघरात आले. मायक्रोवेव्ह च्या घड्याळात एक वाजत आला होता.

'अजून आला नाहीय हा. आज काय ऑफ़िसमधेच झोपणार आहे वाटतं...' मनातल्या मनात चरफ़डतच मी जेवायच्या टेबलावर येऊन बसले. आता भुकेची जाणीव झोपेवरही मात करू लागली होती. काचेच्या भांड्यांवरची झाकणं उगाचच उघडून पहात मी एक निसटता निश्वास सोडला.

‘हं... वाटली डाळ, आम्रखंड, पुऱ्या, बटाट्याचा रस्सा... सगळं त्याच्या आवडीचं. वाढदिवस आपला अन जेवण मात्र नवऱ्याच्या आवडीचं बनवलंय. अन त्याला काही आहे का त्याचं? एक वाजला तरी अजून घरी यायचा पत्ता नाहीय...’

प्लेटमधे चमचाभर श्रीखंड नि दोन पुऱ्या वाढून घेत मी खुर्ची सरकवली तोच लॅचचा आवाज आला.

‘अग, हे काय... जेवली नाहीस अजून? मी कित्तीदातरी तुला सांगितलय... मला उशीर असला की जेवून घेत जा म्हणून...’

‘मग तर महिन्याचे वीस दिवस मला एकटीलाच जेवावं लागेल...’मनात नसतानाही तीर सुटलाच.

‘राणी, मी थकून आलोय. आता वाद जाऊ दे ना. चल, आपण दोघं जेवू या छान. अन मी मस्त सुट्टी घेतलीय उद्या. तुझ्या आवडीप्रमाणे सारा कार्यक्रम ठरव तू... खूप फ़िरूया बाहेर. हवं तर आत्ताच बुक करतो सिनेमाची तिकिटं मी. ऑनलाईन...’

‘काही नको. दिवसाला महत्व असतं. दर वर्षी हेच. कध्धी कध्धी म्हणून वेळेवर येत नाहीस तू...’आता माझे डोळे भरून आलेले. कोणत्याही क्षणी धारा बरसणार असतात. ‘इथे मी दिवसभर खपून घरची कामं करतेय. नि एक वाढदिवसाला

पण घरीच. कंटाळा आलाय अगदी मला. अन तुझ्या माणसांना वाटतं की मी इथे किती आरामात आहे... नुसती लोळतेय महाराणीसारखी...’

नवऱ्याच्या चेहऱ्यावर हलकंसं हसू पसरलं.

‘गॉट इट. फोन केला होतास वाटतं घरी आज. अग तुला कितीदा सांगितलंय. कोणी काहीही म्हटलं तरी आपण लक्ष देऊ नये. अन इतका मनस्ताप तुला होतोय तर करतच नको जाऊस फोन तू. मी बोलतोच नाही तरी दर आठवड्याला...’ माझ्याशी बोलता बोलता तो हात धुवून जेवायला येऊनही बसला होता.

माझ्या डोळ्यातलं पाणी हलक्या हाताने पुसून त्यानं माझ्या प्लेटमधेही वाढायला सुरुवात केली होती.

‘राणी, कोणाच्या बोलण्याचा असा परिणाम नाही करून घ्यायचा मनावर. शांत पाण्यात दगड पडला ना, तर तरंग उठणं अगदी साहजिक, पण पाणी गढूळ नसतं होऊ द्यायचं असं. तितका संयम हवाच मनावर आपल्या...’

‘पुरे तुझं साहित्यिक बोलणं. जेव आता...’

मला खुदकन हसू फ़ुटलं.

दुसरा दिवस अगदी आनंदात उजाडला. माझ्या मनासारखा थुईथुई नाचतच. सकाळपासूनच दोघं घराबाहेर पडलो. खूप खूप भटकंती झाली. मनासारखी खरेदी झाली. सिनेमा बघून झाला अन छानशा हॉटेलमधे जेवणही झालं. घरी परतण्याआधी जवळच्याच तलावाच्या काठावर दोघं जाऊन बसलो.

‘खरं सांग, तू मलाच का पसंत केलंस? इतक्या मोठ्या घरातला तू. काय पाहिलंस माझ्यासारख्या मध्यमवर्गीय, साध्यासुध्या मुलीत?...’ गेल्या वर्षभरात अनंत वेळा विचारलेला प्रश्न मी पुन्हा विचारला.

‘सांगितलंय की मी तुला. आकाशवाणी झाली होती ना... हीच तुझी बायको म्हणून...’नवऱ्याच्या चेहेऱ्यावर मिष्कील हसू.

‘अहं... नेहेमीसारखं थट्टेत उडवू नकोस ना. खरं खरं सांग अगदी...’माझा आवाज रुसका.

नवरा आता मात्र गंभीर झाला.

‘तुला मी कितीदा सांगितलंय. अशी वेळ येते, एखादं माणूस समोर येतं नि वाटतं की हीच... हीच ती व्यक्ती. हिच्यासाठीच थांबलो होतो मी इतका वेळ. तो क्षण जणूकाही तिथेच थबकून रहातो. पण त्या थांबलेल्या एका क्षणाने आयुष्याचे सारे प्रश्न सोडवलेले असतात. सगळं कसं स्पष्ट होतं डोळ्यांसमोर. फ़क्त एकच जाणीव उरते, ती म्हणजे आयुष्याचा जोडीदार मिळालाय... सगळा शोध संपलाय. मग मनात उरतात फ़क्त सहजीवनाची तरल स्वप्नं...’

नकळत माझाही आवाज कातर झाला.

‘पण या साऱ्याबरोबरच घरच्या माणसांच्या नापसंतीला झटकून टाकणारी एखादी जादूची कांडी असती तर... ? किती बरं झालं असतं रे...’

‘हं. अजून कालचं फ़ोनवरचं संभाषण गेलं नाहीय वाटतं बाईसाहेबांच्या डोक्यातून... चल, इतक्या सुरेख दिवसाला गालबोट नको लावूस राणी आता. विसरून जा बरं ते...’

‘खूप प्रयत्न करते मी विसरायचा. पण मन विसरूच देत नाही रे. मान्य आहे. तुझ्या माणसांच्या मनात काही वेगळीच प्रतिमा

असेल सुनेची. पण आता आलेय ना मी तुझा हात धरून या घरात... मग त्यांनी नेहेमी असं खोचक बोलायची काय गरज आहे?...'

माझ्या पापण्यांवरचे थेंब सर्रकन गालावर उतरले.

'राणी.... राणी... मला अगदी मान्य आहे त्यांचं चुकतंय ते. पण एक कळत नाहीय मला. याआधी तर आपण भारतात एकत्र कुटुंबात रहात होतो. या साऱ्याशी तर तुझा रोजच सामना होता. मग तेव्हा तू कधी इतकी खिन्न झाली नाहीस. अन गेले सहा महिने बघतोय... फोनवरच्या एखाद्याच बोचऱ्या शब्दानं इतका मनस्ताप का करून घेतेस तू? इथे तर आपण दोघंच आहोत. तसाही फारसा संबंध येतच नाही घरच्यांचा...'

आता मात्र मी खरंच विचारात पडले. हे काय होतंय मला सारखं? खरंतर हा माझा स्वभाव नाहीच. सगळं आयुष्य कसं समरसून जगायला आवडतं मला. गेल्या काही दिवसात हे असं सतत भरून आल्यासारखं, मनावर मोठ्ठं दडपण असल्यासारखं का वाटतंय?...'

घुसमटून टाकणारी ती जाणीव पुन्हा तळापासून वर येऊ लागली तशी मी झटकन उठले.

‘अरे, किती उशीर झाला... घरी नाही का जायचं? उद्या ऑफ़िस आहे म्हटलं...’

दुसऱ्या दिवशी हेमंत ऑफ़िस मधे निघून गेला. सारी कामं उरकून मी बाल्कनीत येऊन बसले. मनात विचारांचं काहूर सुरूच होतं. या वेळी भारतात मी संस्थेत असायचे. मतिमंद मुलांच्या संस्थेत मी नोकरी करीत होते तेव्हा. नंतर एक तास मी तिथेच थोडी मदत करीत असे. विनापगारी... समाजसेवा म्हणून.

हेमंतचं स्थळ आलं तेव्हा खरंतर लग्नाचा विचारही डोक्यात नव्हता माझ्या. संस्थेतल्या मुलांसाठी आपल्या पुतण्याचे जुने कपडे नि खेळणी द्यायला तो आला होता. त्याच्या बहिणीबरोबर. त्यानं माझ्यात काय बघितलं ते तोच जाणे, पण पुढच्याच आठवड्यात त्याच्या घरच्यांचा फ़ोन आला. आईबाबा एकदम खुशीतच आले. आपोआप असं सुरेख स्थळ पोरीनं पटकावलं म्हणून. पण मी जरा संभ्रमातच होते. हेमंतच्या घरचे लोक फार बडे होते. बंगला, गाडी, समाजात प्रतिष्ठा... सारंच होतं. हेमंतचा मोठा भाऊ सुमंत विवाहित होता. हेमंत मधला नि धाकटी कांचन.

हेमंतच्या मोठ्या भावाला नि वडिलांना माझं स्थळ पसंत नव्हतं ते आमच्या मध्यमवर्गीय परिस्थितीमुळे. आईंचा माझ्या साध्यासुध्या राहाणीवर आक्षेप होता. माझी मोठी जाऊ, अनिता, तोलामोलाच्या घरातून आलेली, फ़ॅशनेबल होती. सासरच्या इतमामाप्रमाणे रहाणं तिला जमत होतं, नव्हे त्यातच ती लहानाची मोठी झालेली होती.

‘खरंच, किती सुरेख रहातात अनितावहिनी...’माझ्या मनात आलं. ‘नीट सेट केलेले केस, वेगळ्यावेगळया पद्धतीचे ड्रेसेस, दागिने...’त्यांच्याकडे बघून मला सिरियल मधल्या बायकांचीच आठवण होत असे. मेक अप सुद्धा इतक्या सफाईनं करीत की त्यांच्या मूळच्या देखणेपणात त्यामुळे भरच पडत असे.

याउलट मी अगदी साधी. त्यांच्या नि आईंच्या मते बावळटच. केसांचा एक लांबसडक शेपटा नि कॉटनचे सौम्य रंगातले सलवार कमीज इतपतच माझी फ़ॅशन मर्यादित होती. नाही म्हणायला गजरे नि फ़ुलं यांची फार आवड होती मला. कामावर जायचं म्हणून मंगळसूत्र देखील छोटसंच घालायचे मी. अनामिकेत चमकणारी तेजस्वी हिऱ्याची अंगठी इतकीच काय ती बाबासाहेब सरपोतदारांची सून असल्याची खूण.

मी सिल्कचे, जरीकामाचे ड्रेसेस घालून बाहेर जावं असं कितीदातरी आईंनी मला सुचवून बघितलं होतं. पण मी ज्या वातावरणात, ज्या ठिकाणी नोकरी करत होते तिथे ते कमालीचे विशोभित दिसले असते. अन नोकरी मी सोडणार नाही हे मी हेमंतकडून कबूल करून घेतलं होतं आधीच.

'जाऊ दे ग आई. तिला आवडतं तसं राहू दे तिला... अन एरवी तुझ्या किटी पार्टीत येते ना ती तुझ्याबरोबर तुला हवे तसे कपडे घालून?...'

हेमंतनंच एकदा माझी बाजू घेतली होती.

'तेच सांगते मी आईंना. अहो भाऊजी, सवय असावी लागते अशा कपड्यांची आधीपासून...'

दुसऱ्याला लागट बोलण्यात अनितावहिनींचा हात कोणी धरत नसे.

'जाऊ दे बाई.'आई म्हणाल्या... 'तुझ्या नवऱ्यालाच चालतंय, तर मी कोण बोलणारी?'

'अगदी अर्ध्या वचनात आहेत हो ते तुझ्या. भाऊजी, बायकोनं अगदी भुरळ पाडलीय बघा तुम्हाला...' अनितावहिनींचं छद्मी हास्य.

‘म्हणजे काय वहिनी? अहो नवऱ्याला भुरळ घालता येत नाही ती बायकोच कसली?’

गडगडाटी हसून हेमंतनं कोपरखळी मारली होती. वहिनींच्या चेहऱ्यावरच्या रागानं मलाच वरमल्यासारखं झालं होतं.

वरवर हसून उडवलं, तरी मला मनातून खूप वाईट वाटलं होतं तेव्हा. पण नंतर आम्ही दोघेच असताना हेमंतनं माझी खूप समजूत काढली होती. ‘जाऊ दे ग. वहिनीची सवयच आहे असं बोलायची...’

अन त्याच्या प्रेमळ समजावणीनं मी ही पटकन सारं विसरले होते तेव्हा.

मग आता सातासमुद्रापलिकडे हे बोचरे शब्द, या जुन्या आठवणी का वारंवार घायाळ करताहेत मला? का दिवस दिवस अशी उदास बसून राहतेय मी?

दाराचा आवाज आला तशी मी उठले. बाल्कनीतून घरात येताना माझे पाय किंचित कापत होते. दार उघडायला जाताना

घड्याळाकडे बघितलं. चक्क दुपारचे चार वाजले होते. म्हणजे? चार तास मी बाहेर बाल्कनीत बसून होते?

आश्चर्याच्या अन विचारांच्या भोवऱ्यात हेलपाटतच मी दार उघडलं. दारात हेमंत उभा होता.

‘तू इतक्या लवकर कसा काय आलास आज?’

‘अग, जरा काम उरकलं लवकर. चल, फ़िरवून आणतो तुला... पण तुझे डोळे इतके लालसर का दिसताहेत? रडलीबिडली होतीस वाटतं?’

‘छे, रडायला काय झालंय... अन कालच फ़िरलो की बाहेर एवढे. आज घरीच बसू या. हवंतर एखादा पिक्चर घेऊन येऊ...’

उसन्या उत्साहाने मी बोलून गेले खरं, पण माझ्या डोक्यात विचारांनी थैमान घातलं होतं.

‘हे काय झालंय आपल्याला... इतक्या कडक उन्हात बाहेर बसलो होतो आपण. ए. सी. चालूच होता अन बाल्कनीचं दारही उघडंच. वेड्यासारखेच वागतोय आपण. सगळं ठीक चाललंय, अन हे गोंधळलेपण, ही सतत मनाला जाळणारी खंत कसली?

इतके मोठे प्रश्न कोणते आहेत आपल्यासमोर? आई म्हणते तेच खरं असेल का? सुख दुखतंय तसंच काहीसं?...’

विचार करतच मी तयार झाले. जीन्स वर हाताला आला तो कुर्ता चढवला, अन केसांचा एक साधासा अंबाडा बांधून निघाले.

‘हे काय, मला वाटलं होतं तू कालचा नवा ड्रेस घालशील. अन केस असे काय कंटाळल्यासारखे बांधलेत? आजकाल नेहेमीसारखी मस्त हेयरस्टाईल वगैरे करतच नाहीस तू?’

हेमंत मृदू स्वरात म्हणाला.

एक क्षणभरच मी त्याच्याकडे बघितलं अन एकदम सारं रक्त डोक्यातच उसळल्यासारखं झालं मला. हातातली पर्स मी दाणकन टीपॉयवर आदळली.

‘सरळ सांग ना, तुला माझ्याबरोबर यायला लाज वाटतेय म्हणून...’

अन ताड ताड पावलं टाकत मी बेडरूममधे गेले. उशीत डोकं खुपसून माझ्या संतापाला मी वाट करून दिली.

हतबुद्ध झालेला हेमंत माझ्या माघारी खोलीत आला असावा. त्याची चाहूल मला लागली, पण नंतर तो काहीही न बोलताच बाहेर गेला.

थोड्या वेळाने मी उठून बाहेर आले तर तो सोफ़्यावर मान मागे टेकवून नुसताच बसला होता. डोळे मिटून. पायातले बूटही न काढता. मला एकदम भरून आलं. बिचारा किती मन राखायचा प्रयत्न करतो आपलं. काय झालंय या सहा महिन्यात आपल्याला?'

त्याच्या जवळ जाऊन मी त्याच्या कपाळावर हात ठेवला. 'सॉरी. खरंच सॉरी. चुकले मी. रागावू नकोस ना. उगाचच राग आला मला... चल जाऊ या बाहेर...'

नेहेमी सॉरी म्हटलं की उडवून लावणारा हेमंत आज हसला नाही. डोळे उघडून, सावरून बसत त्याने माझा हात हातात घेतला.

'तुला बरं नाहीय का? काही त्रास होतोय का? नाहीतर असं करतेस का? भारतात माहेरी जाऊन येतेस का काही दिवस?...'

'असं रे काय विचारतोस? सॉरी म्हटलं ना एकदा?...'माझे डोळे आता काठोकाठ भरून आले.

‘नाही ग, तसं नाही...’हेमंतचा आवाज एकदम कातर झाला.

‘मी घरी का आलो लवकर सांगू तुला?...’घुटमळतच तो म्हणाला.

‘शेजारच्या नूतननं फ़ोन केला मला ऑफ़िसमधे. तू केव्हाची उन्हात, बाल्कनीत बसली होतीस. रडक्या चेहऱ्यानं. तुला तिनं बाल्कनीतून हाकाही मारल्या. पण तू अगदी स्तब्ध होतीस. म्हणून तिनं फ़ोन करून बोलावून घेतलं मला...’

अवाक होऊन, मी त्याच्याकडे बघतच राहिले. डोळयांतून गालावर उतरणारं पाणी पुसायचेही कष्ट न घेता...

माझा माझ्या कानांवर विश्वासच बसत नव्हता. नूतननं हाका मारल्या? कधी? अन मला का ऐकू नाही आल्या? कडक उन्हात बसून बसून डोकं दुखतंय आता. पण तेव्हा अशी पुतळयासारखी का बसून होते मी? काय, काय चाललंय हे सारं?’

भीतीनं थरथरत, विलक्षण घाबरलेल्या मनानं मी हेमंतकडे बघितलं अन पुढच्या क्षणी रडत रडत त्याला घट्ट मिठी मारली.

‘हे काय होतंय हो मला? मी आजारी आहे का? वेड तर लागलं नाही मला? पण मग हे बाकीचं सारं कसं समजतंय? काय करू मी, देवा…’

हुंदके देत मी रडत होते. अन हेमंत माझी समजूत घालत होता.

‘घाबरू नकोस. आपण उद्याच डॉक्टरकडे जाऊन येऊ. काही व्हायरल तापाची वगैरे सुरुवात असेल. अग, या देशात तर कित्ती प्रगत अन पुढारलेलं आहे सगळं. उद्याच डायग्नोसिस होईल बघ. अन अगदी टुणटुणीत होशील तू. मी घेऊन जाईन तुला दवाखान्यात. आता हास बघू छानशी…’

बराच वेळ तो माझं सांत्वन करत होता. मी जराशी शांत झाले. मग तो मला बाहेरही घेऊन गेला. येताना माझं मन बरंच थाऱ्यावर आलं होतं. पण शरीर मात्र अगदी प्रचंड थकल्यासारखं झालं होतं. घरी आलो अन मी पडूनच राहिले. हेमंतनंच खिचडी लावली. त्या बिचाऱ्याला तेवढंच यायचं स्वैपाकातलं. चार घास खाऊन मी झोपूनही गेले. दिवसभराच्या मन स्तापानं मला लगेचच गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी हेमंतनं सकाळीच फोन करून महत्प्रयासानं डॉक्टरची अपॉइंटमेंट ठरवली. वेळेवर मी तयार झाले अन ऑफ़िसमधून तो मला न्यायला आला.

क्लिनिकमधे बाहेर वाट पहाताना मी जरा चिन्ताक्रांतच होते. हेमंतच मधून मधून मला हसवायचा निष्फ़ळ प्रयत्न करत होता.

सोनेरी केसांच्या, हसऱ्या डॉक्टर एलिसनं स्मितहास्यानं आमचं स्वागत केलं. माझ्या सगळ्या तक्रारी, बाल्कनीत बसण्याचा प्रसंग, सारंकाही तिनं नीट लक्ष देऊन ऐकलं. मला नीट तपासलं.

तिच्या प्रसन्न चेहऱ्यावर नेमके कोणते भाव होते ते मला कळण्याआधीच तिनं किंचित गंभीर होऊन मान हलवली.

‘यंग मॅन, आय एम रेफ़रिंग युवर वाइफ़ टु समबडी एल्स... फ़िजिकली शी लुक्स ओके टु मी...’

तिनं हातात दिलेल्या कार्डाकडे आम्ही दोघंही डोळे फाडून बघतच राहिलो...

‘डॉ. मायकेल ब्राऊन, सायकियाट्रिस्ट...’

गाडीत जाऊन बसलो, अन मला पुन्हा एकदा अनिवार रडू कोसळलं.

‘कुठल्या दिशेने चाललाय प्रवास माझा? वेडी ठरवली जाणार होते मी? चार पाच महिन्यांनी भारतात जायचं आहे. तिथे सगळयांची काय प्रतिक्रिया होईल हे सारं ऐकून? आधीच आपण नावडती सून आहोत... त्यात आता हे...’

‘ए बाई, आता रडू नकोस ना. कालपासून किती रडतेस? तू रडलीस ना, की माझं घर रडवं होतं ग. अजून त्या डॉक्टरने सांगितलय का काही? मग कशाला इतका महापूर?’

हेमंत बिचारा समजावून थकला तसं आम्ही दोघं घरी आलो. सगळा दिवस असा उदासवाणा गेला.

पुढच्याच आठवड्यात माझ्या मानसोपचार तज्ञाच्या अपॉइंटमेंट्स सुरू झाल्या. डॉक्टर ब्राऊन अगदी म्हातारा, समजूतदार माणूस होता. त्याचा दवाखाना मनोरुग्णांचा दवाखाना वाटतच नव्हता मुळी. सगळीकडे प्रसन्न वातावरण, मोठमोठ्या खिडक्या अन तऱ्हेतऱ्हेच्या फ़ुलांनी सजलेले फ़्लॉवरपॉट्स.

आम्ही आत गेल्यावर त्यानं मनमोकळं हसत आमचं स्वागत केलं. मलातर तो अगदी सांता क्लॉज सारखाच वाटला.'या प्रेमळ शुभ्र मिशांबरोबर याला पांढरी लांब दाढी असती तर फ़क्त एका लाल टोपीचीच कमी होती'असा मजेशीर विचार माझ्या मनात चमकून गेला.

डॉक्टर ब्राऊननं मला अगदी काळजीपूर्वक तपासलं. बऱ्याच टेस्ट्स करून घ्यायला सांगितल्या. प्रश्नांची तर भलीमोठी यादीच त्याच्याकडे तयार होती. त्या प्रश्नांना उत्तरं देता देता मी थकूनच गेले.

'वेल, माय डिअर, टेस्ट्स चे रिपोर्ट्स येऊ दे आधी. मला खात्री आहे तू यातून अगदी नीट बरी होशील. चीअर अप...'

'पण मला झालंय काय?'धडधडत्या हृदयानंच मी प्रश्न केला.'बोलू आपण त्याविषयी. काळजी करण्यासारखं काहीच नाहीय हे नक्की. हं, अन अजून दोन अपॉइंटमेंट्स अन सारे रिपोर्ट्स हे होऊन जाऊ दे आधी. मग बघू या. टेक केअर...'

माझ्या खांद्यावर हलकेच थोपटत त्याने जणूकाही वेळ संपल्याची सूचनाच दिली आम्हाला.

घरी आलो अन मनातले अप्रिय विचार झटकून टाकायचा अयशस्वी प्रयत्न करत मी स्वैपाकाला लागले. दोन आठवडे होऊन गेले तरी या गडबडीत भारतात फ़ोन करायला झालाच नव्हता.

‘मी लावतोय ग घरी फ़ोन. तुझा स्वैपाक झाला की तुझ्याही घरी लावू या...’हेमंतनं बैठकीतूनच ओरडून सांगितलं.

फ़ोन त्यानं स्पीकरवरच ठेवला होता. आईंनीच घेतला.

‘अरे, किती वाट बघायची? दोन आठवडे झाले की. सगळं ठीक आहे ना रे?’...

‘अग, हिला बरं नाहीय जरा...’

‘अरे देवा, मग तुझ्या जेवणाखाण्याचं काय रे?’

मी हतबुद्धच झाले. बाहेरच्या खोलीत येऊन काहीतरी बोलण्यासाठी मी तोंड उघडणारच होते तोच पाठमोऱ्या हेमंतचा किंचित धारदार आवाज माझ्या कानी आला...

‘अग आई, माझ्या जेवणाची काळजी करण्यापेक्षा ती कशी आहे हे तरी विचारायचंस...’

‘तसं नाही रे... तुम्ही दोघं एकटेच राहता ना तिथे, म्हणून म्हटलं बरं का. कशी आहे तिची तब्येत आता... ?

‘ताप आलाय थोडा... बाकी काही नाही. तुम्ही सगळे कसे आहात?’ हेमंतनं चतुराईनं प्रश्नाला बगल दिली.

‘भाऊजी, गोड बातमी असेल तर सांगा हं मोकळेपणी. बॅग भरून तयारच आहोत आम्ही. तेवढीच अमेरिकाही बघता येईल. मी करीन हो बाळंतपण...’

हा आवाज अनितावहिनींचा.’एक दिवस स्वैपाकाची बाई आली नाही तर लगेच फ़ोन फ़िरवून हॉटेलमधे ऑर्डर करणाऱ्या ह्या. बाळंतपण कसलं करणार डोंबल्याचं?...’

एव्हाना हेमंतचं माझ्याकडे लक्ष गेलं होतं. डोळ्यानंच मला गप्प बसायची त्याने खूण केली. थोडावेळ बोलून, मी झोपलेय असं सांगून त्यानं फ़ोन आवरता घेतला.

‘मी झोपलेय असं का सांगितलंस... ?’

‘मुद्दामच...’

मला जवळ घेत त्यानं सोफ़्यावर बसवून घेतलं.

‘माझ्या घरच्यांचे स्वभाव माझ्याइतके नसले तरी थोड्याफार प्रमाणात तुलाही माहीत आहेत राणी. तू आहेस साधी. उगाच

मानसोपचारतज्ञ वगैरे बोलून जाशील असं वाटलं मला. माकडाच्या हाती कोलीत नको...'

त्याच्या म्हणीचं मला हसूही आलं अन त्याचं सांगणंही पटलं.

दोन आठवड्यानी आम्ही डॉक्टर ब्राऊनकडे परत गेलो.

जास्त न बोलता त्यानं विषयालाच हात घातला. 'यू आर सफ़रिंग फ़्रॉम डिप्रेशन...'

पुढचं ऐकायच्या आधीच खोली आपल्याभोवती फ़िरतेय असं वाटल्याने मी बसल्या बसल्याच टेबलाचा काठ घट्ट धरला.

दवाखान्यातून घरी आले अन माझं सगळं आयुष्यच बदलून गेलं. डिप्रेशन मला का अन कसं आलं हे कळेनाच. काय कमी होतं माझ्या आयुष्यात? देखणा, प्रेमळ पती, पैसा, मानमरातब कशालाच कुठे कमतरता नसताना हे काय भलतंच आक्रीत देवानं माझ्यापुढे वाढून ठेवलं होतं? केवळ घरच्यांच्या बोलण्याने हे इतकं व्हावं हे माझ्या मनाला सयुक्तिक वाटत नव्हतं. कितीतरी घरी अशा

घटना घडतात. सून अन सासरचे यांच्यात अगदी पराकोटीचे वादही असतात, पण म्हणून काय सगळे मानसिक नैराश्याने ग्रासतात थोडेच?माझ्यातच काहीतरी दोष असला पाहिजे. त्याशिवाय हे झालंच कसं?

विचार करकरून डोकं फुटायची पाळी आली होती. तशी मी लहानपणापासून मनस्वीच. सकाळ झाली की आधी पायरीवर नुसतीच बसून राहणार. बागेत उमललेली इवलीइवली फ़ुलं, पानांआडून डोकावणाऱ्या कळया, हिरव्यागार गवतावर डुलणारे दवबिंदू... हे सारं अगदी मनात साठवून घेत कितीतरी वेळ मी बसून असायची. आईचा ओरडा सुरुच असायचा दूध घे, काही खा म्हणून. पण मी आपल्याच विश्वात हरवलेली असायची. दोघं मोठे भाऊ तर मला कायम वेडाबाई... म्हणूनच हाक मारायचे. पण ते गमतीनं.

पण ही गंमत अशा क्रूर स्वरुपात नियतीनं सत्यात उतरवायची ठरवली होती तर...

डॉक्टर ब्राऊननं मला गोळ्या लिहून दिल्या होत्या. रोज एक गोळी पुरेशी आहे. त्यानं सगळे त्रास कमी व्हायला लागतील असं तो बोलला होता.

हेमंतनं जाऊन लगेच त्या गोळ्या आणल्या.

‘मला काहीही झालेलं नाहीय. मी हे औषध मुळीच घेणार नाहीय…’

मी अगदी ठामपणे त्याला सांगितलं.

‘वेडी की काय तू?’

शब्द तोंडातून निघून गेले अन हेमंतनं जीभ चावली. माझी नजर त्यानं चुकवल्याचं लगेच माझ्या लक्षात आलं.

‘म्हण ना बोल बोल. थांबलास कशासाठी? मला नकोत या गोळ्या. माझ्या वेडेपणावर शिक्कामोर्तबच होईल मग. नियमितपणे औषध घ्यायला लागले तर…’

मी काय बरळत होते माझं मलाच कळत नव्हतं.

‘एक शब्द न बोलता ही गोळी घे तू आधी. पुरे झाला हट्टीपणा…’

माझा हात घट्ट धरून त्यानं ती गोळी मला घ्यायलाच लावली. लग्नानंतरच्या इतक्या दिवसात प्रथमच मी त्याचा राग बघत होते. त्याला घाबरूनच की काय मी मुकाट्यानं ती गोळी गिळून टाकली अन आत येऊन निजून राहिले.

पडल्या पडल्याच माझा डोळा लागला असावा. मधूनच स्वैपाकघरातून भांड्यांचे, फ्रीज उघडल्याचे आवाज येत होते. पण मी अर्धवट झोपेतच होते. उठावसं मनात होतं पण शरीरानं पार असहकार पुकारला होता. माला, माझी मैत्रीण मानसोपचार तज्ञ होती. तिच्याबरोबर एकदा मी दवाखान्यात गेले होते. तिथल्या भान हरपलेल्या, शून्यात नजर लावून बसलेल्या बायका माझ्या स्वप्नांमधे थैमान घालत होत्या. मधूनच हेमंतचा प्रेमळ हात डोक्यावरून फ़िरतोय असा भास होत होता. आईच्या लाडानं मारलेल्या हाका आठवत होत्या. सारं कसं सरमिसळ झालं होतं मनाच्या पडद्यावर...

काचेचा ग्लास खळकन पडून फ़ुटल्याच्या आवाजाने मी खडबडून, पूर्णपणे जागी झाले.

‘काय फ़ुटलं रे...’असं विचारतच मी स्वैपाकघरात गेले अन माझी उरलीसुरली झोपही पळाली.

डोकं घट्ट धरून हेमंत जेवायच्या टेबलाजवळ खाली जमिनीवरच बसला होता. अंगात त्राण नसल्यासारखा...

‘काय होतंय तुला? चक्कर येतेय का... ?’विचारतच मी त्याच्या कपाळावर हात ठेवला अन चटकाच बसला मला.

‘अरे, तुला किती ताप आहे... फ़णफ़णलायस अगदी.’

‘सकाळपासूनच जरा कोमट वाटत होतं ग अंग. आता मात्र...’पुढचे शब्दही त्याला बोलवेनात. गळून गेल्यासारखा तो जागेवरच बसून राहिला.

हेमंतला हाताला धरून आधार देत देतच मी आतमधे नेऊन निजवलं. ताप उतरवायची औषधं त्याला आधी दिली. गुंगीत तो बराच वेळ कण्हत होता. फ़ॅमिली डॉक्टरला फ़ोन केला.

‘ताप किती आहे बघ आधी...’तिनं सांगितलं.

‘एकशेतीन आहे. थोडा जास्तच...’

‘आत्ता तू ताप उतरवायचं औषध दिलंयस न. तीन चार तास वाट बघ. पुन्हा चढायला लागला तर घेऊन ये दुपारी...’

फ़ोन बंद करून मी हेमंतकडे वळले. त्याला एव्हाना झोप लागली होती. डोक्यावरचे विस्कटलेले केस नि तापानं लालसर झालेला चेहरा यानं तो अगदीच बापुडवाणा दिसत होता बिचारा.

त्याच्या अंगावर हलकेच पांघरूण टाकून मी स्वैपाकघरात आले.

काय अवस्था होती स्वैपाकघराची. जागोजागी पडलेली खरकटी भांडी, भाज्यांच्या साली, भरून वाहणारी कचऱ्याची बास्केट... शी... माझ्याच्याने बघवेचना. माझ्या मनाच्या भावनिक आंदोलनांमधे किती किती दुर्लक्ष झालं होतं घराकडे...

बाकीच्या खोल्यांमधे जाऊन बघितलं. थोड्याफार फ़रकाने अगदी हीच अवस्था होती. फ़ुलदाण्यांमधली सुकलेली फ़ुलं, अर्धवट उघडे ड्रॉवर्स, कपाटांवर साचलेली धूळ... देवा देवा...

आत जाऊन एक जुना शर्ट चढवून आले मी, अन साफ़सफाईला सुरुवात केली. एकेका खोलीपासून सुरुवात करत साऱ्या घराचा कायापालट करायला सुरुवात केली. सगळं पूर्ण

झालं तोवर अगदी घामाघूम झाले होते. पण घर मात्र एकदम सुरेख दिसत होतं. गॅलरीतून गुलाबाची दोन टवटवीत फ़ुलं काढून आणली, अन फ़्लॉवरपॉटमधे सजवली. एकदम फ़्रेश वाटायला लागलं होतं मला आता.

हेमंतच्या खोलीत डोकावले. त्याचा ताप उतरला नव्हताच. उलट तो अजूनच गळून गेल्यासारखा दिसत होता. झटपट आंघोळ करून तयार झाले, अन गाडी काढलीच. त्याला दवाखान्यात घेऊन गेले. औषध, अन थोडं सामान, भाजी, येतानाच आणली. घरी आलो अन औषध देऊन त्याला झोपायला लावलं मी. किती असहाय, थकलेला वाटत होता तो या क्षणी. माझे डोळे भरून आले.

तेवढ्यात फ़ोन खणखणला. भारतातून आईंचा फ़ोन होता. थोडं बोलून, मी कॉर्डलेस हेमंतच्या हातात नेऊन दिला.

‘अग हो, आता बरा आहे मी. तिनं औषधं आणलीत आज... अग, थोडा वीकनेस आलाय ना, म्हणून आवाज थकलेला वाटतोय...’

‘अं, नाही, कांचनच्या लग्नाला येणं नाही जमणार आई. मला सुट्टी मिळणं अशक्य वाटतंय... अग दादा नि वहिनी आहेत ना... काळजी कशाला करतेस?’

थोडं इकडचं तिकडचं बोलून त्यानं फ़ोन ठेवला.

‘हे काय, कांचनच्या लग्नाला नाही जाणार आपण?’

हातानं त्याच्याजवळ थोपटत त्यानं मला जवळ बसायची खूण केली...

‘राणी, आधी तुला नीट बरं वाटू दे. तुझं दुखणं काय आहे याचा थोडा जरी सुगावा घरी लागला ना, तर तुलाच खूप त्रास होईल. विश्वास ठेव माझ्यावर. मी पूर्ण विचार करूनच घेतोय हा निर्णय...’ एवढं बोलून, थकून जाऊन त्यानं डोकं उशीवर टेकवलं.

‘बरं. ते पाहू नंतर. झोप बघू तू आता...’

त्याचं पांघरूण सारखं करून मी बाहेर आले. हातात वाफाळत्या कॉफ़ीचा कप घेऊन बाहेर बाल्कनीत जाऊन बसले खरी, पण मन विचारात गढून गेलं होतं.

‘किती गोष्टी घडून गेल्या होत्या या काही दिवसात. अन या साऱ्यात हेमंत किती काळजी घेत होता माझी. केवळ माझं दुखणं कोणाला कळू नये म्हणून तो एकुलत्या एका बहिणीच्या लग्नाला न जाण्याचा निर्णय घेत होता. माझ्या काळजीनं किती बेजार झाला होता तो. ऑफ़िस, घरचं सगळं बघून वर माझे मूड्स सांभाळत होता. नवा देश, नवं वातावरण, याचं त्याच्या मनावर दडपण नसेल का येत?’

‘लहानपणापासून आपल्याकडे पुरुषाला खंबीर व्हायचंच शिक्षण दिलं जातं. त्यानं बायको मुलांची काळजी घ्यावी म्हणून. घराचा आधारस्तंभ व्हावं म्हणून. पण त्याच्या मनाची काळजी नको का घ्यायला कुणीतरी? आपलं दुखणं तो जगापासून लपवतोय. त्यावर पांघरूण घालतोय सतत. आपण वेळ आली की चिडचिड करतो त्याच्यावर. त्यानं कोणाजवळ बोलायचं हे? किती त्रास होत असेल त्याच्या मनाला. कितीही खंबीर असला, तरी जीवघेण्या वादळात कोसळायचा धोका अगदी मोठ्या वृक्षालाही असतोच की.’

‘आपल्या या दुखण्यानं, या सततच्या मानसिक दडपणानं तर आजारी नसेल ना पडला तो? छे… फारच चुकतंय आपलं. आपल्यालाही खंबीर व्हायला हवंय आता. डॉक्टर ब्राऊननं

सांगितलंय,'मनात उदासवाणे विचार आले की बाहेर फ़िरायला जायचं, आपलं मन रमेल, आपल्याला आवडेल अशा कामात स्वत ला गुंतवून टाकायचं...'.

'येऊ नये ते दुखणं आलं खरं, पण आता त्यावर उपाय करायला हवाय. हा सुखाचा संसार, असा समजून घेणारा नवरा हे सारं उध्वस्त होण्यापासून वाचवायला आपणही प्रयत्न करायला हवेतच.'

'आयुष्यात नेहमीच मनासारखं दान पडतं असं नाही. पण एक दान मनाविरुद्ध गेलं म्हणून हताश व्हायचं नसतं, उलट उरलेला डाव कसा सावरता येईल हे बघायचं असतं. पुढचं दान मनासारखं पडण्याची वाट बघायची असते...'

'आपल्याला जिवापाड जपणाऱ्या नवऱ्याला आपणही साथ द्यायला हवी. खंबीर होऊन, या वादळातून बाहेर पडण्यासाठी दोघांनी एकमेकांना हात द्यायला हवा...'

किती तरी दिवसांनी मन जरा शांत वाटत होतं. हातातल्या कॉफ़ीसारखाच माझ्या मनावर समाधानाचा हलकासा तवंग पसरला होता.

तीनचार दिवसात ताप उतरून हेमंत ऑफ़िसला जाऊ लागला. यावेळी डॉक्टर ब्राऊनच्या अपॉइंटमेन्टला मी एकटीच जाईन असं त्याला सांगितलं होतं. एरवी तो मला कधीच एकटं जाऊ देत नसे. पण त्यादिवशी त्यालाही खूप काम होतं, नि सुट्टी घेतल्याने झालेला बॅकलॉग भरून काढायचा होता. म्हणून त्यानंही जाऊ दिलं मला.

डॉक्टर ब्राऊनशी मी अगदी मनमोकळं बोलले. मनातले सारे प्रश्न विचारून टाकले. सगळ्यात मुख्य म्हणजे माझं मन दुबळं असल्याने हे झालं का हा प्रश्न होता माझा.

‘नो नो डिअर. स्वतः ला मुळीच दोषी समजू नकोस... मेंदूच्या काही भागातलं केमिकल द्रव्य कमीजास्त झाल्याने घडतं हे. त्याची परिणिती आहे ही. अन डिप्रेशन मधे पेशंटचा दोष काहीच नाही. शरीराच्या दुखण्यासारखंच हे मनाचं दुखणं. नियमित औषधानं अगदी पूर्ण बरी होशील तू...’

बराच वेळ त्यानं मला समजावलं. माझं मन आता पिसासारखं हलकं झालं होतं.

घरी येऊन मी छान तयार झाले. अगदी नव्या पद्धतीची केशरचना, नवा ड्रेस. हेमंत घरी आला तेव्हा मी त्याची वाटच बघत होते. त्याची आवडती साबुदाण्याची खिचडी नि वेलची घातलेली कॉफ़ी तयार ठेवून.

माझ्याकडे बघून आश्चर्याचा धक्काच बसला त्याला. ‘खाऊन घे नि लवकर तयार हो. आपल्या नेहमीच्या तळ्याकाठच्या जागी फ़िरायला जाऊया...’

‘आज अचानक काय झालं... ?’वाक्य अर्धवटच ठेवून त्यानं माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेनं बघितलं.

त्याचं माझ्यावरचं प्रेम, माया, याची अनुभूती नव्यानेच झाल्यासारखं वाटत होतं मला.

‘मला बरं व्हायचंय हेमंत... गोळ्याही नियमित घेतेय मी. नि यापुढेही घेणार आहे. मला अगदी नीट बरं व्हायचंय. तुझ्यासाठी... आपल्या दोघांसाठी...’ वाक्य अर्धवटच सोडून मी त्याच्या कुशीत शिरले.

फ़ुलदाणीतली गुलाबाची फ़ुलं मजेत डुलत होती.

# हक्क

सकाळपासूनच आभाळ भरून आलं होतं. कोणत्याही क्षणी पाऊस बरसायला सुरुवात होणार होती. हा असा उदास दिवस वैदेहीला मुळीच आवडत नसे. त्यातून आज श्याम उशिराच घरी येणार होता. अन सुशांत त्याच्या मित्राकडेच रहाणार होता अभ्यासासाठी. काही प्रोजेक्ट्स पूर्ण करायचे होते दोघांना मिळून. म्हणजे रात्री दहा पर्यंत वैदेही एकटीच होती घरी.

दुपारपासून कुठे कपाट आवर, कुठे पुस्तक वाच असं करून अंगावर येणारा वेळ कसा बसा काढला होता वैदेहीनं. पण आता फारच कंटाळा यायला लागला होता तिला. स्वैपाक उरकला, डिशवॉशरही लावून झालं, आता मात्र ती पुरतीच वैतागली होती.

गरमगरम वाफाळत्या कॉफ़ीचा कप घेऊन ती व्हरांड्यात येऊन बसत नाही तोच बेल वाजली.

‘आता या वेळी कोण आलं असेल बरं?’ मनाशी नवल करतच ती उठली. बघते तर दारात सुशांतच उभा होता.
‘का रे, काय झालं?’

‘अग स्कॉटच्या वडिलांची तब्येत अचानक बिघडली. म्हणून तो अन त्याची आई गेलेत दवाखान्यात त्यांना घेऊन. मग घरीच आलो झालं. बाबाही उशिरा येणार आहेत ना ग?’

‘हो ना रे. बरं झालं तू घरीच आलास ते. अगदी बोअर झाले होते बघ मी...’

सुशांत हलकेच हसला. गव्हाळ वर्णाचा नि भरपूर उंचीचा लेक असा हसला की वैदेही अगदी निरखून बघत असे त्याच्याकडे.’मातृमुखी अन सदा सुखी’असं आई म्हणायची त्याची आठवण तिला अशा वेळी हटकून येई.

‘ममा, भजी कर ना ग मस्तपैकी. बाबांना खूप आवडतात. अन बघ कशी अगदी’भज्यांचीच हवा’आहे...’

‘अरे लबाडा, बाबांचं नाव कशाला रे सांगतोस? तुला हवीत म्हण ना...’

‘एकही बात है मदर इंडिया...’

अन वैदेहीबरोबर तो देखिल खळखळून हसला.

आंघोळ करून सुशांत आला तोवर पाऊस पडायला सुरुवात झाली होती. वैदेहीनं आधी श्यामची आवडती चटणी मिक्सरमधून काढली. भज्यांचं पीठ भिजवणार तोच बेलचा कर्कश्श आवाज पुन्हा घुमला.

‘बघ रे राजा जरा... आज तुझे बाबाही लवकर आलेले दिसतात...’

वैदेहीचं वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच सुशांतनं दार उघडलंही होतं.

पण दारात श्याम नव्हताच. एक गौरवर्णी, मध्यम वयाचा माणूस उभा होता. डोळ्याला सोनेरी काड्यांचा चष्मा, फ्रेंच कट दाढी नि किंचितसे घारे डोळे... अंगावरचे कपडे थोडे भिजलेले.

‘येस... ?’

सुशांतनं प्रश्नार्थक नजरेनं त्याच्याकडे बघितलं.

अन बाहेर चमकलेल्या विजेच्या लोळाबरोबरच त्याच्या तोंडून सावकाश, कष्टानं आल्यासारखे शब्द आले...,

‘यंग मॅन, आय एम युवर डॅडी...’

‘सर, यू आर मिस्टेकन.’किन्वा’यू आर इन द रॉन्ग हाऊस...’असं काहीतरी बोलायच्या विचारात असलेला सुशांत एकदम गप्प झाला.

बाहेर आलेल्या वैदेहीचा चेहरा पांढराफ़टक पडला होता. एखाद्या दगडी पुतळ्यासारखी ती स्तब्ध उभी होती. कुठल्याही क्षणी खाली कोसळेल अशी.

‘आई, ...’ गोंधळलेला सुशांत आळीपाळीनं एकदा वैदेहीकडे नि एकदा त्या अपरिचित व्यक्तीकडे बघत होता.

‘कोण आहे हा माणूस? खुशाल आपला बाप आहे म्हणून सांगतोय... अन आई त्याला घरातून हाकलून लावायच्या ऐवजी इतकी सैरभैर का बरं झालीय?...’

त्याला काहीच कळत नव्हतं.

या द्विधा मनस्थितीतून त्याची सुटका त्या माणसानेच केली.

‘आय एम सॉरी. मी फ़ोन करायला हवा होता आधी. कल्पना द्यायला हवी होती. वैदेहीला फारच धक्का बसलेला दिसतोय माझ्या येण्याचा. निघतो मी...’

डोक्यावरची हॅट तिरकी बसवत तो भर पावसात भिजतच निघून गेला.

त्याच्या मागे धाडकन दार लावून घेत सुशांत वळला. वैदेहीला आधार देऊन त्यानं खुर्चीत बसवलं.

‘ममा, काय प्रकरण आहे हे सारं? तू ओळखतेस का त्या माणसाला... ?

सतरा अठरा वर्षांच्या, अजून तारुण्य अन बालपण या दोन्हीच्या उंबरठ्यावर घुटमळत असलेल्या मुलाच्या स्वरातली धार वैदेहीला असह्य झाली.

‘तू थोडा शांत बस पाहू. मला एकटीला राहू दे जरावेळ...’

सोफ़्यावरची उशी मानेखाली घेत तिनं डोळे मिटून घेतले. सगळ्या शरीरातला उत्साह, ताकद, जणूकाही कोणीतरी काढून

घेतलय असं तिला वाटत होतं. सुशांत वर खोलीत निघून गेला अन बसल्या जागी ती आडवीच झाली. काळीज अजूनही धाडधाड उडत होतं तिचं. कोसळणाऱ्या पावसाच्या धारांचा आवाज अन मनातलं वादळ या दोन्हींच्या संगतीत ती बराच वेळ पडून होती.

दारात लॅच की सरकवल्याचा आवाज आला अन ती उठून बसली. श्याम घरी आला होता.

‘हुश्श, दमलो बुवा. आज या पावसानं अगदी कंटाळा आणलाय...’
वैदेहीच्या मुद्रेकडे लक्ष जाताच तो बूट काढता काढता क्षणभर थबकला.

‘काय ग? आज उदासशी? अग, आज तर जाम खुश होणार बघ तू. ऑफ़िसमधला सुकुमारन आला परत भारतातून. अम्मानं खास साडी पाठवलीय तुझ्यासाठी...’

हातातलं पॅकेट तिच्याशेजारी ठेवत तो तिच्या बाजूला बसला. नेहेमीच्या तिच्या उत्फ़ुल्ल स्वभावाप्रमाणे ती झडप घालून ते

पार्सल उघडेल अन साडी स्वतः भोवती लपेटून आरशात बघेल अशी अपेक्षा होती त्याला.

पण वैदेहीचा काही प्रतिसादच येईन तेव्हा तिच्याभोवती हात घालून तिला त्यानं मायेनं जवळ घेतलं.

'मला सांगणार नाहीस?...

दुसऱ्याच क्षणी सारा बांध फ़ुटला तिचा. श्यामच्या खांद्यावर डोकं ठेवून तिनं एक जीवघेणा हुंदका दिला.

'तो... तो आला होता रे आज. श्याम, मला खूप भीती वाटतेय रे...'

'कोण, सुनील?...'

एकदम धसकून जात श्यामनं विचारलं. जणू वैदेहीचं भावविश्व ढवळून टाकणारी एकच व्यक्ती या जगात आहे हे ठाऊक असल्यासारखं.

पण पुढच्याच क्षणी तो शांत, गंभीर झाला.

'काय झालं? काय म्हणाला तो?...'

‘लगेच निघून गेला. पण सुशांतला भेटला रे तो. त्यानंच दार उघडलं सुनीलला. अन तो त्याचा डॅडी असल्याचंही बोलला तो...’

‘सुशान्त कुठे आहे?’

श्याम पटकन उठून उभा राहिला.

‘त्याला आधी सावरायला हवं राणी. तो किती बावरलेला असेल... तू जेवणाची तयारी कर. मी आलो त्याला घेऊन.’

दोन पायऱ्या एकाच वेळी चढत श्याम वरती गेला. सुशांतशी तो काय बोलला ते वैदेहीचा ऐकू आलं नाही. पण सुशांत मुकाट्यानं त्याच्याबरोबर खाली आला.

वैदेहीच्या तोंडाची चवच गेली होती. सुशांतही नुसताच अन्न चिवडत होता. एकटा श्याम मात्र कमालीच्या शांतपणे जेवत होता.

जेवणं उरकून तिघं बाहेरच्या खोलीत आले. बाहेरचा पाऊस आता आणखीच तडतडत होता. नेहेमीपेक्षाही नकोसा वाटला तो वैदेहीला.

‘बस सुशांत. आम्हाला दोघांनाही तुझ्याशी काही बोलायचंय...’

सुशांतनं एक तीव्र दृष्टीक्षेप वैदेहीकडे टाकला.

‘तो कोण होता ते स्पष्ट सांगा मला आधी... इज ही रिअली माय फादर?’

एका दमात, धाप लागल्यासारखा सुशांत बोलला.

‘हो, तो खरंच बोलला. ही इज युवर फादर. नीट ऐकून घे. मग त्रागा कर बेटा. आम्हा दोघांचं लग्न व्हायच्या आधी...’

‘आईचं प्रेम होतं त्याच्यावर? म्हणजे मी तुमचा मुलगा नाही? मी सुशांत नटराजन नाही? अन हे तुम्ही दोघांनीही लपवलं माझ्यापासून? खोटं बोलली आई माझ्याशी...’

अतीव संतापाने, श्यामचं बोलणं पूर्ण न होऊ देताच तो ओरडला. त्याच्या उंच कपाळावरची शीर थाडथाड उडत होती.

‘वॉच युवर माऊथ, सुशांत. यू आर टॉकींग टु युवर मदर...’

श्यामचा आवाज वाढला तसा सुशांत पुन्हा खाली बसला. पण मनातल्या मनात तो धुमसतच होता.

'नीट ऐक आधी आई अन मी सांगतोय ते. अन पूर्ण ऐकल्याशिवाय एक शब्दही बोलू नकोस...'

नेहेमीच्या संयमी आवाजात श्यामनं सुशांतला सारा भूतकाळ सांगायला सुरुवात केली. सुशांत लक्ष देऊन ऐकत होता. पण वैदेहीचं लक्ष तिकडे नव्हतंच. तिच्या डोळ्यांसमोरून पूर्वायुष्याचा चित्रपट सरसर उलगडत होता.

मध्यम परिस्थितीतल्या आईवडिलांची वैदेही एकुलती एक लेक. दिसायला आखीवरेखीव, सावळ्या वर्णाची नि सुरेख केसांची. अभ्यासात जात्याच हुशार. दहावी, बारावी अन इंजिनियरिंगचं शिक्षण पूर्ण करून नामांकित कंपनीत नोकरी पटकावते काय, अन वर्षभरातच कंपनी तिला परदेशी पाठवायचा निर्णय घेते काय, सारंच इतकं भराभर घडत गेलं की मित्रमैत्रिणी, नातेवाईक सारे हेवा करत होते. आईबाबांना तर आपल्या सुविद्य, सुस्वरूप मुलीला कुठे ठेवू नि कुठे नको असं होऊन जात असे.

'आयुष्यात सारंकाही मनासारखं मिळतं बाई तुला...'असं म्हणणाऱ्या सगळ्यांना आणखी एक धक्का बसला. दिवाळीच्या सुट्टीसाठी भारतात आलेल्या वैदेहीचं लग्नही ठरलं ते अगदी पटकन. नात्यातल्याच कुणीतरी सुनीलचं स्थळ सुचवलं.

शिकलेला, चांगल्या खानदानी घरातला सुनील अमेरिकेतच नोकरी करीत होता. खरंतर त्याला वैदेहीसारखी करियर गर्ल नको होती. पण त्याच्या घरच्या साऱ्यांनाच वैदेही खूप आवडली, अन त्या दोघांचं लग्न थाटात पार पडलं. सुखाच्या हिंदोळ्यावर झुलतच वैदेही त्याच्या बरोबर विमानात बसली.

टेक्सासला आल्यावर काही दिवस अगदी फ़ुलपाखरासारखे उडून गेले. वैदेहीला तिच्या कंपनीनं आनंदानं तिथल्या प्रोजेक्टवर नेमणूक दिली. अगदी नव्या नवलाईचा दोघांचा संसार सुखाचा चालला होता. पुढे येणाऱ्या नशिबाच्या फ़ेऱ्यांची थोडीही कल्पना वैदेहीला नव्हती. सुनील आता मधून मधून वीकएंडला कामासाठी बाहेर रहातो, उशिरा येतो हे तिला कधीकधी खटकायचं पण परत आल्यावर तो इतका गोड वागत असे, की ती अगदी मोहरून जायची.

अन एका काळयाकुट्ट शनिवारी, वैदेहीच्या ध्यानीमनीही नसताना ते घडलं.

सकाळी नाश्ता करून, दोघांनीही बाहेर जायचं ठरलं होतं. त्याप्रमाणे वैदेही तयार होत होती. सुनील आंघोळीला गेला असताना दारावर टकटक झाली.

वैदेहीनं की होल मधून बघितलं. दारात एक परदेशी स्त्री उभी होती. कडेवर दोन वर्षांचं गुटगुटीत मूल...

'इज सुनील हिअर?'

वैदेही काही बोलणार तोच सुनील खोलीत आला. त्या स्त्रीकडे बघून तो इतका दचकला की वैदेहीच्या मनात एकदम अशुभाची शंका आली.

पण त्या स्त्रीनं सुनीलला काही संधीच दिली नाही. एखाद्या चंडिकेसारखी ती त्याच्यावर तुटून पडली.

'यू चीटेड मी. हाऊ कुड यू डू धिस टु मी... ?'असं किंचाळत ती एका हातानं त्याला थापडा मारू लागली.

वैदेहीचा अगदी दगड झाला. तिच्या तोंडातून शब्दही फ़ुटेना.

'हिला फ़सवलं म्हणतेय ही, अन माझं काय? माझं तर आयुष्यच उध्वस्त केलं यानं...'

बातमी मिळताच वैदेहीचे आईबाबा अथक प्रयत्न करून, कसाबसा व्हिसा मिळवून अमेरिकेत पोचले. लाडक्या लेकीची अवस्था बघून ते बिचारे पारच खचून गेले.

‘पोलिसात देऊ या त्याला. असा सोडणार नाही मी. माझी मुलगी काय रस्त्यावर पडली होती काय?’ बाबांना संताप आवरेना. पण वैदेहीनं अन तिच्या आईनंच त्यांना शांत केलं.

‘जे घडायचं ते घडून गेलंय बाबा. एकतर त्याचं एक लग्न आधीच झाल्याने आमचं लग्नही वैध नाही. अन कोर्टानं त्याला करायला भाग पाडला, तरी मला त्या नीच माणसाबरोबर संसार करायचा नाहीय आता... मी माझ्या पायांवर उभी आहे. माझं आयुष्य जगायला समर्थ आहे मी...’

वैदेहीनं निक्षून सांगितलं होतं. सुनील केव्हाच त्याच्या बायकोबरोबर रहायला गेला होता.

पण वैदेहीच्या दुर्दैवाचे दशावतार अजून संपले नव्हते. थोड्याच कालावधीत तिला दिवस असल्याचं लक्षात आलं, अन ती मुळापासून कोसळून पडली.

तिनं सुनीलला फ़ोन केला. पण अपेक्षेप्रमाणंच त्यानं कुठलीही जबाबदारी घ्यायला नकार दिला.

आता वैदेहीसमोर बाळाला जगात येण्याआधीच नाहीसं करणं एवढा एकच उपाय होता. पण आईबाबांनी खूप समजावून सांगितलं, तरी तिचा जीव ते करू धजावत नव्हता. सगळीकडून अंधार दाटून आल्यासारखं तिला वाटत होतं.

अशीच एक दिवस, विमनस्क अवस्थेत ती ऑफ़िसच्या लंच टाईममधे डबा उघडून बसली होती. पहिला घास घेणार तोच समोरच्या टेबलावरून शब्द आले,

‘कितने दिन हो गये अम्मा के हाथ की इडली खाये...’

वैदेहीनं दचकून त्या दिशेला बघितलं. श्यामल वर्णाचा, भरपूर उंचीचा एक तरुण तिच्याकडे बघून हसत होता.

‘लीजिये ना. मेरी मां ने बनायी है...’

वैदेहीनं डब्याच्या झाकणात दोन इडल्या अन चटणी घालून त्याला दिली. त्यानंही निस्संकोचपणे त्या घेतल्या. वर आपल्या डब्यातला दहीभात तिला देऊ केला.

श्याम नटराजन. मूळचा मद्रासचा पण शिक्षणानिमित्ताने अन नोकरीसाठी बराच काळ मुंबईत राहिलेला होता तो. वैदेहीच्या सेक्शनमधे बाकी कोणीच भारतीय नव्हते.

आधी ती संकोच अन स्वतः च्या वेदनेच्या कोशात गुरफ़टून गेल्याने श्यामशी मोजकंच बोलत असे. पण दिलखुलास स्वभावाच्या नि अस्खलित मराठी बोलू शकणाऱ्या श्यामनं आपल्या स्वभावानं तिची मैत्री अन विश्वास लवकरच संपादन केला. एकदा दोनदा तो वैदेहीला सोडायला घरी सुद्धा आला.

थोड्याच दिवसात वैदेही अन श्यामची घनिष्ट मैत्री जमली. श्यामनंही तिचा भूतकाळ समजल्यावर तिच्या मनावर फ़ुंकर घालायचा प्रयत्न केला. पण आपल्या मर्यादा त्यानं कधीच सोडल्या नाहीत.

अन महिनाभरातच त्यानं वैदेहीच्या घरी तिच्याशी लग्न करण्याबद्दल विचारलं.

घरात आधी साऱ्यांना धक्काच बसला. या मुलात तर काही खोट नाही ना, असंही त्यांना वाटून गेलं. पण श्यामची भावना

एकदम प्रामाणिक होती. त्याला वैदेही मनापासून आवडली होती. त्याच्या घरात फ़क्त म्हातारी आई होती. तिचा अर्थातच या लग्नाला तीव्र विरोध होता.

वैदेहीनं आधी नाहीच म्हटलं त्याला. पण आईबाबा नि स्वतः श्यामनं तिची खूप समजूत घातली. तिच्या होणाऱ्या मुलाचं पितृत्व स्वीकारायला तो तयार होता.

शेवटी श्यामच्या निर्मळ मनाचा विजय झाला होता. एका प्रसन्न दिवशी कोर्ट मॅरेज करून वैदेहीची सौ. वैदेही श्याम नटराजन झाली.

सुशांतच्या जन्माच्या वेळी श्याम तिचा हात घट्ट धरून उभा होता. बर्थ सर्टिफ़िकेट वर जेव्हा त्यानं सुशांत श्याम नटराजन लिहिलं तेव्हा वैदेहीचे डोळे भरून आले होते.

सहा महिन्यांचा व्हिसा संपून आईबाबा भारतात परत गेले. या सहा महिन्यात वैदेहीच्या जगात केवढी मोठी उलथापालथ झाली होती. पण निदान तिच्या आयुष्याचं तारू श्यामसारख्या मजबूत नावाड्याच्या हाती सुखरूप लागलं याचाच आनंद मानून, डोळे गाळतच ते मायदेशी परतले.

सुशांतनंतर वैदेहीला पुन्हा मूल झालंच नाही. पहिल्या बाळंतपणातील काही गुंतागुंतीमुळे तिला मूल होणं शक्यच नाही असा रिपोर्ट आला तेव्हा ती अनिवार रडली होती. पण श्यामनंच तिचं सांत्वन केलं.

‘अग वेडे, त्याच्या नि आपल्या प्रेमात वाटेकरी येणार नाही तेच बरंय.’तो हसून म्हणाला होता.

सुशांत जसाजसा मोठा होऊ लागला तसे वैदेहीपेक्षाही श्यामशी त्याचे मायेचे बंध विणल्या जाऊ लागले. श्यामनंही तसंच त्याच्यावर प्रेम केलं. टेक्सास सोडून ते नंतर दुसरीकडे स्थायिक झाले. श्यामनं नोकरीही बदलली. ग्रीन कार्ड आल्यावर वैदेहीनं मात्र नोकरी सोडून पूर्ण वेळ सुशांतच्या संगोपनातच घालवायचं ठरवलं.

आयुष्याची विस्कटलेली घडी नीट बसली होती. श्यामच्या आई एकदा येऊन गेल्या, अन सुनेचं सावळं सौंदर्य अन शालीनतेने त्यादेखिल हरखल्या.

सारंकाही सुरळीत चाललं होतं, अन सुशांत कॉलेजला जायच्या वेळी सुनीलच्या रूपानं हे सावट पुन्हा तिच्या संसारावर घिरट्या घालू लागलं होतं.

श्यामनं सांगितलेलं सारंकाही सुशांतनं नीट ऐकून घेतलं. काही काळ खोलीत जीवघेणी शांतता पसरली.

सुशांतच्या डोळ्याच्या कडांना पाणी साचलं होतं. ते तसंच ओघळू देत, ओठ दाताखाली दाबून तो हलकेच म्हणाला,

‘मी बाबांना, ... म्हणजे त्या माणसाला भेटलो एकदा तर चालेल का? मला एकदा भेटायचंय त्यांना...’

‘बाबा’हे संबोधन सुनीलसाठी ऐकून श्यामला कोणीतरी आपल्या काळजावरून सुरी फ़िरवतय असं वाटलं.

‘हो, जरूर. तुला वाटेल तेव्हा भेट तू...’

आवाज प्रयत्नपूर्वक काबूत ठेवत तो म्हणाला.

सुशांत पुढे काहीही न बोलता उठून वर गेला.

वैदेही अन श्याम कितीतरी वेळ निशब्द बसून होते.

पुढे साऱ्या नकोनकोशा वाटणाऱ्या घडामोडी अगदी वेगानं आकार घेत गेल्या. सुनीलनंही फ़ोन करून सुशांतला भेटायची इच्छा व्यक्त केली. श्यामनं अगदी हसतमुखानं त्याला होकार दिला. सुशांत तर त्या दिवसापासून वैदेही अन श्यामशी कामापलिकडे बोलतच नव्हता. प्रत्येकाच्या मनात एक काहूर माजलं होतं. घरातली शांतताही कमालीची स्फ़ोटक बनली होती.

पुढच्या आठवड्यात रविवारी सुनील अन सुशांतची भेट होणार असं ठरलं. वैदेही अन श्याम त्याला हॉटेलमधे सोडून देणार होते. सुनील तिथेच येणार होता. तासा दीड तासानं ते सुशांतला परत न्यायला येणार होते.

वैदेहीला सारखं रडू येत होतं. मधूनच ती श्यामला बिलगून रडतही असे.

‘तू रडू शकतेस वैदेही. मी पुरुष आहे ग. मला रडताही येत नाही. वर्षानुवर्षं मेहनत करून एखादी सुरेख मूर्ती बनवावी अन

कुणा दुसऱ्याच माणसानं ती चोरून न्यावी तसं वाटतंय मला…’तो एकदा खिन्नपणे म्हणाला होता.

पण तितक्याच धीरोदात्तपणे त्यानं वैदेहीला समजावलं होतं.

‘वैदेही, तुला सुनीलबद्दल कितीही तिरस्कार वाटत असला, तरी त्याचं बीज सुशांतच्या मनात रोवू नकोस. शेवटी तो त्याचा मुलगा आहे. अन सुशांतनं आयुष्यातले सारे निर्णय स्वतः घ्यावे हे मत आहे माझं. त्याच्यावर कुठलीही गोष्ट लादल्या जायला नको…’

‘श्याम, तुला भीती नाही वाटत का रे? तो सुनीलच्या जास्त जवळ जाईल अन आपल्याला दुरावेल याची…’

‘वाटते कधीकधी. एखाद्या दुबळ्या क्षणी… मीही माणूसच आहे ग. पण खरं सांगू वैदेही, माझं मन मला सांगतं अशा वेळी. मी फ़क्त त्याला जन्म दिला नाही, बाकी सारं केलंय. तो माझा मुलगा नाही हे कधीच वाटलं नाहीय मला. अगदी तो झाल्याझाल्या त्याला छातीशी धरलं ना, तेव्हापासून तो मला माझाच वाटत आलाय. माझ्या प्रेमात नक्कीच इतकी ताकद आहे ग. तो

सुनीलच्या जवळ जाईल की नाही हे नाही मी सांगू शकणार. पण माझ्या दूर जाणार नाही हे नक्की...’

त्याच्या या बोलण्याने वैदेहीला तेवढ्यापुरतं बरं वाटत असे. पण मनातून मात्र ती अस्वस्थच होती.

रविवार उजाडला. सकाळी अकराची वेळ ठरली होती. सुशांत न बोलताच तयार झाला.

ठरल्याप्रमाणे तिघं निघाले. हॉटेलच्या आवारात श्यामनं गाडी थांबवली. बाहेरच्या एका टेबलावर उन्हाच्या छत्रीखाली सुनील बसला होता.

मागे वळूनही न बघता सुशांत निघाला.

‘सुशू, तासाभरानं येतो आम्ही घ्यायला तुला...’ श्यामनं त्याला आवाज दिला.

‘नको. माझं झालं की मी फ़ोन करीन. मग या तुम्ही...’

‘ओ. के. सेल फ़ोन घेतलायस ना?’

नुसतीच मान हलवून सुशांत चालू लागला.

वैदेही नि श्याम घरी आले. टी. व्ही चं कुठलंतरी चॅनेल लावून, दोघं बसून राहिले. त्यांचं लक्ष अर्थातच फ़क्त घड्याळाकडे होतं.

संथ पावलं टाकत सुशांत सुनील बसला होता त्या टेबलाकडे गेला. त्याला बघताच सुनील उठून उभा राहिला.

‘ये बस सुशांत. काय घेणार तू?...’

बाबा कधीच हा प्रश्न विचारत नाहीत. सुशांतच्या मनानं नकळत तुलना केली. आपण सगळे हॉटेलमधे गेलो की ते आपला आवडता ज्यूस अन काहीतरी चमचमीत स्टार्टर्स मागवतात. अन मग, ‘काय सुशू, ती कोण पोरगी होती काल सॉकर फ़ील्डवर?’असं काहीसं मिष्कील बोलून आधी हसवतात आईला नि आपल्याला.

पण पुढच्याच क्षणी तो विचार त्यानं एखाद्या जळमटासारखा झटकून टाकला.

‘यांना अजून आपली काहीच तर माहिती नाहीय. मग कसं बरं कळणार त्यांना?...’

‘अं, नको मला काहीच. नुसत्या गप्पाच मारू या...’

‘अरे असं कसं? थांब मी कॉफ़ी मागवतो. मला या वेळी कॉफ़ीशिवाय होत नाही...’

सुशांतला खरं म्हणजे कॉफ़ी अजिबात आवडत नसे. पण आयुष्यात बऱ्याच नावडत्या गोष्टी असतात. हं...

एक सुस्कारा सोडून तो सावरून बसला. कॉफ़ी येईपर्यंत सुनील स्वत बद्दल बरंच काही बोलत होता. सवयी, आवडीनिवडी... सुशांतला जरासा कंटाळाच यायला लागला मग.

‘पण हे सुद्धा माहीत हवंच की आपल्याला. आता यापुढे हे’बाबा’देखील आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग असणार आहेत...’

कॉफ़ी आली, तरी सुनील बोलतच होता. सुशांत हळूहळू कॉफ़ीचे घुटके घेत त्याचं बोलणं ऐकत होता. पण त्याचं लक्ष त्या बोलण्याकडे फारसं नव्हतंच. तोंडातल्या कडवट कॉफ़ीच्या चवीसारखाच, मनात घोळत असणारा तो कडवट प्रश्न शेवटी धाडकन विचारून मोकळा झालाच तो...

‘आज, इतक्या वर्षांनी मला भेटायला कसे आलात तुम्ही? याआधी कधीच यावसं नाही वाटलं तुम्हाला?...’

सुशांतच्या स्वरातल्या धारेनं सुनील एक क्षणभरच चपापला. पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या घाऱ्या डोळ्यात काहीशी गुर्मीची, काहीशी रागाची छटा उमटली.

‘ते खरंच इतकं महत्वाचं आहे का सुशांत? मी आलो, आपली भेट झाली, हे महत्वाचं नाही का?

‘महत्वाचं कसं नाही? या प्रश्नांची उत्तरं माझ्या दृष्टीनं खूप महत्वाची आहेत. इतकी वर्षं तुम्हाला आपल्याला कोणी मुलगा आहे याची आठवणही झाली नाही. अन अचानक एखाद्या वादळासारखे तुम्ही माझ्या आयुष्यात येता काय... हे सारं इतकं सहज वाटतंय तुम्हाला?...’

‘सुशांत, मी तुझा राग समजू शकतोय. पण तिला... जेनीला तुमच्याशी कुठलेही संबंध ठेवलेले चालणार नव्हते. तिनं तसं वचनच घेतलं होतं माझ्याकडून...’

‘वचन? हं...’

सुशांतला आता संताप आवरेना. आईशी केलेलं लग्न, तिच्याबरोबर काढलेले सहा महिने इतक्या सहज विसरला हा माणूस... अन बाकी सारी वचनं पाळणं जमलं याला...'

एक प्रकारचा सुन्नपणा आला होता सुशांतच्या मनाला.'कशाला आलो आपण यांना भेटायला? काय गरज होती?...'

'अन मग आताच इतक्या वर्षांनी का आलात?...'कुतुहलानं रागावर विजय मिळवला होता.

'अं... म्हणजे काय आहे की... जेनीचा नि माझा घटस्फ़ोट झाला गेल्या दोन महिन्यांपूर्वी. मुलांचा ताबाही तिच्याकडे गेला... तेव्हा खूप वाटायला लागलं या दोन महिन्यात की...'

'की आपला अजून एक मुलगा आहे. आपल्या मनात आलं तसा आपण त्याला टाकून दिलाय. आता मनात येईल तेव्हा आपण त्याला जाऊन भेटू शकतो. आपल्या'बाप'असण्याचा हक्क गाजवायला...'

भावनातिरेकानं सुशांतचा आवाज इतका चढला की त्याला धाप लागली. आजूबाजूचे लोक विचित्रपणानं आपल्याकडे बघताहेत ही जाणीव झाली तसा तो पुन्हा खाली बसला.

‘आज, आयुष्याच्या मध्यावर, तुम्ही एकाकी पडलात म्हणून तुम्हाला आठवण आली माझी. कुठे होतात तुम्ही इतकी वर्षं? मी पहिलं पाऊल टाकलं तेव्हा... माझ्या शाळेच्या पहिल्या दिवशी... मला मांडीवर बसवून घास भरवताना? तेव्हा माझे बाबा होते माझ्याजवळ. तुम्ही... तुमचा काहीही हक्क नाहीय माझ्यावर. पुन्हा कधीच नका येऊ माझ्याकडे. मी तुम्हाला वडील मानत नाही. मुळीच नाही...’

पालथ्या हाताने डोळ्यात दाटू पाहणारं पाणी पुसत सुशांत उठला.

बाहेर येऊन, तिरीमिरीतच त्यानं टॅक्सीचा नंबर डायल केला. बाबा इथवर येईपर्यंतचाही उशीर नको होता त्याला.

मघाशी किती निरभ्र होतं आकाश. नि आता ढग पुन्हा दाटायला लागले होते आभाळात.

घरी पोचताच, दारावरची बेल जोरजोरात वाजवायला सुरुवात केली त्याने.

‘आईबाबा आहेत की बाहेर गेलेत?’कमालीचा अस्वस्थ झाला तो या विचारानं.

दार उघडणाऱ्या वैदेहीला हातानं बाजूला करूनच तो अधीरतेने आत शिरला.

‘बाबा कुठे आहेत ग?...’

तिच्या उत्तराचीही वाट न बघता तो धाड धाड जिना चढून वर गेला.

खोलीच्या खिडकीशी श्याम उभा होता. त्याचे रुंद खांदे केवढेतरी झुकलेले वाटले सुशांतला.

‘बाबा...’

अन पुढे काही बोलताच येईना त्याला. आवेगानं तो श्यामच्या मिठीत शिरला.

‘बाबा... मी फ़क्त तुमचाच मुलगा आहे... फ़क्त तुमचाच. आय डोंट नो एनिबडी एल्स...’

मागून आलेली वैदेही ओल्या डोळ्यांनी हे सारं बघत होती. त्याचं हे कोसळणं सुद्धा फार फार सुखावून गेलं तिला.

हलक्या पावलांनी ती जिना उतरायला लागली. मध्यावर पोचत नाही तोच श्यामचा आवाज आला,

‘वैदेही, भजी राहिलीयत हं. तू सुरुवात कर, आम्ही दोघं आलोच तुझ्या मदतीला...’

# मुक्ता

‘आत्या, मी कशी दिसतेय ग?’

स्वत भोवती एक गिरकी घेऊन गौरीनं मान वेळावून सरलाताईंकडे बघितलं.

सायंपूजा करून घाईघाईत देवघराबाहेर येणाऱ्या सरलाताईंनी जरा चमकूनच तिच्याकडे नजर टाकली.

‘अगदी वहिनीची प्रतिकृती... तेच रेखीव नाकडोळे, तसाच गोरापान रंग नि केसांचा भरदार पिसारा...’त्यांच्या मनात आलं. न बोलता गौरी अशी समोर येऊन उभी राहिली असती तर आपल्या दिवंगत भावजयीच्या आठवणीने त्या क्षणभर दचकल्याच असत्या.

मोरपिशी रंगाची जरीची साडी, त्यावर शोभणारे नाजूक सुवर्णालंकार नि केसात माळलेलं एकच पांढऱ्याशुभ्र गुलाबाचं फ़ूल यात ती आज एकदमच गोड दिसत होती. हातातली पूजेची पात्रं जागेवर ठेवताठेवता सरलाताईंनी खिन्नपणाने हसून मान हलवली.

‘हं, पोरीला काही कल्पना दिलेली दिसत नाहीय दादानं... तिच्या स्वातंत्र्याला थोड्याच वेळात साखळदंडात जखडलं जाणार आहे याची...’

‘अग आत्या, आज बाबांचे ते जुने मित्र येणार आहेत ना ग, तात्या इनामदार... त्यांच्या जेवणाखाण्याच्या वेळी जातीने लक्ष द्यायला सांगितलंय मला बाबांनी...’

एक क्षणभर सरलाताई घुटमळल्या.’सांगावं का पोरीला खरंखरं? तिनं काही गोंधळ केला रडून तर दादा अगदी धारेवर धरेल आपल्याला. पण नाहीच सांगितलं, तर या मोठमोठ्या डोळ्यातली आपण विश्वासघात केल्याची भावना, तिला तोंड देऊ शकू आपण? किती खात्री आहे तिला आपल्याबद्दल...’

सरलाताईंचं विचारचक्र जागीच थांबलं.

‘तात्या नाही. तात्यासाहेब इनामदार म्हण गौरी. जुन्या चालीरीतींची समज यायला हवी आता...’

दादासाहेब केव्हा दारात येऊन उभे राहिले ते दोघींना कळलंच नाही. चपापून सरलाताईंनी डोक्यावरचा पदर उगाचच सारखा केला. गौरीच्या खळखळत्या उत्साहालाही तटकन बांध घातल्यासारखी ती जागेवरच थबकली.

‘आटपा लवकर, सात वाजता येतील ती मंडळी...’ एवढंच बोलून ते तडक बाहेर गेलेही. घरातल्या बायकांशी याहून जास्त बोलायची गरज त्यांना कधीच वाटत नसे.

‘आत्या, तू सांगितलंच नाहीस ग... कशी दिसतेय मी?...’

दादासाहेबांची पावलं दूर गेली तसा गौरीनं पुन्हा प्रश्न केला.

आवेगानं तिच्याजवळ येऊन त्यांनी तिला जवळ ओढलं.

‘ही साडी बदल आधी... अन ते केस असे मोकळे का सोडलेत? ये... तेल लावून अंबाडा घालते चांगला... चल लवकर. थोडाच वेळ उरलाय आता...’

‘हे ग काय आत्या... इतकी छान तयार झालेय अन आता तेल लावून अन अंबाडा घालून पुरती बावळट करून टाकशील मला...’

फ़णकाऱ्यानं गौरीनं आपले केस त्यांच्या हातातून हिसडा मारून सोडवून घेतले.

‘आता कसं सांगू या पोरीला? सुरेख दिसायलाच नको आहेस ग पोरी तू आज मला...’

‘म्हणजे काय? आत्या... नीट सांग आधी मला... लवकर सांग. काहीतरी लपवतेस तू माझ्यापासून...’

‘अग वेडे, तुला बघायला येताहेत सगळे इनामदारांकडचे... बघायला कसले, सारं ठरवूनच टाकलंय तुझ्या बापानं...’

गौरीच्या चेहऱ्यावरचे भाव सरलाताईंना पाहवेनात.

‘आत्या... आत्या. हे कसं शक्य आहे ग? मी सुजयशिवाय कोणाशी लग्न नाही करणार आत्या. बाबा खोटं बोलले म्हणजे माझ्याशी... सुजयच्या आईबाबांना भेटायला बोलावीन म्हणाले मला या महिन्याअखेरीस... नाही आत्या... मी जीव देईन ग... सुजयशी लग्न झालं नाहीतर...’

देवघराच्या खांबाला धरून गौरी खालीच बसली. येणारे उमाळे दाबायचा निष्फ़ळ प्रयत्न करीत.

‘गप पोरी. आधी गप. तुझ्या बापानं ऐकलं तर जीव द्यायची गरजच उरणार नाही बघ तुला. शांत हो नि तयार हो आधी. आत्ताचा प्रसंग तर पार पाडायला हवाच... मग बघू या...’

‘काही बघत नाहीस तू... मागे कॉलेजच्या ट्रिपलाही मुलं सोबत होती म्हणून जाऊ दिलं नाही त्यांनी. तेव्हाही बघेन म्हणाली होतीस तू... काय केलस शेवटी? नाही ना जाऊ शकले मी?’

या भाबड्या पोरीला आता कसं समजवावं हेच कळेना सरलाताईंना.

रडून रडून शेवटी झोपी गेलेल्या गौरीच्या डोक्यावर सरलाताई हळू हळू थोपटत होत्या.

संध्याकाळचा सगळा समारंभ नीट पार पडला होता. घट्ट आवळून बांधलेल्या चपचपीत खोप्यात अन जुन्या पद्धतीच्या काठपदराच्या साडीतही गौरीचं सौंदर्य लपलं नव्हतंच. अगदी दृष्ट लागण्यासारखी सुरेख दिसत होती ती. तिला बघितल्याबरोबरच मंडळींनी एकमेकांकडे बघून पसंतीच्या माना डोलावल्या होत्या. इनामदारांचा मुलगा तसा दिसायला देखणा होता, पण चेहऱ्यावरची गुर्मी नि ताठा अगदी स्पष्ट दिसत होता. शिक्षणातही गौरीपेक्षा एक वर्ष मागेच होता. एका इयत्तेत किती वर्षं काढली होती देवालाच ठाऊक. अर्थात त्याला गरजही नव्हती म्हणा शिक्षणाची.’इस्टेट पाहणे’हा मोठ्ठा उद्योग होताच की त्याला.

गौरीला झोप लागली तरी सरलाबाईंच्या डोळ्याला डोळा लागत नव्हता. विषादानं त्यांचं मन अगदी भरून आलेल्या आभाळागत जड झालं होतं.

‘अशीच लावण्यखनी, सुरेख होती आपली वहिनी. गौरीची आई. पण दादानं काय कदर केली तिची? या वाड्याच्या चार भिंतीत जशीकाही चिणून मारली त्याने तिला. तिच्या गुणांची कदर यापेक्षा एखाद्या सर्वसाधारण परिस्थितीच्या माणसानं जास्त केली असती. कधी धड वागला नाही तिच्याशी. सतत दुर्लक्षित जीवन जगली बिचारी नि झिजून झिजून गेली शेवटी. गौरीच्या लहानपणीच. डोळ्यानं बघत होतो आपण दादाचे बाहेरचे नाद नि बेताल वागणं. पण काय करू शकणार होतो आपण? बालविधवा, नि कोणाचा आधार नाही. दादाने घराबाहेर काढलं असतं, तर दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत पडली असती आपल्याला...’

‘अन आता पोटच्या पोरीवरही अन्याय करतोय तो. काय कमी आहे खरंतर सुजयमधे? शिकलेला, अनुरूप, नि निर्व्याज प्रेम करणारा आहे गौरीवर. अगदी सुखात राहील बिचारी त्याच्याबरोबर... हं आता शहरातलं छोटंसं घर नि साधेसुधे आईवडील यापलिकडे काही नाही त्याच्याकडे. नोकरीही मध्यमच आहे. पण का कोण जाणे, गौरीला आयुष्यभर फ़ुलासारखी जपेल ही खात्री वाटतेय आपल्या मनाला...’

सुजय अन गौरीची ओळख कॉलेजमधलीच. सुजयचे म्हातारे आजोबा शेतीवर एकटेच रहात, नि ते शहरात यायला तयार नव्हते म्हणून त्याला गावात आजोबांजवळ शिकायला ठेवलं होतं एक वर्षभर. तेव्हाच दोघं एकमेकांच्या प्रेमात पडले. सगळ्यांपासून दूर राहणारा, किंचित लाजरा सुजय गौरीला बेहद्द आवडून गेला. नि गौरी आपल्याकडे खास लक्ष देतेय हे कळल्यावर तिच्या मोठमोठ्या डोळ्यात बुडून न जाणं सुजयला शक्य नव्हतंच. दुर्दैवाने सुजयचे आजोबा गेले अन त्यालाही शहरात परत जावं लागलं. पदवी घेऊन तो आता नोकरीबरोबरच एम. बी. ए. पूर्ण करत होता. इकडे गौरी पदवीधर झाली तशी तिच्यासाठी स्थळांची रांगच लागली होती. पण या साऱ्यातून सुजय अन गौरीचं प्रेम अबाधित राहिलं होतं. फ़ोनवर चोरून बोलणं, शहरी जाणंयेणं करणाऱ्या मित्रमैत्रिणींबरोबर पत्रं पाठवणं... असे अनेक मार्ग शोधून काढले होते दोघांनी. सरलाताईंना सुजय एकदम पसंत होता. पण वडील भावाला कळलं तर घरात काय तुफान येईल या भीतीनं त्या नेहमी धास्तावलेल्याच असायच्या.

या हळुवार प्रेमाचा सुगावा दादासाहेबांना लागला होता की काय कोण जाणे. पण गेल्या महिन्यापासूनच गौरीसाठी वरसंशोधनाला धडाक्यानं प्रारंभ केला होता त्यांनी. गौरीला हे

कळलं तसं कधी नव्हे ते धीर धरून सुजयबद्दल सारं तिनं त्यांच्या कानावर घातलं होता. त्या वेळचा भावाचा चेहरा आठवून सरलाताईंच्या उरात आत्ताही धडधडलं. पण एक क्षणात त्यांच्या मुद्रेवरचे भाव झरझर पालटले होते. अन गौरीला तोंड भरून आश्वासन दिलं होतं त्यांनी... लवकरच सुजयच्या आईवडिलांशी बोलण्याचं.

अन शेवटी थंड डोक्यानं हे सारं ठरवून मोकळे झाले होते ते. या विश्वासघाताचं गौरीला कितीही वाईट वाटलं असलं, तरी सरलाबाईंसाठी हे नवीन नव्हतंच. दादासाहेबांच्या उलट्या काळजाचा अनुभव त्यांनी आयुष्यात अनेकदा घेतला होता.

आता काहीही करणं त्यांच्या हातात नव्हतं. गौरीचं दुख:ही पाहवत नव्हतं, नि त्या असहाय होत्या. विचार करून करून पार थकवा आला त्यांना.

तोच वाड्याचं भलंमोठ्ठं दार करकरल्याचा आवाज झाला.

‘काय रे महादू, कोण आहे?’वरूनच ओरडून विचारलं त्यांनी.

‘काय नाय ताईसायेब. रातच्याला चोर, दरवडेखोरांचा तरास लई वाडलाय. जरा जास्तीचं कुलूप लावीत हुतो बगा...’

‘हो रे बाबा. लक्ष असू दे जरा... फारच सत्र वाढलंय या दरोडेखोरांचं... काहीबाही ऐकतेय आजकाल...’

‘तुमी बिनघोर ऱ्हावा ताईसायब... आमी आहोत राखनीला...’

महादूनं दिलेल्या आश्वासनानं सुखावून जात त्या परत झोपायला आल्या. निद्रादेवीनं लवकरच त्यांच्या शिणलेल्या मनाचा नि शरीराचा ताबा घेतला.

दोन आठवड्यांनी वाड्यातच गौरीचा साखरपुडा पार पडला. सगळ्या समारंभात गौरी एखाद्या निर्जिव पुतळीसारखी वावरत होती. इनामदारांकडून बऱ्याच जरीच्या साड्या, दागिने नि एक हिरेजडित अंगठी आली होती. वधूला आलेल्या वस्त्रालंकारावरूनच त्यांच्या श्रीमंतीची सहज कल्पना येत होती. पण गौरीला या कशातच रस नव्हता.

दोन्ही घराणी तोलामोलाची असल्याने साखरपुडा अगदी थाटात पार पडला.

रात्री खोलीत आल्यावर मात्र गौरी मेंदीनं लालचुटूक झालेले हात आत्याच्या गळ्यात टाकून अगदी ऊर फ़ुटेस्तोवर रडली. सरलाताई अगदी कावऱ्याबावऱ्या होऊन गेल्या. खोलीतल्या वहिनीच्या फ़ोटोकडे बघून त्यासुद्धा अनिवार रडल्या मग.

‘माफ़ कर मला वहिनी. गौरीवर कुठल्याही दुखाची सावलीही पडू देणार नाही असं वचन दिलं होतं ग मी तुला. नाही पाळू शकले मी ते... असहाय आहे ग मी...’

सगळी रात्र अशीच अस्वस्थ गेली त्यांची.

सकाळी उठून सरलाताई देवघरात आल्या. नेहेमीप्रमाणे देवाला त्यांनी मनोभावे हात जोडले. महादेवाच्या पिंडीकडे बघता बघता त्यांच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं.

‘देवाधिदेवा, माझ्यासाठी काही मागायची वेळ निघून गेलीय रे आता. पण त्या पोरीसाठी जीव तुटतोय. जहागिरदार घराण्यातल्या बायकामुलींचा हा शाप कधी रे संपणार? मनासारखं, सुखाचं आयुष्य कधी वाट्याला येणारच नाही का त्यांच्या?...’

देवघराजवळ हलकीशी चाहूल ऐकू आली तसे त्यांनी डोळे उघडले. गौरीच होती. रात्रीच्या वादळाच्या सगळ्या खुणा चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या. तिची रडवेली मुद्रा बघून त्यांचं काळीज फाटून जाईल की काय असं वाटलं त्यांना. तिच्याशी काहीतरी बोलायला तोंड उघडणार तोच महादू सांगत आला...

‘धाकट्या ताईसायबांची कोनीतरी मैतरीन आलीया खाली...’

‘इतक्या सकाळी?’

त्यांना आश्चर्यच वाटलं. पटकन केस सारखे करून त्याही गौरीबरोबर खाली आल्या.

गौरीच्या वर्गातली जान्हवी खाली वाटच बघत होती. काही न बोलता तिनं एक चिठ्ठी हळूच गौरीच्या हातात सरकवली...

‘सुजय वाट बघतोय गौरी, देवळात. सगळं कळलंय बघ त्याला... तुला भेटायला आलाय तो... काल रात्रीच. तुझ्याशी महत्वाचं बोलायचंय त्याला’

‘आत्या... ?’गौरीनं भरलेल्या डोळ्यांनी सरलाताईंकडे बघितलं.

सरलाताई काही बोलणार तोच वरून दादासाहेबांचा भरदार आवाज आला...

‘कोण आहे? काय गडबड आहे तिकडे महादू?...’

वरच्या खिडकीत दादासाहेब येण्याआधीच जान्हवी सटकली होती.

‘जरा देवळात जाऊन यायचं म्हणत होतो आम्ही दोघी...’

सरलाताई चाचरतच म्हणाल्या.

‘आत्ता? इतक्या भल्या पहाटे? काही गरज नाहीय... महादू घेऊन जाईल संध्याकाळी. अन आता लग्न होईस्तोवर बाहेर पाय टाकायची गरज नाहीय गौरी. आत्तापर्यंत उधळले ते रंग खूप झाले... खोलीत जा मुकाट्यानं...’

ओठात येणारा हुंदका गळयात दाबून गौरी धावतच जिन्यावरून वर गेली. तिच्या पायातल्या साखळयांचा एरवी गोड वाटणारा आवाज अगदी नकोसा वाटला सरलाताईंना...

डोक्यावरचा पदर आणखीनच ओढून घेत सरलाताईही गौरीच्या पाठोपाठ जायला निघाल्या. त्याआधी वरच्या खिडकीत एक चोरटी नजर टाकायला त्या विसरल्या नाहीत. पण दादासाहेब तिथे थांबलेच नव्हते.

जिन्याजवळ गेल्या गेल्या पूजेच्या फ़ुलांची आठवण झाली सरलाताईंना. महादूला परडी आणायला सांगून त्या वाड्यामागच्या बागेकडे वळल्या. विमनस्कपणे फ़ुलं तोडू लागल्या. परडी फ़ुलांनी भरत आली तशा विहिरीजवळच्या कठड्यावर टेकल्या त्या थोड्याशा.

बसल्या बसल्या त्यांचं लक्ष बागेच्या मागच्या दरवाजाकडे गेलं.

चहूबाजूंनी भक्कम भिंत, समोर भला थोरला दरवाजा नि मागे हे छोटसंच पण मजबूत दार अशी रचना होती वाड्याची. त्या जुनाट दाराला भलंमोठं कुलूप लटकत होतं. बिजागऱ्यांच्या फ़टीतून दारापलिकडे माजलेली जंगली झुडपं नि तण दिसत होतं. रात्रीच्या वेळी तर त्या जुनाटपणानं नि अपुऱ्या प्रकाशानं एकप्रकारचा भीतीदायक गूढपणा त्या दाराकडे बघितल्यावर जाणवत असे.

‘या दरवाज्यानं काढता येईल का गौरीला बाहेर?’मनातल्या विचारांनी त्या केवढ्यातरी दचकल्या.

‘महादू, या कुलपाची किल्ली कुठे आहे रे?’

‘त्ये ना, मालकांकडे असती बगा. आनू का?...’महादूला वाटलं दारापलिकडे उगवलेला आघाडा तोडायचाय पूजेसाठी.

‘नाही रे. किल्ली नकोय मला...’

क्षणभर त्या घुटमळल्या तसं त्यांच्या मनातले विचार ओळखल्यासारखा महादू धास्तावूनच गेला...

‘कायबाय मनात नका आनू थोरल्या ताईसायेब. मालकास्नी कललं तर जीवच घेतील बगा तुमचा नि माजाबी...’ तो हलकेच म्हणाला.

‘हो रे. जास्त बोलू नकोस...’त्यांनी चिडचिडून त्याला तोडूनच टाकला.

महादूच्या ओशाळलेल्या चेहऱ्याकडे बघून मग त्यांना उगाचच वाईट वाटायला लागलं.

‘त्याचा काय दोष? नोकर माणूस तो बिचारा. हुकमाचा ताबेदार. जुना अन विश्वासू नोकर आहे तो. धन्याशी द्रोह करणार तरी कसा?...’

‘रागावू नकोस रे बाबा. सध्या डोकं ठिकाणावरच नाही बघ माझं...’किंचित वरमून त्या म्हणाल्या तसा महादू त्यांच्या पायाशीच खाली बसला.

‘न्हाय ताईसायेब. रागावू कशापायी? आम्हास्नी सगलं दिसत न्हाय का? वाड्यात उमर गेली माजी. पन काय करनार. श्येवती मालकांचा शबुद परमान. मंग तो बराबर असला न नसला तरी आमी गडीमानसं...’

धोतराच्या शेवाने त्याने डोळे पुसले.

‘खरंय रे बाबा तुझं. चल, फ़ुलं नेऊन दे मला वरती... पूजेची वेळ होतेय...’

गुडघ्यांवर हात टेकतच त्या उठल्या.

जिना चढताचढता त्यांचं मन विचार करत होतं.

‘म्हणजे मागच्या दारानंही गौरीला बाहेर जाता येणार नाहीच. दादाच्या साऱ्या किल्ल्या चोवीस तास त्याच्या कमरेलाच असतात नाहीतर उशीखाली. त्या घेणं शक्यच नाही कोणाला. सुटकेचे सारेच मार्ग खुंटलेत आता... महिन्याभरानं लग्न... बिचारी माझी गौरी... वहिनीसारखंच दुर्दैवी आयुष्य जगणार ती फ़ुलासारखी पोर...’

सोनार, कापडवाला, सगळे यायला लवकरच सुरुवात होणार होती.

गौरीच्या लग्नाची तयारी धडाक्यात सुरू झाली. तऱ्हेतऱ्हेच्या साड्या, दागदागिने यांच्या खरेदीला नुसता पूर आला होता. जराही हात राखून ठेवीत नव्हते दादासाहेब. अर्थात त्यात गौरीवरच्या प्रेमापेक्षाही स्वत चा बडेजाव राखण्याचा जास्त प्रयत्न होता. वरचेवर सोनाराला बोलावणं जात असे नि गौरीला द्यायच्या दागिन्यांमधे एकेका नव्या दागिन्याची भर पडत असे. ते सारे अलंकार तिजोरीत अगदी नीट ठेवण्यात आले होते. दादासाहेब अगदी जातीने लक्ष ठेवून होते सगळीकडे.

साड्या नि दागिने पसंत करायला गौरीला मुलाकडच्यांकडून बोलावणं आलं तेव्हा सरलाताईंनीही तिच्याबरोबर जायचं ठरलं.

‘महादू घेऊन जाईल तुम्हा दोघींना. अन तिथून सरळ घरी यायचं. बाकी कुठेही जायची मुळीच आवश्यकता नाही. समजलं ना?...’

दादासाहेबांच्या प्रश्नावर दोघींनीही यांत्रिकपणे मान हलवली.

नऊवारी साडी नेसून, दोन्ही खांद्यांवर शाल घेऊन गौरी तयार झाली तसं सरलाताईंना जरासं हसूच आलं.

‘हे काय ग बाळ? अन आईची साडी काढलीस आज नेसायला?...’

पण गौरी गंभीर होती.

‘आत्या, माणसाला हवं ते मिळत नसेल, तर आपल्याजवळ आहे ते आवडून घ्यायला शिकावं, असं तूच ना सांगत असतेस मला नेहमी? आता त्या घरात जायचं, तर त्यांच्या पसंतीने वागायला नको?...’

पोरीच्या समजूतदारपणाने सरलाताईंचं काळीज आणखीच हेलावलं.

दागिने अन कपड्यांची पसंती करून त्या दोघी घरी आल्या. दादासाहेब त्यांची वाटच बघत होते.

दोन्ही घरांच्या परिस्थितीत सरलाताईंना वेगळं असं काही वाटलं नाही. उलट इनामदारांकडचे नोकरचाकर त्यांना नि त्यांच्या मुलाला अगदी थरथर कापतात हे लक्षात आलं नि दोघांच्या तापट स्वभावाची खात्री पटली तशा त्या मनातून आणखीच अस्वस्थ झाल्या.

रोज दिवसातून दहादा त्या शंभू महादेवाला विनवीत असत. आपल्या विनवणीला आता काहीच अर्थ उरला नाहीय हे समजूनही. गौरीच्या आयुष्याची काळरात्र लवकरच सुरू होणार होती. अन त्याला कोणाचाच इलाज चालणार नव्हता.

अशाच एकदा देवासमोर त्या हात जोडून बसल्या असताना महादू तिथे आला.

‘द्येवालाच मागनं मागा ताईसायेब...’दादासाहेब आंघोळीला गेल्याची संधी साधून तो हलकेच म्हणाला.

‘सारखंच विनवतेय रे बाबा मी. त्याला कधी दया येईल कोण जाणे. का येणारही नाही...’

सरलाताईंनी हलकेच डोळे पुसले.

‘येनार ताईसायेब. अहो, त्याच्या मनास्नी आलं, तर कायबी हुईल बगा...’महादूच्या डोळ्यात पाणी तरळत होतं.

एक सुस्कारा सोडून सरलाताईंनी पुन्हा डोळे मिटून घेतले.

आठवड्याभरानं पाहुणे यायला सुरुवात होणार होती. दागदागिने, वस्त्रप्रावरणं साऱ्याची खरेदी आटोपली होती. आता प्रतिक्षा होती फ़क्त गौरीच्या बळी जाण्याची...

रात्र पडायला सुरुवात झाली तसा सारा वाडा निद्रादेवीच्या स्वागताची तयारी करू लागला. गौरीच्या मनस्थितीत आता जाणवण्यासारखा बदल झाला होता. ती विलक्षण शांत झाली

होती. समोर येणारे भोग फ़क्त उघड्या डोळ्यांनी स्वीकारायची तिच्या मनाची जणू तयारीच झाली होती. तिची अवस्था सरलाताईंना बघवत नव्हती.

खरंच, जहागिरदार घराण्याच्या लेकीबाळींची आयुष्यं एखाद्या दुर्लक्षित बागेतल्या फ़ुलांसारखीच आहेत...'त्यांना वाटून गेलं. एकदा झाडावरून गळली, की मग ती पायतळी तुडवली जाणार हे नक्कीच.

गडद काळ्या रंगाची साधीच सुती साडी नेसलेली गौरी खिडकीबाहेरच्या अंधारात बघत होती.

'आत्या, आईलाही खूप वाईट वाटत असेल ना ग... माझं मनाविरुद्ध लग्न होतंय हे पाहून... ?'

तिच्या अचानक आलेल्या भावहीन प्रश्नाने सरलाताई चांगल्याच दचकल्या.

'आता काय म्हणावं या पोरीला? कुठून कुठून हे विचार येतात बाळ तुझ्या डोक्यात...'

'नाही आत्या... तूच तर म्हणायचीस ना ग नेहेमी, आपल्या गेलेल्या माणसांचा आत्मा आपलं रक्षण करत असतो म्हणून... मग... ?'

गौरीच्या प्रश्नाला सरलाताईंकडे उत्तर नव्हतं. तिचा हात धरून त्यांनी तिला पलंगावर आणून निजवलं अन हलक्या हाताने त्या तिला थोपटू लागल्या.

पहाटेचा पहिला प्रहर असेल, कसलीशी विचित्र स्वप्नं त्यांना पडत होती. मधेच गौरी एका उंच कड्यावरून धडपडत, ठेचकाळत खाली जाताना दिसली त्यांना... नि सरलाताई त्या धाड धाड आवाजाने खडबडून जाग्या झाल्या. डोक्यापासून पायापर्यंत त्या घामाने भिजल्या होत्या.

‘पण... हा धाड धाड आवाज खरंच येतोय. म्हणजे हे स्वप्न नाही तर...’

खोलीच्या खिडकीतून त्या बाहेरच्या चौकात डोकावल्या.

‘महादू... कोण...’

त्यांचं वाक्य पूर्ण झालंच नाही.

‘ताईसायेब, दारं लावून आत बसून ऱ्हावा... दरोडा... दरोडा पडतोया वाड्यावर... खाली येऊ नका ताईसायेब... येऊ नका खाली...’

एव्हाना आवाजानं जागी झालेली, घाबरलेली गौरी खिडकीशी आली होती. तिच्या विस्फ़ारलेल्या डोळ्यांना ते भयंकर दृश्य दिसलंच.

तोंडाला काळं फ़डकं बांधलेले दहा बारा दरोडेखोर समोरचा दरवाजा तोडून आत शिरले होते. काहींच्या खांद्यांवर बंदुकाही होत्या...

महादू, आणखी दोन गडी नि दादासाहेबांची एकच बंदूक या साऱ्यांचा निभाव त्यांच्यासमोर लागणं कठीणच नव्हे, तर अशक्यप्राय होतं.

तेवढ्यात दादासाहेबांच्या भरदार आवाजातलं दरडावणं नि त्यांच्या बंदुकीचा बार ऐकू आला नि मग सगळीकडे एकच हलकल्लोळ माजला.

त्या धावपळीत विजेच्या वेगानं सरलाताईंच्या मनानं उसळी घेतली. फ़डताळातलं छोटं मखमली पाकीट उचलून त्यांनी गौरीचा हात धरला...

'चल माझ्याबरोबर गौरी...'

'कुठे नेतेस आत्या मला?... खाली नकोस ना जाऊ आत्या... मला भीती वाटतेय ग...'

'चल, पोरी चल. बोलू नको एक शब्दही...'

घाबरून थरथर कापणाऱ्या गौरीला जवळ जवळ ओढतच त्या मागचा जिना उतरल्या. बाहेर कोलाहल नि ओरडणं ऐकू येतच होतं.

विहिरीजवळची पहार उचलून त्या गौरीला घेऊन मागच्या दाराशी आल्या. त्यांच्या कृश हातात कुठून एवढी शक्ती आली होती ते कोणास ठाऊक, पण सारं बळ एकवटून ते कुलूप त्यांनी तोडलं.

'जा बाळ... मागे वळूनसुद्धा बघू नकोस ग... इथून दहा मिनिटं सरळ धावत जा गौरी. ही झुडपांमागची पायवाट संपली की बस

स्टॅंड आहे पोरी. ठाऊकच आहे तुला... शहराकडे जाणारी पहिली बस सुटेलच आत्ता... हे थोडे पैसे असू दे जवळ... सुजयकडे जा... जा लवकर...'

हाताने बाहेर ढकललंच त्यांनी गौरीला...

'नाही आत्या... तू... मी तुला सोडून...'

'जा पोरी जा... ही संधी पुन्हा येणार नाही ग. जा. वहिनीची शपथ आहे तुला...'

बंदुकीची एक फ़ैर झडल्याचा आवाज पुन्हा घुमला.

भरल्या डोळ्यांनी आत्याकडे बघणाऱ्या गौरीचं पाऊल एक क्षणभरच घुटमळलं... अन मग विजेच्या वेगाने धावत ती झुडपांमागे अदृश्य झाली.

संथ पावलांनी चालत सरलाताई विहिरीजवळ आल्या. निर्विकार मनानं त्यांनी हात जोडले.

विहिरीचं काळंभोर पाणी क्षणभर डहुळलं नि पुन्हा पहिल्याप्रमाणेच शांत झालं.

# रेशीमधागे

खोलीच्या खिडकीतून सूर्यकिरणं डोळयांवर आली तशी मला जाग आली. त्रासिक चेहेऱ्यानंच मी डोळयांवर आडवा हात धरला. काल रात्री उशिरा झोप लागल्यानं आज जास्त वेळ झोपायचा बेत होत खरा, पण आता कसली झोप लागणार?

शेजारी झोपलेल्या नवऱ्याकडे बघून मला नेहेमीसारखंच आश्चर्य वाटलं. ऊन चेहेऱ्यावर येऊ दे, नाहीतर कानाशी ढोल वाजू दे, याला कसं काही होत नाही? मुलं लहान असतानाही रात्री कामावरून उशिरा आलेला विशाल सकाळी त्यांच्या किलबिलीनं हसतच जागा होत असे. कधी चिडचिड नाही की वैतागणं नाही. त्याच्या सुखी माणसाच्या सदऱ्याचं मला सदैव नवल वाटायचं.

ब्रश करावं म्हणून मी बाथरूमकडे वळले अन एकदम धसकून जाऊन बाहेर आले. मिता घरी आली की नाही काल रात्री?आपल्याला नेमकी काल किती गाढ झोप लागली.

मिताच्या खोलीकडे जायला जिन्याच्या दोन पायऱ्या चढले अन वरून जयचा प्रसन्न आवाज ऐकू आला,

‘गुड मॉर्निंग ममा.’

सहा फ़ूट उंचीच्या, हसतमुख, राजबिंड्या लेकाकडे बघता बघता माझ्याही नकळत माझ्या चेहेऱ्यावर हास्य पसरलं. दिसायला अगदी माझ्यासारखा, पण स्वभाव मात्र वडिलांसारखा आर्जवी अन गोड.

‘अरे, मिता...’

‘आलीय ती ममा, रात्रीच आलीय. चल, तू ये ब्रश करून. तुझ्या आवडीचा मस्त कोको बनवतो मी.’

‘किती वाजता आली रे?’मला हुश्श झालं तरी विचारलंच.

‘आली लवकरच. ये तू ममा पटकन. खूप दिवसात बाहेर ब्रेकफास्ट नाही केला आपण.’

बहिणीवर पांघरूण घालायचा हा त्याचा स्वभाव नेहेमीचाच. अगदी लहानपणी सुद्धा खट्याळ मिताच्या खोड्या अन तिला शिक्षेपासून वाचवायची त्याची धडपड असायचीच.

मी बाहेर आले तोवर विशालही उठला होता. बापलेकांनी मिळून टेबल एकदम मस्त सजवलं होत. मिता मात्र अजूनही वरच असावी. गरम कोकोचे घुटके घेताना मला एकदम बरं वाटायला लागलं.

‘आता ठीक वाटतंय ना आई?’

ही जयची आणखी एक सवय.

खूप लाडात आला की ममाची आई व्हायची.

‘बरं न वाटायला काय झालं? डॉक्टर लेकानं दिलेली गोळी घेतल्यावर बरं वाटायलाच हवं’विशाल हसून म्हणाला.

जयच्या डॉक्टरकीचा उल्लेख ऐकल्यावर पुन्हा मला खुदकन हसू आलं. कोण म्हणेल माझा लेक एवढा कार्डियालॉजिस्ट आहे?

अजूनही आंघोळ करून आला की लाडात येऊन...'आई, केस दे ना पुसून.'म्हणतो.

जयच्या हसऱ्या चेहेऱ्याकडे बघताना मी अचानक गंभीर झाले.

'जय, देशमुखांकडचा फोन आला होता काल. या वीकएंडला येऊ दे का मुलीला घेऊन?'

जयचा चेहेरा मात्र तेवढाच हसरा.

'ममा, आता कुठे एम डी झालोय ग. अजून लग्नाला वेळ आहे माझ्या. अन मी अन बाबा या शनिवारी न्यूयॉर्क चा बेत ठरवतोय. खूप दिवसात गेलोच नाहीय.'

'खूप दिवसात म्हणजे तीन महिन्यात.'मी आता परत वैतागले. 'मला मुळीच जमणार नाहीय. खूप कामं आहेत घरची. तुम्ही तिघं जा. तेवढीच मिता पण खूश होईल आई बरोबर नाही म्हणून.' 'काहीतरीच काय बोलतेस प्रिया?'विशालचा आवाज दुखावलेला.

‘काहीतरीच काय बोलले मी? मी काहीही सांगितलेलं, बोललेलं तिला आवडत नाहीच. काल नुसतं विचारलं, मार्क बरोबर जातेयस का म्हणून, तर केवढा राग आला तिला? मला म्हणाली,’आई, तू सतत पाळतीवरच असतेस. व्हाय कांट यू बी लाईक डॅडी?

‘अग, पण काय झालं गेली तर? अन मी विचारलंय तिला. तिनं मला सांगितलय की तो चांगला मित्र आहे तिचा.’

‘छान, म्हणजे आईला नुसतं हे सांगायला काय होत होतं तिला? सगळं तुझ्याशीच मन मोकळं करणार. मी जणू तिची सावत्र आई आहे.’संतापातिरेकानं माझ्या डोळ्यात पाणीच आलं.

‘जाऊ दे ना ममा. आता ती मोठी होतेय. अन ऐक माझं, तू पण चल न्यूयॉर्कला. मी अन बाबा अगदी तुझ्या शॉपिंगलापण बरोबर येऊ. सतत तुझ्याच बरोबर राहू. मग तर झालं ना? प्लीज ममा.’

‘अन हो, ड्रायव्हिंग पण तू कर तुला आवडतं तसं. मी काही सूचना करणार नाही नेहेमीसारख्या. " विशालचा मिश्किल स्वर. बरं बरं’मला न रहावून हसू फुटलंच.

‘तुम्ही दोघेही लोणी लावण्यात भलते हुशार आहात बाकी.’

‘आता कसं छान वाटलं बघ ममा. तू हसलीस की आम्हाला कसं प्रसन्न वाटतं.’

‘आम्हीच काय, सारं घरच उजळून निघतं बघ तू खुशीत असलीस की.’

त्या दोघांकडे कृतककोपानं बघत मी टेबलावरचा सरंजाम आवरू लागले. विशाल अन जय बाहेर यार्ड मधे नवीन झाडं कोणती आणायची याचा खल करायला गेले. तेवढ्यात जिन्यावर धाड धाड पावलं वाजली.

महाराणी उठलेल्या दिसतात.

चक्क नीटनेटक्या कपड्यांमधे बाईसाहेब उगवल्या.

‘हाय ममा. कशी आहेस?’

‘ठीक आहे मी आता. घे नाश्ता कर.’

‘नको ममा. आज भूक नाहीय. अन टेनिस खेळून झाल्यावर मार्कच्या घरी जायचंय. तिथे खाणं होईलच. त्याची आई मेक्सिकन फ़ूड इतकं छान बनवते ना.’

पुन्हा मार्क. मला आता रागावर नियंत्रण ठेवणं कठीण जाऊ लागलं होतं.

‘घरी किती वाजता येणार आहेस?’

‘ओह नो, नॉट अगेन.’

मिता पुटपुटली ते मला ऐकू गेलंच.

‘व्हॉट डू यू मीन, मिता? साध्या प्रश्नाला साधं उत्तर देता येत नाही का? का अशी मागच्या जन्मीची वैरीण असल्यासारखी वागतेस सतत?’

मी संतापाने थरथरू लागले होते. माझा चढलेला आवाज ऐकून विशाल अन जय धावतच आत आले. जयनं माझ्याभोवती हात घालून मला जवळ घेतलं.

‘ममा, शांत हो बरं आधी. चल, पड तू पुन्हा. मी अन बाबा बसतो तुझ्याजवळ. मिता, गो टू युवर रूम.’

‘मी तशीही बाहेरच निघालेय. सारखं ऐकायचा मलाही कंटाळा आलाय.’

‘नॉट अ वर्ड मिता.’विशालनं दटावलं.

मला झोप लागेपर्यंत दोघेही माझ्याजवळ बसले होते.

बऱ्याच वेळाने मला जाग आली. उठून बाहेरच्या खोलीत आले तर सारं घर शांत शांत होतं. विशाल त्याच्या खोलीत कॉम्प्युटरवर काम करत होता. जयच्या खोलीचं दार बंद होतं. मिता अजून घरी आलेली नव्हती.

स्वैपाकघरात गेले तर टेबलवर लेमन राईस अन माझ्या आवडीचं पुडिंग झाकून ठेवलेलं होतं. सगळीकडे चकाचक. डिशवॉशरचा लयबद्ध आवाज हलकेच येत होता. मला अगदी भरून आलं. बापलेकांनी मिळून माझं सारं काम उरकून टाकलं होतं.

किचनच्या खिडकीजवळ उभी राहिले. बाहेरची बाग अगदी रंगीबेरंगी गालिच्यासारखी फुलली होती. ही झाडं आणायची कोणती हे विशाल अन जय ठरवीत. पण लावायची कशी हे मिता सांगत असे. लहानपणापासून तिला कलासक्त दृष्टीचं जणू वरदानच लाभलं होतं. अगदी लहान असतानाही किती बक्षिसं जिंकायची ती. चित्रकला, रंगकाम सारंच तिच्या फार आवडीचं.

खिडकीजवळ उभी राहून बाहेर बघता बघता मिताचं सारं लहानपण अन गेल्या सहा महिन्यातलं तिचं वागणं याचा चित्रपटच माझ्या डोळ्यासमोरून सरकू लागला.

बाहुलीसारखी नाजूक अन गोड माझी लेक. तिच्या त्या लहानखुऱ्या बांध्याला तिचे मोठेमोठे डोळे जरा विसंगतच दिसत. सुरुवातीपासूनच अतिशय धीट अन स्वतंत्र वृत्तीची. जयपेक्षा सहा वर्षांनी लहान. अन घरातही लहान म्हणून साऱ्यांचीच लाडकी. एक काळ असा होता की मिताचं आईशिवाय पानही हलत नसे. तिला विशाल गमतीने ममाचं शेपूटच म्हणत असे.

या सहा महिन्यात मात्र ती पार बदलली होती. सतत वादावादी होत असे आमची.

‘वयात येणारी मुलगी म्हणजे पदरातला निखारा.’असं माझी आजी म्हणायची त्याची मला आठवण आली.

खरंच, कुठे गेले होते आमच्या दोघींमधले ते रेशीमधागे?

अन आजीच्या आठवणीबरोबर अचानक तिचं अजून एक वाक्य एखाद्या अग्निशलाकेसारखं मनात चमकून गेलं,

‘एखाद्याचं काही चुकत असेल तर आधी आपल्या वर्तनात, मनातही डोकावून बघावं. कदाचित आपलंही काही चुकत असेल...’

हा विचार मनात येताच मी कमालीची अस्वस्थ झाले.

खरंच, आपणही किती बदललोय गेल्या वर्षभरात? सततची चिडचिड अन त्रागा याशिवाय एक दिवसही जात नाही आपला.

वाढत्या वयाबरोबर अन तब्येतीच्या सततच्या तक्रारींमुळे कशी हतबल झाल्यासारखी वागत होते मी?

खरंतर जयने साऱ्या टेस्ट्स करायला लावल्या होत्या. सारंकाही नॉर्मल आलं होतं. शेवटी त्याने सांगितलंही होतं,

'ममा, या वयात हार्मोन्सच्या बदलांमुळे होतं असं. नथिंग टू वरी.'

विशालनंही कित्येकदा सांगून झालं होतं,

'तुझं मन रमवायला शीक प्रिया कुठेतरी. अग, अजून काही इतके म्हातारे नाही झालो आपण.'

अन मग त्याच्या खास आवाजात तो मोठ्याने गाणं म्हणत असे,'तू अभीतक है हसी, और मै जवान...'

मनावरचं सावट जरा दूर होऊ लागलं, तशी मी उठले. जेवायची वेळ झाली होती.

जयला बोलावण्यासाठी त्याच्या खोलीच्या दारावर टकटक करणार, तोच त्याचा दबलेला आवाज ऐकू आला. अनाहूतपणे माझी पावलं थबकली.

'नो नो डिअर, शी विल लाईक यू. डोंट वरी.'

ध्यानीमनी नसताना आकाशातून विजेचा लोळ अंगावर कोसळावा तसं झालं माझं.

जय, माझा लाडका जय? नक्कीच तो कुणातरी मुलीशी बोलत होता. त्याच्या ओळखीच्या सगळ्या भारतीय मुली माझ्याही परिचयातल्या होत्या. काही अमेरिकन मैत्रिणीही घरी येत. पण भारतीय मुलींशी तो बहुधा हिन्दीतून बोलत असे. नक्कीच ही इथलीच मुलगी होती. पण कोण? मागच्या वेळी घरी आली ती लिन्डा तर नव्हे?

विचारांच्या आवर्तात मी पुन्हा गरगरू लागले होते.

नवीन लग्न होऊन मी अन विशाल अमेरिकेत आलो, अन इथल्या जीवनाशी जुळवून घेता घेता इतकी वर्षं कशी भुर्रकन उडून गेली ते लक्षातही आलं नाही. मुलांचा जन्मही इथलाच. पण दोघेही मराठी, हिंदी अगदी उत्तम बोलत. जय डॉक्टर झाला अन मिताचंही कॉलेज सुरू झालं होतं आता. जयसाठी बऱ्याच लोकांनी आडवळणानं चौकशीही सुरू केली होती. पण ते सारे आमच्या

नेहेमीच्या ग्रुप मधलेच होते. त्यातली देशमुखांची मंजिरी तर मला एकदम पसंत होती. ती अन तिची आई आम्ही मैत्रिणीच होतो.

सुनेची अन जावयाची जी कल्पना माझ्या मनात होती ती अस्सल मराठमोळया रूपातलीच होती. इतकंच काय पण या वेळी भारतभेटीवर गेलो तेव्हा सुरेख अंजिरी रंगाचा शालू अन एक नवीन पद्धतीच्या दागिन्यांचा सेटही मी विकत आणला होता. हो, लग्न इथेच झालं तरी सुनेची हौस मौज करायचीच होती मला.

पण आता त्या साऱ्या स्वप्नांना सुरुंग लागला होता. मिताची मार्कशी असलेली वाढती मैत्री अन आता जयचं हे गुपित…

थकून जाऊन मी मागे वळले.

तेवढ्यात विशाल त्याच्या खोलीतून बाहेर आला. डोळयात साचणारं पाणी मी प्रयासाने परतवून लावलं. ‘चल प्रिया. जेवूया का? ये, मी जयलाही बोलावतो.’

माझा चेहेरा बघून त्यानं विचारलंच,

‘काय ग? अजूनही बरं नाही का वाटत?’

‘नाही. बरं आहे आता.’

मी उसना आव आणून म्हणाले.

जेवतानाही मी गप्पगप्पच होते. जयचे नेहेमी प्रमाणे विनोद सुरू होते.

मिता दोन वाजता उगवली.

माझा मूड बघून तिनंही विशेष बोलणं वाढवलं नाही.

रात्री विशालच्या कुशीत मात्र माझा बांध फ़ुटला.

सारंकाही नेहेमीच्याच शांतपणाने ऐकून घेतलं त्याने. अन मग हळुवार पणे तो मला समजावू लागला,

‘प्रिया, अजून त्याने आपल्याला काहीच सांगितलं नाहीय. अन खरं बोलायचं तर इथेच ते दोघे घडले, वाढले. त्यांच्या दृष्टीने हे सारं अगदी साहजिकच आहे राणी. शेवटी काय, आपल्याला त्यांचं सुख महत्वाचं. तू जितकं या गोष्टी सहजपणे घेशील तितकं तुझं मन आनंदी राहील. पंख फ़ुटले की पाखरं घरट्यातून उडूनच जाणार. जगाचा नियमच आहे हा.’

विशाल मला बराच वेळ समजावत होता.

त्याच्या समजावण्याने माझं मन अगदी नाही तरी थोडं शांत झालं.

सकाळी ब्रेकफास्टच्या टेबलवर जयनंच विषयाला तोंड फ़ोडलं.

‘ममा, बाबा, आज हॉस्पिटलहून येताना एका मैत्रिणीला घरी आणायचं म्हणतोय मी.’

‘नुसतीच मैत्रीण का खास मैत्रीण?’मिता चिवचिवली.

जयच्या कानाच्या पाळया लाल झालेल्या आम्हा दोघांच्या नजरेतून सुटल्या नाहीत.

‘अरे, लाजतोस काय लेका मुलीसारखा? माझ्याकडे बघ, त्या काळातसुद्धा तुझ्या आईला बघून घरी आल्यावर’लग्न करीन तर हिच्याशीच.’असं ठासून सांगितलं होतं मी.’विशालने जयची फ़िरकी घेतली.

‘अरे, पण कोण, नाव काय, काही सांगशील तरी?’मला आता रहावेना.

‘ममा, वी विल टॉक इन द इविनिन्ग.’मला आधीच उशीर झालाय.’

जय घाईघाईत उठलाच.

सारे आपापल्या कामावर निघून गेले अन घर पुन्हा शांत झालं.

अस्वस्थ मनाने मी बागेत बसून राहिले.

बागेत बसल्याबसल्या माझं मन वारंवार भूतकाळाची उजळणी करत होतं.

इथल्या संस्कृतीत आपली पाळंमुळं रुजवताना भारताशी आपले बंधही किती घट्ट ठेवले होते आपण इतके वर्षं. दसरा दिवाळी, संक्रांत सारे सण कसे उत्साहाने साजरे करत आलो आपण. मुलांनाही तेच शिकवलं. म्हणून तर जय नि मिता दोघेही

किती आवडीने दिवाळीला लवकर उठतात, अगदी उटणं सुद्धा न कुरकुरता लावून घेतात. आपले सारे भारतीय पदार्थ अतिशय आवडीने खातात.

संस्कृत श्लोक, स्तोत्रे, सारं येतं दोघांना. मुलांविषयीच्या अभिमानाने मन कसं फ़ुलून आलं.

पण लगेच दुसरं मन हळूच म्हणालं, या सगळयाबरोबर ख्रिसमस साजरा करायला तूच शिकवलंस ना दोघांना? मुलांना आवडतं म्हणून ख्रिसमस ट्री कोण आणत होतं दर वर्षी?सांता क्लॉज़ बघायला मॉलमधे आठवणीनं नेऊन, त्याच्याबरोबर फ़ोटो कोण काढत होतं दरवर्षी? हलोवीनच्या वेळी वेगवेगळे पोशाख घालून, चॉकलेट्स गोळा करायला जाताना तू सुद्धा तितकीच उत्साही होतीस ना?

इथल्या वातावरणात वाढताना मुलं कुठे मागे पडू नयेत म्हणूनही तेवढीच धडपड केलीस ना तू? दोन्ही संस्कृतींमधलं चांगलं तुझ्या मुलांनी उचललंय असं भारतातले नातेवाईक दर वेळी म्हणतात तेव्हा तुझं मन कसं मोहरून येतं ना?

मग आज जयची पत्नी म्हणून येणारी मुलगी परदेशी आहे म्हणून एवढा का धक्का बसावा तुला? मुलांचं सुख ते आपलं सुख असं म्हणणारी तू, इतकी का अस्वस्थ होतेस? ऊठ, घरी येणाऱ्या सुनेचं लेकीसारखं स्वागत करशील, तिच्याशी आपुलकीने वागशील, तर ह्या सीमारेषा केव्हाच नाहीशा होतील. अन जय अन मिता तर जीव की प्राण आहेत तुझे. मग त्यांच्या साठी काहीही करायची तयारी हवी तुझी.'

माझ्या आतल्या मनानंच माझ्याशी असा सुसंवाद साधला अन गेल्या कित्येक महिन्यात नसेल, एवढ्या चपळाईने उठले मी.

घरात येऊन, सजावटीवर एक हात फ़िरवला.

जयला आवडणाऱ्या सुरळीच्या वड्या करून ठेवल्या. मिताचा आवडता केशर बेदाण्याचा शिरा करायलाही विसरले नाही मी. सारा सरंजाम नीट मांडून ठेवून मी सगळयांची आतुरतेने वाट बघू लागले.

सगळयात आधी आली ती मिता.

माझ्याकडे बघून ती दोन क्षण दारातच थबकली.

‘ममा, किती दिवसांनी ही चंदेरी साडी नेसलीस तू. खूप बरं वाटतंय ग तुझ्याकडे बघून.’

मी काहीतरी हसून बोलणार तोच समोरच्या काचेच्या दारातून मला जयची गाडी येऊन थांबलेली दिसली. जय खाली उतरला अन तेवढ्यात गाडीचं दुसरं दार उघडलं.

आश्चर्याचा इतका धक्का मला मुळीच अपेक्षित नव्हता.

सतेज सावळ्या वर्णाची, लांबसडक केसांची वेणी घातलेली एक गोड मुलगी गाडीतून उतरली. चेहऱ्यामोहऱ्यानं ती अर्थातच भारतीय आहे हे सहज कळत होतं. अंगावरच्या जांभळ्या कांजिवरम साडीत अन मोजक्याच दागिन्यांत ती विलक्षण सुरेख दिसत होती.

माझ्याइतकाच धक्का मिताला बसलेला दिसत होता. त्याअर्थी नेहेमीसारखी ती जयला सामील नसावी.

दोघं पायऱ्या चढून वर आले अन माझ्या लक्षात आलं की इतके भावस्पर्शी डोळेही आपण कुठेच पाहिले नाहीत. अगदी आपल्या मितापेक्षाही सुरेख आहेत हिचे डोळे.

‘आई, मिता, ही लावण्या. माझ्या हॉस्पिटलमधे दोन महिन्यांपूर्वीच नर्स म्हणून काम सुरू केलय हिने. Lavanya, this is my mom and my darling little sister.’

दोन भुवयांच्या मधे, कुंकवाच्या खाली छोटासा भस्माचा ठिपका होता, त्यावरून अन नावावरून ही सुंदरी मद्रदेशीय आहे हे माझ्या लगेच लक्षात आलं.

तेवढ्यात विशालही घरी आला. एका कटाक्षातच त्याने जयला पसंतीची पावती दिली. जयने काही सांगायची गरज नव्हतीच. त्याचं एकंदर वागणं अन तिचा सलज्ज चेहराच सारंकाही सांगत होता. तिला हिन्दी मात्र मुळीच येत नव्हतं. त्यामुळे जय तिच्याशी इंग्लिशमधेच बोलत होता. म्हणून माझा गैरसमज झाला होता तर.

खाणंपिणं, हास्यविनोद झाल्यावर, तिच्या आईवडिलांचा फ़ोन नंबर घेतल्यावर, ती निघाली. तोच मी तिला थांबायची खूण केली.

घरात जाऊन, मी माझं कपाट उघडलं, अन तो अंजिरी शालू कुंकू लावून तिच्या हातात ठेवला. मितानं जयकडे बघून मजेत डोळे मिचकावले.

लावण्याला सोडून आल्याबरोबर जय माझ्या गळयात पडला.

‘ममा, कशी आहे माझी पसंती? तू रागावली तर नाहीस ना ग? म्हणून मी देशमुखांकडचं टाळत होतो.’

‘अरे सोन्या, अगदी तुला साजेशीच आहे मुलगी. पण आधी का नाही सांगितलस रे?’माझा स्वर किंचित दुखावलेला जयच्या लक्षात आला होता.

‘ममा, गेल्या दोन महिन्यात खूपदा तुला सांगावसं वाटलं ग, पण तू सतत इतकी रागावलेली असायचीस, इतकी अपसेट असायचीस की तुझी तब्येत बिघडायचीच खूप भीती वाटायची.’

त्याच्या डोक्यावरून हात फ़िरवत मी हसले,

‘हो रे राजा, खरंच असं झालं होतं. मला काय होतंय तेच कळत नव्हतं रे मला. आता मात्र तुझ्या लग्नाच्या तयारीसाठी सज्ज व्हायला हवं मला.

खूप खरेदी करायचीय, एकदा भारतात जाऊन यायचंय...’

मी स्वप्नात हरवून गेले. माझ्या लाडक्या जयचं लग्न...’

विशाल माझ्या परत आलेल्या मूडकडे, माझ्या सळसळत्या उत्साहाकडे अनिमिष नेत्रांनी बघत होता.

जिना चढणाऱ्या मिताला मी हलकेच हाक मारली,

‘मिता...’

तिनं थबकून मागे वळून पाहिलं.

‘या आठवड्यात मार्कलाही घेऊन ये बेटा घरी. आम्हालाही भेटू दे तुझ्या स्पेशल मित्राला...’

एक क्षणभरच मिताच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसलं, अन पुढच्या क्षणी धावत येऊन तिनं मला घट्ट मिठी मारली.

मायलेकींच्या डोळ्यातल्या पाण्यात इतक्या दिवसांचा दुरावा पार वाहून गेला होता.

माझ्या संसाराचे रेशीमधागे पुन्हा विणल्या गेले होते.

# आधार

घराचा दर्शनी दरवाजा उघडून रसिका आत आली. केसांवर, ओव्हरकोटावर पडलेले बर्फ़ाचे कण तिनं अलगद झटकले अन कोट नीट कपाटात लावून ठेवला. एक नजर आपल्या सुरुचीपूर्ण सजवलेल्या दिवाणखान्याकडे टाकतानाच तिच्या ओठांच्या कोपऱ्यात हसू उमटलं. बाहेर विलक्षण थंडी होती. शिकागोमधला हिवाळा म्हणजे अगदी नकोसा होत असे. अशा जीवघेण्या वातावरणात, कामावरून थकून आल्यावर विसावायला इतकं सुरेख घर आपल्याला आहे याचा थोडा अभिमान, थोडा आनंद तिच्या मनात तरंगल्यावाचून राहिला नाही.

जिन्याखाली पायातले बर्फ़ाचे बूट काढून ठेवत ती वर जायला निघाली, तोच हेमलचा किनरा आवाज अन भरतचं हसणं तिच्या कानावर पडलं.

‘आज बाप लेक इतक्या लवकर घरी?’मनाशी नवल करतच ती स्वैपाकघराकडे वळली.

‘ममा, ममा, आम्ही जेवण बनवतोय...’

हेमल धावत येऊन तिच्या गळयात पडली.

‘अरे, आज तुम्ही दोघं लवकर घरी कसे? अन आज तर पिझ्झा डे आहे आपला...’

हेमलला उचलून तिची पापी घेत रसिकानं प्रश्नार्थक नजरेनं भरतकडे पाहिलं.

‘अग, आज ऑफ़िसमधे लवकर संपलं काम. मग हेमललाही घेऊन आलो डेकेअर मधून. तसाही शुक्रवार आहे आज. म्हटलं एक दिवस आराम द्यावा बायकोला.’

टेबलावर झाकून ठेवलेली भांडी उघडून बघताबघताच रसिका एकदम खुशीत आली.

‘अरे वा, आज खास गुज्जु स्वैपाक...’

‘मग काय? आपण गुजराथ्याशी लग्न केलं आहे, याची आठवण करून द्यावी लागते बाईसाहेब मधून मधून. नाहीतर तू मला पक्का मराठी गडी बनवून टाकलंयस गेल्या दहा वर्षात...’

भरत दिलखुलास हसला. रसिकाही हसत हसत हेमलला घेऊन वर गेली.

आंघोळ करून, ताज्यातवान्या होऊन दोघी खाली आल्या. गप्पागोष्टी करत, हसत खेळत जेवण उरकलं. रसिकानं मागचं आवरायला घेतलं. कार्टून्स पहात सोफ़्यावर लोळणाऱ्या हेमलचे डोळे मिटायला लागले, तसं भरतनं तिला उचलून घेतलं.

‘हिला झोपवून येतो मी, रसिका…’

भांडी डिशवॉशरमधे लावता लावता रसिकानं मान डोलावली. दिवसभर ऑफ़िसमधे आज खूप काम पडल्यानं ती आता पार थकली होती. केव्हा एकदा अंथरुणावर पडतो असं झालं होतं तिला. पण आज शुक्रवार म्हणजे भरत नक्कीच जुना हिंदी सिनेमा घेऊन आला असणार.

काम आवरून ती सोफ़्यावर येऊन बसली. हेमलला झोपवून भरतही खाली येऊन बसला. पण आज नेहमीसारखं त्याचं लक्ष टी व्ही बघण्यात नव्हतं. रसिकाही मधूनच थोडीशी पेंगत होती.

‘मग काय करायचं रसिका,’बा’ला इकडे आणण्याबद्दल?

डोळ्यावरची झोप खाडकन उडाल्यासारखी रसिका जागी झाली. हा अप्रिय विषय निदान या वीकएंड पुरता निघू नये असं तिला फार फार वाटत होतं. पण भरतचा स्वभाव असाच. कुठलीही गोष्ट मनात घोळत असली की तिचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे.

‘सारं काही ठरवूनच टाकलयंस तू, तर मला जमेत घेतोस तरी कशाला? तू, अन तुझा निर्णय...’

काहीशा त्राग्यानंच ती म्हणाली.

‘अशी चिडचिड करून काही साधणार आहे का रसिका? काहीतरी मार्ग हा काढावाच लागेल ना आपल्याला?’

‘आपल्याला? माझा निर्णय समजा नाही असला तरी तू ऐकणार आहेस का? मग काय अर्थ आहे या बोलण्याला? अन तसाही यात हो किंवा नाही यापलिकडे तिसरा प्रश्न येतच नाहीय. मग? तू ठरव तुला हवं ते...’

रसिका आता पारच रागावली होती.

‘रसिका, शांत हो आधी. बा वर इतका राग ठेवून काही होणार नाहीय. शेवटी मी तिचा एकुलता एक मुलगा आहे. माझ्याशिवाय आता तिला कोण आहे सांग बरं? अन या वयात तिच्यावर नाराजी

ठेवून तू तरी काय मिळवणार आहेस? तू बघितलेली बा आता राहिली नाहीय ग. फार बदललीय ती...'

'बा... ? अन बदलणार?...'

रसिकाच्या ओठांना कळेल न कळेल अशी कुत्सित मुरड पडली.

'बां च्या बाबतीतल्या आपल्या साऱ्या आठवणी इतक्या कडवट आहेत की विसरू म्हटलं तरी न विसरण्यासारख्या.'

तिच्या मनात आलं.

भरतची चुलतबहीण रश्मी अन रसिका पक्क्या मैत्रिणी होत्या. रश्मीच्या वाढदिवसाच्या पार्टीत दोघांची ओळख झाली होती. अपऱ्या नाकाची, पिंगट डोळ्यांची अन बडबडी रसिका भरतला पहिल्याच भेटीत भावली होती. दोघांची ओळख मैत्रीच्या पुढच्या पायरीपर्यंत गेली केव्हा अन चोरून गाठीभेटी सुरु झाल्या केव्हा हे दोन्ही घरच्या लोकांना कळलंच नाही. अन जेव्हा कळलं तेव्हा दोन्हीकडे भडका उडाला होता. भरत गुजराती अन ती मराठी हे नुसतं एकच कारण नव्हतं त्याला.

भरतचं घर अगदी जुन्या वळणाचं, शाकाहारी अन गरिबीतून वर येऊन, धंद्यात उत्तम जम बसवलेलं. शहरात कित्येक दुकानं होती त्यांची. याउलट रसिकाकडे मध्यमवर्गीय पण आधुनिक वातावरण होतं. तिघी बहिणींमधली सर्वात मोठी रसिका. भाऊ नव्हता. मांसाहाराचं त्यांना वावडं नव्हतं, उलट आवडच होती. तिन्ही मुलींनी खूप शिकावं, नोकरी करावी, स्वावलंबी बनावं, हे तिच्या आईवडिलांचं स्वप्न. भरतच्या जुन्या वळणाच्या कुटुंबात आपली मुलगी कोमेजून जाईल असं तिच्या घरच्यांना वाटत होतं.

बां ना तर ही मॉडर्न सून नकोच होती. त्यांच्या माहेरच्या ओळखीतल्या एका घरातली मुलगी, हंसा, त्यांना सून म्हणून आणायची होती घरात.

आधीच घरच्या व्यवसायात लक्ष घालण्याऐवजी भरतनं इंजिनियर होऊन नोकरी पत्करली हे त्यांना नापसंत होतं. त्यामुळे हंसाच्या घरच्यांचा बिझिनेसही पुढेमागे त्यालाच मिळेल अन तो व्याप वाढल्यावर तो नोकरी सोडून धंद्यात लक्ष घालेल हा होरा होता त्यांचा.

पण बां चे सारे आराखडे, सारे मनसुबे या प्रेमविवाहाने उध्वस्त होणार होते. त्यात रसिकाचं आधुनिक वागणं त्यांच्या घरात चालणं शक्यच नव्हतं.

बरेच दिवस दोन्हीकडच्या लोकांची रणधुमाळी चालली, अन शेवटी काही नातेवाईकांच्या मध्यस्थीने भरत अन रसिकाचं लग्न ठरलं. भरत त्यानंतर दोन तीनदा रसिकाकडे येऊन गेला, अन त्याच्या लाघवी स्वभावानं त्यानं तिच्या आईबाबांना जिंकून घेतलं. रसिकाच्या बहिणी तर या उमद्या, हसऱ्या मेहुण्यावर फ़िदाच झाल्या. पण दुर्दैवानं हे भाग्य रसिकाच्या नशीबी नव्हतं. बा मनातून तिच्यावर सतत नाराजच होत्या. रुसवे फ़ुगवे न होता लग्न जेव्हा एकदाचं पार पडलं, तेव्हा रसिकानं सुटकेचा निश्वास सोडला. पण खरी लढाई आता पुढेच होती.

लग्न झाल्यानंतरच्या पहिल्याच दिवशी सासवा सुनांमधे संघर्षाची ठिणगी पडली. संध्याकाळी काही धार्मिक समारंभ होता, त्याबद्दल सांगायला बा तिच्या खोलीत आल्या. रसिका नुकतीच आंघोळ उरकून आरशासमोर केस विंचरीत होती. तिनं गाऊन

घातला होता. तिच्याकडे बघताच बां च्या कपाळावर आठी पडली.

‘आपल्या घरात गाऊनची पद्धत नाही रसिका. साडीच नेसतात मोठ्या माणसांसमोर…’

त्यांनी समजावणीच्या सुरात हे सांगितलं असतं, तर रसिका कदाचित इतकी दुखावली नसती, पण त्यांचे शब्द साधे असले, तरी सूर इतका हेटाळणीचा होता की तिला त्यातला विखार बरोबर समजला. तरीही आवाज अन मन दोन्हीवर संयम ठेवून ती म्हणाली,

‘फ़क्त खोलीतच घालणार आहे मी बा. खाली साडीतच येईन.’

‘तसं चालेल मग. नाही का बा?’

तेवढ्यात खोलीत आलेल्या भरतनं तिची बाजू घेतली.

त्यावर काहीही उत्तर न देता, बा खाली गेल्या. पण जाताना धाडकन ओढून घेतलेल्या दाराच्या आवाजानं दोघांनाही काय समजायचं ते समजलं.

अशाच कित्येक लहानलहान प्रसंगातून त्या दोघींमधला दुरावा वाढतच गेला. भरतचे वडील सतत धंद्याच्या निमित्ताने बाहेरच असत. ते तसे स्वभावाने कडक असले, तरी ते एकदा बाहेर पडले, की घरावर बां चं राज्य असे. कमरेला किल्ल्यांचा जुडगा खोचलेला, अंगावर खास उलटा पदर घेतलेली गुजराती साडी अशा वेषात बा घरात सगळीकडे जा ये करत, नोकरांना हुकूम सोडत असत. रसिका बहुतांश वेळ आपल्या खोलीतच असे.

मुलानं आपल्या मनाविरुद्ध सून घरात आणली असली, तरी आता तीच या घरची लक्ष्मी आहे, तेव्हा तिला आपल्यात सामावून घ्यावं- हे जाणण्याचा समजूतदारपणा बां मधे नव्हता, अन रसिका तर मुळातच नव्या पिढीचं प्रतिनिधित्व करणारी होती. त्यामुळे दोघींमधे कायम एक काटेरी भिंत उभी राहिली.

असं एक वर्ष लोटलं. या वर्षभरात बा अन रसिकाचं शीतयुद्ध सुरुच होतं. दोघींच्या मधे बिचाऱ्या भरतचा चांगलाच कोंडमारा होत असे. त्याचे वडील या त्यांच्यामते क्षुल्लक गोष्टींमधे पडत नसत. अन तसेही ते सदानकदा बिझिनेस वाढवायच्या फ़िकिरीत असत.

लग्नाआधी मुक्त पाखरासारखी वावरणारी रसिका, पण सतत जुन्या चालीरीती पाळाव्या लागत असल्याने तिची अवस्था पिंजऱ्यात कोंडून घातल्यासारखी झाली होती. वेगळं रहायचा विचार करणंसुद्धा त्या घरात धाडसच होतं. अर्थात आधी साऱ्या गोष्टींची कल्पना रश्मीनं दिलेलीच असल्याने तिला तक्रार करायला जागाच नव्हती. भरतचा समजुतदार स्वभाव अन त्याचा तिच्यात असलेला जीव या दोन गोष्टींवर ती आला दिवस ढकलत होती.

अन अचानक कोंडी फुटावी तसं झालं रसिकाचं. भरतला अमेरिकेला जायची संधी मिळाली. तीन वर्षांसाठी त्याची कंपनी त्याला पाठवणार होती. मनातून जरी खूप आनंद झाला, तरी रसिकाच्या मनात अनेक शंका थैमान घालत होत्या. घरून त्याला विरोध होईल हे तिला माहीतच होतं, अन तसा प्रबळ विरोध झालाही. पण भरतला मुळातच वेगळ्या क्षेत्राची आवड असल्याने तो आपल्या निर्णयावर ठाम होता. घरात बराच गोंधळ माजला, पण शेवटी भरत रसिकाचं जाणं निश्चित झालं.

विमानात बसल्यावर रसिकानं अगदी मोकळा श्वास घेतला. आता निदान तीन वर्षं तरी ती हवं तसं वागायला रिकामी होती. शिकागोला पोचल्यावर दोघांचं छोटसंच अपार्टमेंट तिनं अगदी सुरेख सजवलं. दुकानात जाऊन मनासारखे पाश्चात्य पद्धतीचे कपडे ती घेऊन आली. स्वतः च्या मनाने प्रथमच सगळं करताना आपलं लग्न अन संसार जणू कालच सुरु झालाय अशी सुखद अनुभूती ती घेत होती. भारतात असताना बांच्या वागण्यामुळे कधीकधी होणारी चिडचिडही आता नव्हती. तिच्या या लग्नानंतर प्रथमच दिसणाऱ्या उत्साही, फ़ुलपाखरी वृत्तीने भरतही जाम खूष होता.

वर्षभरातच हेमलचा जन्म झाला अन रसिकाच्या साऱ्या सुखावर जणू कळसच चढला. भरतही त्याच्या नोकरीत स्थिरावत गेला. अमेरिकेतली कार्यपद्धती, एकंदर वातावरण त्यालाही आवडू लागलं. अन तीन वर्षांचा व्हिसा वाढत जाऊन, शेवटी ग्रीनकार्ड अन अखेरीस अमेरिकन नागरिकत्वापर्यंत दोघे येऊन पोचले केव्हा हे त्यांनाही समजलं नाही. प्रथम मोठं अपार्टमेन्ट, अन मग मोठं घर अशी स्थित्यंतरं अगदी सहजच झाली. घरी दोन गाड्या आल्या. संगणकीय क्षेत्रातले काही अभ्यासक्रम पूर्ण करून रसिकानंही नोकरी पत्करली. नाही म्हणायला दर दोन वर्षांतून भारतवारी होत

असे. पण बांचा स्वभाव काही विशेष बदललेला रसिकाला कधीच वाटला नाही. उलट हेमलनंतर आता मुलगाच व्हायला हवा असं अप्रत्यक्षपणे अनेकदा फ़ोनवरही सुचवून त्यांनी रसिकाच्या मनात त्याही बाबतीत अढी निर्माण केली होती. या काही गोष्टी वगळल्या तर रसिकाचा संसार अगदी दृष्ट लागण्यासारखा चालला होता.

हे सारं ढवळून निघालं दीड वर्षांपूर्वी झालेल्या भरतच्या वडिलांच्या आकस्मिक मृत्यूनं.

भरतचे वडील गेल्याचा फ़ोन आला तेव्हा भरत दौऱ्यावर होता. रसिकानंच धावपळ करून तिघांची तिकिटं काढली. मिळेल त्या फ़्लाईट्स घेत ते भारतात घरी पोचले तोवर सगळे अंत्यसंस्कार अर्थातच आटोपले होते.

बांच्या या रंगहीन रूपाकडे रसिकाला बघवेचना. अंगावर पांढरी बारीक किनारीची साडी नि अलंकारविहीन अशा त्या बाप्पांच्या फ़ोटोजवळ बसल्या होत्या. आवाजातली नेहेमीची धार लुप्त झाली होती. पण रसिकाशी वागताना नेहेमीचाच कोरडेपणा सुरात अन स्वभावात डोकावत होता. नाही म्हणायला हेमलला आल्या आल्या त्यांनी घट्ट जवळ घेतलं अन त्यांच्या डोळ्यांचे

कोपरे पाणावलेले वाटले, की भासच झाला रसिकाला? कोण जाणे.

बाप्पांचे दिवस झाल्यावर भरतनं अन रसिकानं निदान काही दिवस तरी अमेरिकेला चलण्याचा बा ला खूप आग्रह केला. पण त्याला त्यांनी ठाम नकार दिला. दुकानांची व्यवस्था बघणारं कोणीच नाही अन शिवाय बरीच इतरही कामं मार्गी लावायची आहेत या सबबीखाली त्या विषयावर जास्त बोलायचंही टाळलं त्यांनी.

एखाद दीड वर्षं सुरळीत पार पडलं अन मग मात्र चक्क भारतातून बांचे फ़ोन येऊ लागले. बोलणं अर्थात जास्त वेळ भरतशीच असे, पण फ़ोन ठेवल्यावर तो बराच वेळ गंभीर होत असे. मधूनच ’बा आता खूप कंटाळलीय’ असंही पुटपुटत असे.

अन अखेरीस त्यानं मागच्या आठवड्यात’बा ला नेहेमी-करताच आणायचा विचार असल्याचा’गौप्यस्फ़ोट केला होता. तेव्हापासून मधून मधून दोघांमधे या कुरबुरी सुरू झाल्या होत्या.

अखेरीस’काही दिवस बा ला आणायचं, अन सारी परिस्थिती बघून पुढचा निर्णय घ्यायचा’असा सुवर्णमध्य साधण्यात आला अन बां चं येणं निश्चित झालं.

विमानतळावर बा जेव्हा बाहेर आल्या तेव्हा रसिकानं प्रथम त्यांना ओळखलंच नाही. एकतर त्यांचं वजनही खूप कमी झालं होतं. नेहमी भरपूर उंची अन वजनामुळे धिप्पाड दिसणाऱ्या बा अगदीच थकल्या भागलेल्या वाटत होत्या. प्रवासाचा शीण असेल असा विचार रसिकानं केला.

आठवड्याभरानं, बांचा जेटलॅग कमी झाला. अन त्या थोड्या माणसांत आल्या. रसिकाशी बोलताना आता त्या बऱ्याच सौम्य वाटत होत्या. वीकएंडला भरत घरी आल्यावर त्या आपली बॅग उघडून बसल्या. हेमलसाठी लाखेच्या बांगड्या, घागरा, बिंदीपासून सारे खड्यांचे दागिने, बरेचसे फ्रॉक्स, भरतसाठी चुरीदार कुर्ता हे सारं तर त्यांनी आणलं होतंच, पण नवलाची गोष्ट म्हणजे रसिकासाठी खास गुजराती साड्यांबरोबरच जीन्स वर घालायला भरतकाम केलेले कुर्ते सुद्धा त्या घेऊन आल्या होत्या.

काहीशा निर्विकार भावानंच रसिकानं ते सारं घेतलं खरं, पण आता आपल्याजवळ रहाण्यासाठी ही सारी लाडीगोडी आहे असा विचार तिच्या मनात आल्याशिवाय राहिला नाही.

बांना येऊन आता एक महिना लोटला होता. या काळात रसिकानं आपल्या दिनक्रमात मुद्दामच कोणताही बदल करण्याचं टाळलं होतं. सकाळी उठून ती भरत अन हेमलचा डबा तयार करीत

असे. त्यानंतर स्वतःचा डबा अन बांसाठी जेवण करून ती कामावर निघून जाई. जाताना त्यांना जेवून घ्या असं ती सांगत असे. संध्याकाळी आधी भरत येई, मग हेमलला घेऊन रसिका डे केयर मधून येत असे. रसिकानं काही दिवस सुट्टी घ्यावी असं भरतनं सुचवून पाहिलं, पण ऑफ़िस मधे खूप काम आहे या सबबीवर तिनं नकार दिला होता. आल्यावर ती संध्याकाळचा स्वैपाक करीत असे. बा तिला भाजी निवडणे, लसूण सोलणे अशा बारीकसारीक कामात मदत करीत असत. पूर्ण काम त्यांच्यावर या वयात टाकणं रसिकाला प्रशस्त वाटत नव्हतंच, शिवाय कुठलीही गोष्ट पूर्णपणे त्यांच्या ताब्यात देण्याची थोडीशी भीतीही तिच्या मनात वावरत होतीच.

‘रसिका, तू बा शी जरा अलिप्तपणेच वागतेस असं नाही वाटत का तुला?

अचानक एक दिवस, वर आल्यावर भरतनं रसिकाला सरळच प्रश्न केला.

त्याच्या प्रश्नानं रसिका चांगलीच उखडल्यासारखी झाली.

‘हा प्रश्न जरा भूमिका बदलून, माझं लग्न झालं तेव्हा तुझ्या आईला विचारावासा नाही वाटला तुला, भरत? तेव्हा तर तू मलाच जुळवून घ्यायला सांगत होतास...’

‘मान्य आहे मला, रसिका...’भरत किंचित वरमून म्हणाला.

‘पण झालं ते झालं. आता भूतकाळातल्या कडू आठवणी उगाळत राहून तू किती दिवस अशी तुटक वागणार आहेस? अन त्याचा त्रास साऱ्याच घराला होईल. त्यापेक्षा खेळकरपणे सारं घेतलस तर जास्त चांगलं नाही का?’

‘मी त्यांच्या वागण्याने इतकी दुखावलेय भरत याआधी, की त्यांच्याशी कुठले धागे जुळवावेसेच वाटत नाहीत रे...’

आता भरतही चिडला.

‘मी इतकं समजावून सांगतोय, तर तुझं पुन्हा तेच ते. माणसं बदलतात रसिका. इतकं हटवादी राहून नाही चालत. जाऊ दे. तुला वाटेल तसं वाग. मी याउप्पर काही बोलणार नाही...’

सकाळी रसिकाला जरा उशिराच जाग आली. डोकं जड झालं होतं अन दुखतही होतं. गोळी घेऊन, तिनं ऑफ़िसला उशिरा येणार असल्याचं कळवलं अन ती झोपून राहिली. भरत अन हेमल निघून गेले होते. बा एकदा वर येऊन तिला काही हवं का विचारून गेल्या.

त्यांना जरा वेळानं उठते, तुम्ही नाश्ता करून घ्या असं सांगून ती पुन्हा पडून राहिली.

अगदी अर्धा तासच तिचा डोळा लागला असेल, कर्कश्श वाजणाऱ्या बेलनं ती जागी झाली. थोडा वेळ बा दार उघडतील असा विचार करून ती उठलीच नाही. पण खालून काही आवाज येईना, अन बेल वाजतच होती.

चडफ़डतच रसिका खाली आली. बा आंघोळीला गेल्या होत्या.

दार उघडताच समोर दोन निळ्या वेशातल्या पोलिसांना बघून ती बुचकळ्यातच पडली.

'मिसेस पॅरेख... ?'

"या. व्हॉट्स द मॅटर?'

'युवर हजबंड हॅज मेट विथ ॲन ॲक्सिडेंट...'

पुढचं काही ऐकायच्या आधी रसिकाला भोवळ आली.

रसिकाला जाग आली तेव्हा तिला सोफ़्यावर झोपवलं होतं. बा जवळच गरम दुधाचा पेला घेऊन बसल्या होत्या. आजुबाजूची दोन भारतीय कुटुंबं, शर्मा अन मनसुखानी पण जमली होती.

‘भरत, हेमल…’

स्वतःशीच बोलत रसिकानं उठण्याचा प्रयत्न केला.

‘हळू, हळू ऊठ रसिका. अन हे गरम दूध घे आधी…’बा म्हणाल्या.

‘पण बा, ते दोघं…’

‘हेमल अगदी ठीक आहे रसिका. भरतनं तिला शाळेत सोडल्यावर झालं हे. हातापायाला बराच मार लागलाय पण जिवावरची दुखापत मुळीच नाहीय. तू हे घे, अन या लोकांबरोबर जा. हेमलला आणायला शर्मांची मुलगी गेलीय. मी घरी थांबते हेमलबरोबर. तू आधी भरतला बघून ये, अन मग मी जाईन बरं.’

‘पण हे सारं कोणी सांगितलं बा तुम्हाला?’

‘मी आंघोळ करून बाहेर आले तेवढ्यात अन मला सारा प्रकार कळला. शेजारचे नंबर होतेच तुम्ही दोघांनी देऊन ठेवलेले,

त्यावर फ़ोन केले मी. अन या लोकांनी दवाखान्यात फ़ोन केला लगेच. पण आता हे बोलत बसायला नकोय. जा तू आधी.’

रसिका दवाखान्यात पोचली अन भरतला बघून तिला रडूच यायला लागलं. हातापायाला भलेमोठे बॅंडेजेस, डोक्याला पट्ट्या...

‘अग रडतेस काय वेडी... मी बरा आहे अगदी. अन बा न हेमल कुठे आहेत?’भरत क्षीण आवाजात म्हणाला.

‘त्या दोघी घरी आहेत. हेमलला भीती वाटेल सारं बघून म्हणून बा तिच्याजवळच राहिल्यात...’

डॉक्टरांशी बोलून, सारं नीट समजावून घेऊन रसिका घरी निघाली. आत आल्याबरोबर तिला बां चं हळुवार सुरातलं गाणं ऐकू आलं. हलक्या पावलांनी ती वर गेली. बा हेमलला अंगाई म्हणून झोपवत होत्या. मधूनच पदरानं डोळे पुसत होत्या. रसिकाला बघताच त्या उठल्या.

‘झोपलं लेकरू. जेवली ग ती. आता तू ये बघू जेवायला. मी थांबलेय तुझ्यासाठी...’

‘बा...’

रसिकाला एकदम भरूनच आलं. पटकन ती बांच्या गळयात पडली.

‘चल रडू नकोस आता. मलाही जायचंय न दवाखान्यात...’तिचे डोळे पुसून बा तिला खाली घेऊन आल्या.

चार महिन्यांनी भरत पुष्कळच बरा झाला. एक दिवस तो खोलीत आला तर रसिका स्टडी टेबलजवळ काहीतरी लिहीत होती.

‘हं, हे घे. सह्या कर याच्यावर...’

‘काय आहे हे... ?’

‘बां चा व्हिसा वाढवायचे कागद आहेत. अन हो, उद्या दोघंही वकिलाकडे जाऊन येऊ या. त्यांना इथेच ठेवण्यासाठी काय करावं लागेल ते...’

‘खरं म्हणतेस? पण अशी खाष्ट सासू चालेल का तुला नेहेमीकरता घरात?’

भरतचे डोळे मिश्किलपणे चमकत होते.

पण रसिका गंभीर होती.

‘तू म्हणाला होतास तेच खरं आहे भरत. माणसं बदलतात. जुन्या गोष्टी जन्मभर उगाळणं बरोबरच नाही. अन या वयात त्या बदलल्या, बदलू शकतात, तर मी बदलायला काय हरकत आहे? खरंच, काय हरकत आहे... ? या चार महिन्यात मला पुरतं कळलंय रे, म्हाताऱ्या माणसांना जसा आपला आधार हवा असतो ना, तशीच ती पण आपला आधार होऊ शकतात रे...’

रसिकाच्या पापण्यांवर एक थेंब हलकेच उतरला.

‘झालं. लागल्या वेडाबाई रडायला पुन्हा. भारीच बुवा पाणीदार डोळे तुझे...’

दोघांच्या हसण्याने घर उजळलं.

बा त्यांच्या खोलीत शांत झोपल्या होत्या. शेजारीच झोपलेल्या हेमलचा हात त्यांच्या गळ्यात होता.

# नाती

ओसरीवर चपला काढून ठेवत मास्तर जुईच्या वेलाखाली ठेवलेल्या बादलीकडे गेले. थंड पाण्याचे दोन तांबे पायावर घेतल्यावर उन्हाची तलखी थोडी कमी झाली. तेच पाणी घेऊन त्यांनी चेहरा, हात स्वच्छ धुतले. आता त्यांना बरीच हुशारी वाटू लागली. जवळच पाटावर ठेवलेल्या पंचानं तोंड पुसून ते ओसरीवर थोडे टेकले.

तोच हातात पन्ह्याचा पेला घेऊन सुमतीबाई बाहेर आल्या.

‘दमलात ना हो? आज खूप तापली होती उन्हं. मला काळजीच वाटत होती...’

‘छे, काळजी कशाची?’विमनस्क सुरात मास्तर म्हणाले. त्यांचा ओढलेला सूर ऐकूनच आजही पगार झाला नाही हे न सांगताच कळलं सुमतीबाईंना.

पन्ह्याचे दोन घोट घेऊन मास्तर मागे सरकून, ओसरीच्या भिंतीला टेकून बसले.

‘नको आता पन्हं. इच्छाच नाहीय बघ आज...’

‘अहो, नाही झाला पगार तर नाही. होईल आज ना उद्या. असं उदास होऊन कसं चालेल बरं? अन अजून पंधरा दिवसांचे डाळ तांदूळ आहेत घरात. तोवर होईलच.’त्या समजुतीनं म्हणाल्या.

एक सुस्कारा टाकून मास्तर पुन्हा सरकून बसले. सुमित्राबाई त्यांच्याजवळच अधोवदन बसल्या होत्या. त्यांच्याकडे बघताबघता मास्तरांना एकदम गहिवरूनच आलं.

अंगावर साधीच सुती साडी, गळयातल्या मंगळसूत्राशिवाय अंगावर एकही दागिना नाही, हातात भरगच्च काचेच्या बांगड्या अन गावातल्या जत्रेत घेतलेल्या खोट्या मोत्यांच्या कुड्या.

या रूपातही किती खानदानी, शालीन दिसत होत्या त्या.

‘सुमती, मी तुला काहीच देऊ शकलो नाही ग. माझ्या संसारात लंकेची पार्वतीच राहिलीस तू...’

‘काहीतरीच काय बोलताय आज? काय झालंय काय तुम्हाला? कधी काही तक्रार केली का मी? अगदी सुखात आहे मी. पुन्हा असं मनातसुद्धा आणू नका...’सुमतीबाई हलकेच म्हणाल्या.

‘अन चला पाहू आत. मुलं झोपेला आलीत. लवकर जेवून घेऊ या. दोघंही थांबलीत तुमच्यासाठी अजून...’

हाताला धरून उठवलंच सुमतीबाईंनी त्यांना.

अस्वस्थ मनानंच मास्तर आत आले. अकरा वर्षांचा सुमंत खिडकीजवळच्या टेबलावर अभ्यासाचा पसारा मांडून बसला होता. मागच्या अंगणातल्या फ़रशीवर झाडाखाली खेळणारी धाकटी जानकी आपल्याच नादात होती.

‘मुलांना कशाला थांबवलंस ग? वाढून द्यायचं त्यांना.’

‘ती ऐकणार आहेत थोडीच? तुमचीच मुलं ती...’

किंचित हसून, कृतककोपाने सुमतीबाई म्हणाल्या.

सुमतीबाईंनी पानं घेतली अन जानकीला हाक दिली,

‘ये ग सोने आता घरात. उन्हं उतरली असली तरी झळा जाणवताहेत अजून...’

आईची हाक ऐकताच जानकी घरात आली. चौघंही जेवायला बसले. साधंच जेवण. भात, मुगाची आमटी अन अंगणातल्या

झाडावरच्या ताज्या कैरीची चटणी. पण सुमतीबाईंच्या हाताच्या चवीने साध्याच अन्नाला विलक्षण रुची येत असे.

भराभर घास घेत, कसबसं मास्तरांनी जेवण संपवलं. झाकपाक करून, मुलांना झोपवून सुमतीबाई बाहेर आल्या तेव्हा मास्तर परसातल्या आंब्याच्या झाडाखाली सतरंजीवर लवंडले होते.

‘झोपलात का हो?’

‘त्यांच्या जवळ बसत, हळूच सुमतीबाईंनी विचारलं.

‘नाही ग. तीही रुसलीय वाटतं माझ्यावर...’

‘तीही? म्हणजे आणखी कोण?’

‘ही परिस्थिती ग. कधी बदलेल असं झालंय बघ मला...’

‘असं हार मानून कसं चालेल बरं? अन इतकं काही वाईट नाही आपलं. मी मघाशी सांगितलंच तुम्हाला, की अजून पंधरवडा सहज जाईल. शिवाय परसातल्या भाज्या आहेत. होईल सारं नीट...’

सुमतीबाई असं म्हणाल्या खऱ्या, पण मास्तरांनी काहीच उत्तर दिलं नाही. डोळ्यांवर एक हात घेऊन ते पडून राहिले. हवेत आता हलका गारवा जाणवू लागला होता. पण मास्तरांच्या तप्त मनाला त्यानं आज सुखावलं नाही.

‘खरंच, या बारा वर्षात किती तडजोडी केल्या सुमतीनं. आजच्या इतकी आर्थिक टंचाई कधी जाणवली नाही हे खरंय, पण ती ज्या थाटात, वैभवात वाढली त्याचा मागमूसही नव्हता या छोट्याशा घरात. या बारा वर्षात तक्रार म्हणून ऐकली नाही आपण कधी तिच्याकडून. कायम हसतमुख असते. मुलंही तिच्यासारखीच. शांत, समजूतदार...’

‘अन काळजी करायची नाही हे कसं शक्य आहे? गेले सहा महिने पगार नाही. शिक्षक संघटनेच्या वाटाघाटी चालूच आहेत पण कधी तडीस जातील माहीत नाही. शिल्लक संपत आली आहे. उसनं कुणाकडून घेणं आपल्या मानी मनाला सोसवणारं नाही. काय करावं? कसं करावं?...’

मास्तरांचं विचारचक्र अविरत धावत होतं.

बारा वर्षांपूर्वीच्या घटनांचा चित्रपट मास्तरांच्या मिटल्या डोळयांसमोरून सरकत होता.

सुमतीबाईंचा नि मास्तरांचा प्रेमविवाहच होता एका परीने. दोघेही बरोबरच वाढलेले. एकाच लहानशा गावात नि एकाच शाळेत. सुमतीबाईंचे वडील जमीनदार होते. घरी भरपूर पैसाअडका, दूधदुभतं, कशालाच काही कमी नव्हतं. सुमतीचा मोठा भाऊ श्रीहरी अन शेंडेफळ सुमती. ही दोन्ही मुलं अगदी लाडाकोडात वाढलेली. जमीनदारांच्या पत्नी सुमतीच्या लहानपणीच गेल्यानं आजीची माया अन वडिलांचा करारी, कडक स्वभाव या वातावरणात दोघंही लहानाची मोठी झाली.

तारुण्याची चाहूल लागली अन बालपणीच्या मित्रावर आपला जीव जडलाय हे सुमतीला हळूहळू जाणवू लागलं. त्यानं सहज विचारलेल्या प्रश्नावर आपण इतके लाजून लाल का होतो, बागेतल्या रसाळ फ़णसाचे गरे त्याच्या आईला नेऊन द्यायचा बहाणा करून वारंवार त्याच्या घरी का जातो, त्याला दुरून

सायकलवरून येताना पाहून आपल्या ह्दयाची धडधड का वाढते हे तिला कळतच नसे. काही काळातच हे एकतर्फ़ी प्रेम एकतर्फ़ी राहिलं नाही. अन एके दिवशी दोघांनाही आमराईत लाजून गुजगोष्टी करताना श्रीहरीनं पाहिलं. मोठ्या भावाच्या तत्परतेनं त्यानं ही गोष्ट वडिलांच्या कानावर घातली.

जमीनदारसाहेब तापट असले तरी खुल्या विचारांचे, समंजस होते. सुमतीला समोर बसवून त्यांनी सरळच विचारलं. तिनंही प्रामाणिकपणे दोघांचीही लग्नाची इच्छा असल्याचं सांगून टाकलं.

‘त्यांच्या घरच्या नि आपल्या परिस्थितीत महदंतर आहे हे माहीत आहे ना तुला? एकदा लग्न झाल्यावर प्रेमानं पोट भरत नाही.’

श्रीहरीने नाराजीनेच विचारलं. त्याला हा निर्णय फारसा पसंत नव्हता. पण सुमती आपल्या निर्णयावर ठाम होती नि एक आर्थिक परिस्थिती सोडली तर मुलामधे नाव ठेवायला जागा नव्हती इतका तो सालस होता.

मास्तरांच्या इच्छेनुरूप लग्न साधेपणानं पार पडलं. सुमतीच्या माहेरून काहीही स्वीकारायला मास्तरांनी नकार दिला. सोन्याचं एक मंगळसूत्र सोडलं तर सुमतीला सासरून एकही दागिना मिळाला नाही. तिच्या आईच्या दोन बांगड्या मात्र आजीनं आईची आठवण म्हणून तिला घ्यायला लावल्या.

मास्तरांच्या घरी सुमती अगदी समरस होऊन गेली. सुरुवातीला'मोठ्या घरची मुलगी'म्हणून जरा बिचकतच वागणाऱ्या सासूसासऱ्यांचं मनही तिनं अगदी सहजच जिंकून घेतलं. साध्या साध्या वस्तूंनी घर सजवलं. मास्तरांच्या पगारात अगदी चैनीत नसलं तरी खाउनपिऊन सुखी असा त्यांचा संसार चालला होता. वृद्ध सासूसासऱ्यांच्या अंतकाळी सुमतीनं अगदी मनापासून त्यांची सेवा केली अन त्यांचे आशिर्वादही घेतले.

आजवर तसं अगदी छान चाललं होतं. पण गेल्या सहा सात महिन्यात संपाचे वारे वाहू लागले अन पगार अडकला. थोड्या शिलकीवर सहा महिने कसेबसे काढले पण आता झळ चांगलीच जाणवू लागली होती. यातून मार्ग कसा काढावा हे मास्तरांनाही

कळेनासं झालं होतं. माहेरून काही मदत मागावी का असा विचार सुमतीनं बोलून दाखवताच मास्तरांनी ठाम नकार दिला होता.

पण पंधरवड्यात पगार झाला नाही तर परिस्थिती बिकट होती.

पडल्या पडल्या मास्तरांचा किंचित डोळा लागला. पण त्यांच्याजवळ बसलेल्या सुमतीबाई अजूनही विचार करीत होत्या.

‘माहेरी जाऊन दादाला मागावे का पैसे? ह्यांना मुळीच आवडणार नाही हे खरंय पण पगार झाला की परत करता येतील. अन इतक्या वर्षात दादाने राखी, भाऊबिजेला दिलेल्या पैशातला एक रुपया फ़क्त वरचा घेतलाय आपण. यांना आवडत नाही म्हणून…’

‘आजवर यांच्या संसारात खाऊन पिऊन सुखी होतो आपण. ही अशी अडचणही कधी आली नाही. पण आता वेळ कठीण आलीय. मुलांची फ़ी, किराणा, इतरही अनेक किरकोळ खर्च कसे निभायचे?…’

‘माहेरून काही मागू नये इतपर्यंत ठीक आहे, पण त्यांनी प्रेमानं दिलेलं स्वीकारायचं नाही हा कसला हट्ट? ही कसली नीतीमूल्यं? नातेवाईकांमधे देणंघेणं चालतच असतं…’

मनात डोकावून गेलेल्या कडवट विचारांनी सुमतीबाई जराश्या दचकल्याच.

‘आदर्श, प्रेम, ह्या साऱ्या गोष्टी भरल्या पोटीच ठीक असतात. फाके पडायची वेळ आली की हे सारे डोलारे पत्त्यांच्या बंगल्यासारखे कोसळत जातात...’असं श्रीदादा आपल्या लग्नाच्या हट्टावर चिडून म्हणाला होता ते खरं की काय?’

मनातल्या विचारांची सुमतीबाईंनाच लाज वाटली.

‘इतकी वर्षं ह्यांच्या आदर्शांवर विश्वास ठेवून काढली तेव्हा सुखातच होतो ना आपण? सोन्यानाण्यांचे डोंगर नसतील जमवले आपल्या सालस नवऱ्याने. पण त्याच्या स्वभावानं अन चोख वागण्यानं गावात किती चांगलं नाव आहे त्यांचं. मास्तरांची पत्नी म्हणून या आदराचा, कौतुकाचा आपला भाग आपणही मनापासून झेलतच आलोय ना? मग या थोड्याशा अडचणींना घाबरून कसं चालेल?... बघूया कसं काय होतं ते...’

मास्तरांना हलकेच हलवून त्यांनी उठवलं. घरात येऊन दोघेही अंथरुणावर पडले. माहेरी मदत मागायचा बेत तेवढ्यापुरता सुमतीबाईंच्या मनातून दूर झाला.

पण असेच आठ दहा दिवस गेले. पगाराचं काही चिन्ह दिसेना. तेव्हा सुमतीबाईंच्या मनात पुन्हा जुन्या विचारानं उचल खाल्ली. मास्तर आता चिंता बोलून दाखवत नव्हते, पण त्यांच्या चेहऱ्याकडे बघून सुमतीबाईंच्या पोटात तुटत होतं. आता तीन चार दिवसात पगार झाला नाही तर कोणालातरी मागणं हाच उपाय होता.

‘दुसऱ्या कोणाला मागण्यापेक्षा दादा घरातलाच नाही का?...’सुमतीबाईंना मनापासून वाटत होतं. पण मास्तरांची काय प्रतिक्रिया होईल, ते दुखावणार तर नाहीत ना...’या आणि अशाच गोष्टी त्यांच्या मनात थैमान घालीत होत्या.

शेवटी सकाळी उठल्यावर त्यांनी मनात एक विचार पक्का केला.

‘माहेरी जायचंच. दादाकडून पैसे मागून आणायचेच. घरी आल्यावर ह्यांना समजावता येईल. पण ही कोंडी आता फ़ुटायलाच हवी. पैसे मागायला जातोय हे नाही सांगायचं घरी... नाहीतरी वहिनी अन दादाला बऱ्याच दिवसात भेटलो नाहीय आपण...’

सकाळची कामं भराभर उरकत त्यांनी एकीकडे स्वैपाकही लवकरच करून ठेवला. मास्तर आंघोळ करून आले तसं हलकेच त्या म्हणाल्या,

‘आज जरा माहेरी जाऊन येऊ का मी? स्वैपाक करून ठेवलाय. तुम्ही शाळेतून थोडे लवकर याल तर येताना मुलांनाही घेऊन या. संध्याकाळपर्यंत येतेच मी परत...’

‘हो, हो. अगदी निश्चिंत मनानं जा तू, सुमती. घरच्या रामरगाड्यात तुला फारसं माहेरी जाताच येत नाही. उशीर झाला तर काळजी करू नकोस. खिचडी करीन मी रात्रीसाठी. नाहीतर असं कर ना, रात्री राहिलीस तरी चालेल. सकाळी मी येईन तुला घ्यायला. नाहीतरी उद्या रविवारच आहे...’

मास्तर स्निग्धपणे म्हणाले.

‘नको, नको. मी रहायला जात नाही कुठे मुलांना सोडून. तसंच कारण असल्याशिवाय...’

‘ते ही खरंच आहे म्हणा. फ़क्त वडिलांच्या मृत्यूनंतर अन श्रीहरीच्या लग्नात काय ती तू माहेरी राहिलीस. काय करणार? नवऱ्याला सोडून तुला राहवतच नाही ना?’

मास्तरांच्या थट्टेनं सुमतीबाईंच्या गालावर गुलाब फुलले.

सारं भराभर आवरून सुमतीबाई निघाल्या. हातातली पिशवी फारच मोठी अन जुनाट असल्याचं आत्ता कुठे त्यांना जाणवलं. पण घरात दुसरी पिशवी नव्हतीच. भराभर चालत त्या जात होत्या. ऊन तापायला सुरुवात झाली होती. बरोबर वहिनीच्या आवडीचं घरच्या आंब्याचं ताजं लोणचं अन परसातले अळू घ्यायला त्या विसरल्या नव्हत्या.

वाड्याचं भलंमोठं दार दिसू लागलं तशा त्या थोड्या थबकल्या. पदरानं घाम पुसत, हातातली पिशवी त्यांनी नीट धरली. या बारा वर्षात, माहेरी जाताना इतका संकोच, इतकी हुरहूर कधी मनात दाटल्याचं त्यांना आठवत नव्हतं.

आश्चर्यमिश्रित आनंदानं वहिनीनं त्यांचं स्वागत केलं.

‘वन्सं, आज अशा अचानक? अन उन्हं किती तापलीयत? आधी कळवायचं तरी. महादूला पाठवलं असतं हो मी गाडी घेऊन...’

वहिनीने दिलेला थंडगार, वाळा घालून सुवासित केलेल्या पन्ह्याचा पेला हातात घेत सुमतीबाई पाटावर टेकल्या.

‘दादा दिसत नाही कुठे?

पन्ह्याचे दोन घोट घेत, जरा सावरून बसत सुमतीबाईंनी प्रश्न केला.

‘अहो, तालुक्याच्या गावाला गेलेत. येतील जेवायच्या वेळेपर्यंत. बसा आता निवांत. हे खाऊन घ्या थोडं अन आराम करा... तोवर जेवायची वेळ होतेच आहे. कित्ती दिवसात भावाबहिणींची पंगत झाली नाहीय.’

बोलता बोलताच वहिनीनं चिवड्याची बशी सुमतीबाईंसमोर ठेवली.

घरातल्या थंडगार अन स्नेहमयी वातावरणात सुमतीबाईंना जरा हुरूप आला. सावकाशपणे त्यांनी खाणं संपवलं अन त्या वहिनीशी गप्पा मारू लागल्या. त्यांच्या लहानपणापासून कामाला असलेल्या, आता थोड्या म्हातारपणाकडे झुकलेल्या देवकीबाई स्वैपाक करत होत्या. मधूनच त्यांच्याशी देखिल त्या सुखदुखाच्या गोष्टी बोलत होत्या.

शेंदरी रंगाची साडी नेसलेल्या, वर्णानं गोऱ्यापान अन बांध्यानं नाजुकशा भावजयीकडे सुमतीबाई मधूनच कौतुकानं बघत होत्या. सारं घर कसं व्यवस्थित सांभाळलं होतं तिनं.

'आईबाबांच्या माघारी आपलं माहेर हिनं कसं मनापासून जपलंय...'

सुमतीबाईंच्या मनात आलं.

'दादाचा स्वभाव थोडा तुटकच आधीपासून. त्यात आपलं लग्न त्याच्या मनाविरुद्ध झाल्यापासून थोडा आणखीच दूर गेलेला वाटतो तो आपल्याला. पण वहिनी मात्र सगळे बंध जपते मायेनं...'

'वन्स, जरा ही आवळयाची सुपारी बघा हो चाखून. घरी केलीय यंदा...'

वहिनीच्या हातातली सुपारी घेताघेता सुमतीबाईंचं लक्ष तिच्या बोटातल्या अंगठीकडे गेलं.

'नवी केलीस का ग, वहिनी अंगठी?'

‘हो, बघा ना वन्सं, यंदा शहरात गेले होते तेव्हा आणली यांनी...’

किंचित लाजत, वहिनीनं अनामिकेतली अंगठी काढून दाखवली.

सुबक घाटाची ती अंगठी कुणालाही आवडेल अशीच होती.

‘अंगठी तर सुरेख आहेच, पण माझ्या देखण्या वहिनीच्या बोटांमधे अधिकच खुलतेय.’

सुमतीबाईंनी चेष्टा केली तशी वहिनी खळखळून हसली.

‘थोडी सैल आहे बघा वन्सं...’

‘मग जरा लठ्ठ हो की ग. लग्नापासून बघतेय, तू दोन मुलं झाली तरी अशीच सडपातळ आहेस...’

वहिनी यावर काही बोलणार तोच बाहेर मोटारचा आवाज आला.

‘आले बघा...’म्हणत वहिनी बाहेर जाणार तोच श्रीहरीच आत आला.

‘अरे वा, आज सुमती इकडे कुठे? घरी सगळे बरे आहेत ना ग?’

हसून सुमतीबाईंनी मान डोलावली.

थोड्या वेळानं जेवणं उरकली. जेवून श्रीहरीला पुन्हा बाहेर जायचं होतं. पण सुमतीच्या जायच्या वेळेआधी नक्की येतो असं सांगून तो बाहेर गेला. जाताना पत्नीशी घरात जाऊन हलक्या आवाजात काहीतरी बोलूनही गेला.

जेवणं झाली अन दोघी गप्पा मारत बसल्या. मुलं शाळेतून परत आली अन खाऊन, आत्याकडून लाड करून घेऊन तीही खेळायला गेली.

थोडं बोलून झालं अन सुमतीचं लक्ष वहिनीच्या बोटांकडे गेलं...

‘अगबाई, अंगठी कुठाय तुझ्या बोटातली... ?’

धस्स होऊन वहिनीनं हाताकडे पाहिलं.’अहो, आत्ता तर होती... पडलीबिडली की काय कुठे?’

काव-याबाव-या होऊन दोघी सगळीकडे शोधू लागल्या. घर, अंगण, कपाटांच्या खाली, प्रत्येक जागी शोधून झालं. पण अंगठीचा कुठे मागमूसही नव्हता.

‘कुठे हरवली असेल हो? आता रागावतील बघा...’

वहिनीचे डोळे भरून आले होते. सुमतीलाही काय बोलावं ते सुचेना. बराच वेळ दोघींनी पुन्हा शोधलं. पण काही उपयोग झाला नाही. आता उन्हं उतरायला लागली होती. श्रीहरीचा अजूनही पत्ता नव्हता.

‘मी निघते आता वहिनी. सापडेल बघ घरातच कुठेतरी... काळजी करू नकोस.’त्या कसंनुसं म्हणाल्या, पण त्यांचा चेहरा पार उतरला होता.

‘दादाची भेट झाली नाहीच. वर वहिनीची अंगठीही हरवली...’

या सगळ्यात त्या आपण कशासाठी आलोत हे थोडा वेळ विसरल्याच होत्या.

वहिनीने चहा ठेवला होता, तोवर तोंड धुवायला म्हणून त्या न्हाणीघरात गेल्या.

पदरानं चेहरा पुसतच परत आलेल्या सुमतीबाई स्वैपाकघरात शिरल्या अन तिथलं दृश्य बघून धरणी पोटात घेईल तर बरं असं त्यांना वाटलं.

वहिनी त्यांच्या पिशवीचे सोडलेले बंद घाईघाईने पुन्हा बांधून ठेवत होती.

उभ्या जागी सर्वांगाला आग लागावी तसं झालं सुमतीबाईंना.

ओशाळं हसत वहिनी पुढे झाली,

‘या वन्सं. चहा घ्या. आल्याचा तुम्हाला आवडतो तसा केलाय...’

आता याक्षणी वहिनीनं साक्षात अमृत दिलं असतं तरी त्यांना नको होतं.

‘मी चोरी करेन असं वाटलं वहिनीला? म्हणजे हे प्रेम, हा जिव्हाळा सारा दिखाऊच? माझ्या माघारी माझी पिशवी उघडून बघण्यापेक्षा सरळ सरळ माझ्यावर आरोप केला असता तरी तोंड दिलं असतं मी त्याला. माझी परिस्थिती साधारण असेल, पण मी कोणाचं काही घेईनच कसं?...’

विचारांनी त्यांच्या डोक्यात घणाचे घाव पडायला सुरुवात झाली होती. वहिनी पुढे बोलतच होती,

‘बाहेरच्या ओसरीवर शहाळी अन केळयांचा घड ठेवलाय वन्सं. अन पेढेघाटी डब्यात लाडू आहेत रव्याचे. मुलांसाठी खाऊ म्हणून. हे सारं उचलायला महादूला पाठवतेय बरोबर. गाडीनं सोडेल तो तुम्हाला...’

मृतप्राय मनानं सुमतीबाईंनी चहा घेतला. वहिनीनं कुंकू लावलं. महादूनं पिशवी उचलली.

‘चला ताईसाहेब...’

गाडीत सुमतीबाई गप्पच होत्या. महादूच्या प्रश्नांना हो नाही करत होत्या. पण त्यांचं चित्त थाऱ्यावर नव्हतंच.

त्या गाडीतून उतरल्या तोच शेजारच्या आजींनी किल्ली आणून दिली.

‘घरी आले गुरुजी, अन मुलांना घेऊन बाहेर गेलेत कुठेतरी…’त्यांनी सांगितलं.

मास्तर घरी नसल्याबद्दल कधी नव्हे ते बरं वाटलं सुमतीबाईंना. नाहीतर त्यांच्या कुशीत शिरून त्या नक्कीच कोसळून रडल्या असत्या.

‘दोन हजार रुपये मागण्यासाठी गेलो आपण, अन जन्माचा घाव घेऊन आलो…’

त्यांना वाटत होतं.

महादूनं सारं सामान उचलून घरात आणून ठेवलं. एरवी त्याला चहा दिल्याशिवाय जाऊ न देणाऱ्या सुमतीबाईंना आज तो केव्हा गेला हे देखिल कळलं नाही.

विमनस्क मनानं त्या पडून राहिल्या. त्यांच्या मानी मनाची जखम भळाभळा वहात होती.

बऱ्याच वेळाने मास्तरांचा अन मुलांच्या हसण्याचा आवाज आला, तशी त्या उठून बसल्या.

‘सुमती, अग दिवे न लावता का बसलीयस? हे बघ आम्ही काय काय आणलंय...’

आश्चर्यानं सुमतीबाईनी त्यांच्या हातातल्या सामानाकडे बघितलं.

‘अग, पगार झाला सुमती आज. अन मागची बाकीही मिळेल पुढच्या महिन्यात...’

मास्तरांचा चेहरा फ़ुलून आला होता. पण सुमतीबाई काहीच बोलल्या नाहीत एक क्षण.

‘तुला बरं नाही की काय ग? उन्हाची गेलीस...

‘नाही हो. जरा डोकं दुखत होतं बघा...’स्वतः ला सावरत त्या उठल्या.

‘चला छान झालं हो. आता काळजी नाही...’त्या उसन्या अवसानानं म्हणाल्या.

पिशवी उघडून त्यातली घरातली साधी साडी नेसावी म्हणून त्यांनी बंद सोडले, अन चकित होऊन त्या बघतच राहिल्या.

पिशवीत सुरेख इरकली साडी अन पोलक्याचं कापड होतं. गोंधळून जाऊन त्यांनी घडी उलगडली, अन एक पाकीट अन चिठ्ठी त्यातून बाहेर पडली.

मोत्यासारख्या वळणदार अक्षरात वहिनीनं लिहिलं होतं...

‘वन्सं, तुमच्या नकळत हा कारभार केल्याबद्दल रागावू नका. शाळेतली सारी परिस्थिती ह्यांना कळली आहे. तुम्ही दोघं कधीही आपणहून मदत मागणार नाही हे आम्हाला माहीत आहे. इतक्या वर्षांत तुमची भाऊबीज राहिलीच आहे. ती देतोय असं समजा. तुम्ही घेणार नाही कदाचित म्हणून तुम्हाला न सांगता हे मी

पिशवीत ठेवलेय. मुळीच नाही म्हणू नका. आम्हाला फार वाईट वाटेल...’

पाकिटातून बाहेर पडलेल्या पांच हजारांच्या नोटांकडे बघत सुमतीबाई हमसाहमशी रडू लागल्या.

# बेरीज वजाबाकी

एक सफाईदार वळण घेऊन रवीची गाडी गावाकडच्या रस्त्याला लागली. धुळीचा मोठा लोट उठला अन शेजारी बसलेल्या नीलीमाचा चेहेरा चांगलाच त्रासिक झालेला त्याच्या नजरेतून सुटला नाही. त्याच्या ओठांवर हलकंसं हसू उमटलं. समोरच्या आरशातून तो तिचं बारीक निरीक्षण करू लागला. रस्ता अगदी शांत होता. मधूनच एखादी गाय नाहीतर बकरी चरत असलेली दिसे. तेवढीच काय ती वर्दळ. त्यामुळे रमत गमत गाडी चालवण्याची चैन तो सहज करू शकत होता. अन त्यामुळेच की काय, नीलीमाकडे निरखून बघणंसुद्धा त्याला जमत होतं.

एकसारखे कापलेले केस, नाकात छोटीशी हिरकणी, कानातले तिच्या नाजूक हालचालींबरोबर चमकून जाणारे हिऱ्याचेच टॉप्स. गळयात अगदी बारीक चेनमधे गुंफ़लेलं मंगळसूत्र अन डाव्या हातात फ़क्त घड्याळ. किती गरम होतंय या सबबीखाली कालच खरेदी केलेला स्लीवलेस सलवार कमीज.

‘काय बघतोयस एवढं?’

तिच्या वैतागलेल्या आवाजाने तो भानावर आला.

‘तू आता बाकी अगदी एन आर आय शोभतेस हं नीलू.’हसून त्याने डोळे मिचकावले.

‘त्यात काय? आहेच मी.’

तिचा मूड आता जरा परत येऊ लागल्याने रवीला हायसं वाटलं. समोरच्या आरशातून त्याने मागे एक नजर टाकली. राहुल गाढ झोपला होता. त्याच्या निरागस चर्येकडे बघून रवीला एकदम उत्साह आला. आई, अप्पा, नि सविताला किती आनंद होईल राहुलला बघून याची कल्पनासुद्धा त्याला सुखावून जात होती.

‘तब्बल चार वर्षांनी येतोय नाही आपण, नीलू? राहुल दोन वर्षांचा असताना आलो होतो गावी.’

‘हो, अन तो किती आजारी पडला होता या धुळीनं अन साऱ्यानं? विसरलास वाटतं?

तिच्या शब्दातला फ़णकारा त्याला चांगलाच बोचला. पण तिचं बोलणंही खोटं नव्हतंच. दोन वर्षांच्या राहुलचा बाळदमा तेव्हा खूपच उफाळला होता.

'असू दे ना नीलीमा आता. मागचं सारं विसर. आता तोही मोठा झालाय नि त्याचा दमाही पार पळालाय. मग कशाला त्या आठवणी?'

नीलीमा यावर काही बोलणार तोच गावाची हद्द सुरू झाली.

गाई, बैलांच्या गळ्यातल्या घंटांच्या अन त्यांच्या हंबरण्याच्या आवाजानं राहुलही उठून बसला. आजूबाजूच्या मनोरम दृश्याकडे बघता बघता तो बालजीव एकदम हरखून गेला.

छोट्या छोट्या गल्ल्याबोळांतून वाट काढत गाडी रवीच्या घराजवळ येऊन उभी राहिली. एवढ्या वेळात आजूबाजूचे शेजारीही बाहेर येऊन बघत होते. लहान मुलंही आश्चर्यानं गाडीकडे पहात होती.

नीलीमा अन राहुल खाली उतरले तसं रवीनं गाडी बाजूला घेऊन पार्क केली. सगळ्या खिडक्या बंद आहेत ना ही खात्री करूनच तो घराकडे वळला. सुबोधनं, त्याच्या मित्रानं आठवडाभरापुरती त्याची गाडी अगदी आनंदानं देऊ केली होती.

दारात सविता हसऱ्या चेहेऱ्यानं उभी होती. चार वर्षांनी आलेल्या भावाच्या कुटुंबाचं स्वागत करतानाचा तिचा आनंद तिच्या मुद्रेवरून ओसंडून वहात होता. तिघांवर भाकरतुकडा ओवाळून टाकत ती किंचित वाकली. पुढच्याच क्षणी राहुलला मिठीत घट्ट गोळा करून तिनं गरगर फ़िरवलं.

‘अग, आता काय लहान आहेस का सवी तू?’

‘दादा, अरे कितीही मोठी झाले तरी तुझ्यापेक्षा लहानच की मी?’

तिच्या निर्व्याज प्रश्नानं आपल्या डोळयात पाणी का तरारलं हे त्यालाच कळेना.

‘आई अप्पा दिसत नाहीत ते?’किंचित नवलानं त्यानं प्रश्न केला. आपण आल्यावर लहान मुलीसारखी आनंदून जाणारी आई आज समोर का बरं नाही आली?

‘अरे, ये ना आईच्या खोलीत. हल्ली अजिबातच चालता येत नाही तिला. अन अप्पा गेलेत अजितबरोबर शेतावर. तुमची यायची वेळ काही नक्की नव्हती ना. बराच वेळ होते घरी. आत्ताच गेलेत. थांब गड्याला पाठवतेच आहे मी.’

आईच्या खोलीत आल्यावर त्याला अगदी गदगदून आलं. या चार वर्षांमधे किती उतरली आईची तब्येत.

तिघांनी वाकून नमस्कार केला. आईनं तिघांनाही थकलेल्या हातांनी जवळ घेतलं. राहुलला बघून तिच्या चेहेऱ्यावरच्या सुरकुत्यासुद्धा इतक्या प्रसन्न हसल्या की आपण मागच्याच वर्षी यायला हवं होतं ही खंत रवीला पुन्हा बोचून गेली.

‘दादा, वहिनी, या ना. हातपाय धुवून आधी खाऊन घ्या.’

सविताच्या प्रेमळ हाकेनं तो भानावर आला. नीलीमा अजूनही तयार होऊन खोलीतून आली नव्हती. एवढ्या वेळात सवितानं राहुलला खायला दिलं होतं. टेबलावर सारा गावाकडचा मेवा मांडून ती दोघांची वाट बघत होती. सोबत ओल्या नारळाच्या वड्या अन गरमागरम पोहे होते.

‘आई नाही खाणार?’

‘अरे, दिलं नेऊन दादा मी तिला. तू बाथरूममधे होतास तेव्हाच. "

कोपरं टेबलावर टेकून बसलेल्या लहान बहिणीकडे बघता बघताच रवीच्या चेहेऱ्यावर माया दाटून गेली.

लांबसडक केसांची वेणी समोर घेतलेली, कपाळावर ठसठशीत टिकली लावलेली अन गळ्यात भलंमोठ्ठं मंगळसूत्र घातलेली सविता म्हणजे नीलीमाचं अगदी विरुद्ध रूप आहे- त्याला वाटलं.

‘सवी, तू मात्र लग्नानंतर अगदी बदलली नाहीस हं. तश्शीच काकूबाई राहिलीस. अन काय ग, अजितला आवडतं का तुझं हे रूपडं?’तिची चेष्टा करायचा मोह त्याला आवरेना.

‘न आवडायला काय झालं? सगळेच काही साहेब नसतात म्हटलं तुझ्यासारखे...’

सवितानं वार लीलया परतवल्याचं बघून तो मोठ्यानं हसला.

रवी, नीलिमा अन सविताचं खाणं उरकत नाही तोच अप्पा अन अजित शेतावरून परत आले.

रवी आईच्या उशाशी बसला होता. अजित चटकन त्याच्या पायाशी वाकला.

‘अरे अरे हे काय?’रवीला विलक्षण संकोच वाटला.

‘वा, असं कसं? तुम्ही सविताचे मोठे भाऊ म्हणजे मलाही मानानं मोठे नाही का?’

अजितच्या दिलखुलास हसण्यानं रवी एकदम मोकळा झाला. चार वर्षांपूर्वी सविताच्या लग्नात काय ती भेट झाली होती. त्यानंतर आज प्रथमच असे फुरसतीने भेटत होते दोघं. त्यांच्या गप्पा सुरू झाल्या अन बघता बघता वेळ कसा गेला ते कळलेच नाही कोणाला.

अजित शहरातल्या एका चांगल्या केमिकल कंपनीमधे नोकरी करत होता. रोज बसने अर्धा तास जाणे अन अर्धा तास येणे तो करत असे. शनीवार रविवारी अप्पांबरोबर शेतात जाऊन गड्यांवर नजर ठेवीत असे. ते दोन दिवस आईचे औषध आणणे, शेतासाठी बियाणे आणून देणे, घराच्या दुरुस्तीची काही कामे असल्यास देखरेखीखाली करून घेणे हे सारे तो करत असे.

रवीशी बोलता बोलताच अजित एकदम उठला.’आईंच्या औषधाची वेळ झालीय’असे पुटपुटत तो कपाटाशी गेला. नीट कपात औषध ओतून स्वतःच्या हाताने त्याने आईला पाजलं अन परत येऊन गप्पा मारू लागला.

त्याच्या अकृत्रिम वागण्याने रवीला एकदम गहिवरल्यासारखं झालं. ज्या गोष्टी मुलाने करायच्या त्या जावई करतोय, अन तेही अगदी आनंदानं. त्याला वाटलं.

बरं पैशाच्या मोहानंही तो काही करत असेल म्हणावं तर तेही नव्हतं. गावाकडच्या त्या घराची किंमत देखील फारशी येणार नव्हती. शेताचा तुकडाही फार मोठा नव्हताच. त्या मानाने अजितचे आईवडील लहानपणीच गेल्यानं त्यांचं शहरातलं घर नि एक दुकान यावर त्याचाच हक्क होता. तो सहज सविताबरोबर शहरात जाऊन राहू शकत होता. अशा परिस्थितीत गावात राहून सासूसासऱ्यांची सेवा करणाऱ्या अजितबद्दल त्याच्या मनात प्रेमाबरोबर आदरही दाटून आला.

सविताची हाक ऐकून दोघेही जेवायला उठले.

गरम ज्वारीच्या भाकरी, चटणी, भरली वांगी, झुणका, अन रवीला अतिशय आवडणारी शेवयांची खीर असा बेत होता. ताट बघूनच पोट तुडुंब भरल्यासारखं वाटलं त्याला. अगदी मनापासून जेवला तो. जेवणाच्या आधी आईचं ताट सवितानं खोलीत नेऊन

दिलं अन जेवणातून उठून अजितनं खोलीत जाऊन लक्ष दिलेलं त्यानं बघितलंच.

जेवणं झाल्यावर वेळ आणखीच भराभर गेला. अमेरिकेतून आणलेल्या वस्तू ज्याच्या त्याला दिल्यावर सारे गप्पा मारत बसले. तोच अजित एक कागद घेऊन आला.

'रवीदादा, हा हिशोब नजरेखालून घालाल का जरा?'

'काय आहे हे?'त्यानं नवलानं पृच्छा केली.

'गेले चार वर्षं तुम्ही आलाच नाहीत. त्या चार वर्षातल्या शेताच्या उत्पन्नातला तुमचा वाटा आहे हा. तुमच्या खात्यावर जमा केलाय मी वेळच्या वेळी. आता हिशोब बघून घ्या म्हणजे झालं.'

नीलिमा अवाक झालीच, पण रवीला काय बोलावं हे सुचेचना.

इतक्या निस्वार्थीपणानं अन जिव्हाळयानं कोणी वागू शकतं हे बघून दोघांनाही चांगलाच धक्का बसला होता.

बरीच रात्र झाली होती. रवीची झोप मात्र पार पळाली होती. खिडकीतून येणारा रातराणीचा गंधही त्याला पूर्वीसारखा सुखावत नव्हता. शेजारी नीलिमा गाढ झोपी गेली होती. तिची झोप चाळवू नये म्हणून त्याने हलकेच कूस बदलली.

'खरंच, नुसता नावाचाच मुलगा आहोत आपण. गेल्या काही वर्षात काय केलंय आपण आई अप्पांसाठी?नुसते मधून मधून पैसे पाठवून कर्तव्य केल्याचं समाधान मिळवत आलो. खरी सेवा त्यांची अजित अन सविता करताहेत. अन तेही अगदी हसतमुखानं.'

'अमेरिकेत लठ्ठ पगाराची नोकरी अन दर महिन्याला वाढत जाणारी शिल्लक यापलिकडे काय मिळवलंय आपण आयुष्यात? तिथे शिकत असतानाच नीलिमाच्या प्रेमात पडलो. ती तिथेच वाढलेली. तिचे सारे संस्कार देशी, परदेशी असे सरमिसळ. पण आई अप्पांनी आपल्या लग्नाला आनंदाने होकार दिला. तिला इथे फारसं आवडत नाही यात तिचाही बिचारीचा काय दोष? तिचे या मातीशी बंध जुळणार तरी कसे? जन्मापासून ती कधी इथे राहिलीच नाही. ती मराठी उत्तम बोलते याचं श्रेय तिच्या आईचं. पण त्यापलिकडे तिला भारताबद्दल आस्था नाही. नाही म्हणायला आई अप्पा आपल्या लग्नानंतर दोन महिने राहून गेले तेव्हा तिनं अगदी

मन लावून सारं केलं त्यांचं. तशी स्वभावानं चांगली आहे ती. पण इथे कायमचं येण्याचा विचार ती स्वप्नातही करू शकणार नाही.'

विचार असह्य झाले तसा तो उठून बाहेर बागेत आला. टिपूर चांदणं पडलं होतं. रातराणीचा सुगंध वातावरणात दरवळला होता. पण हे सारं वातावरणही त्याचं तप्त मन शांत करू शकलं नाही. तो खोलीत जायला वळणार तोच अजितचा आवाज त्याच्या कानी आला,

'या ना दादा. बसा. झोप येत नाही का?'

त्याच्या आवाजातल्या मार्दवानं स्वतला नकळतच तो झोपाळ्याकडे गेला.

'तुमचा चेहरा इतका ओढलेला का दिसतोय? बरं नाही का वाटत?'

कुणासमोर मन मोकळं करण्याचा रवीचा स्वभाव नव्हता. पण अजितच्या गोड अन आर्जवी स्वभावाकडे तो आपोआपच ओढल्या गेला. आपली सारी व्यथा त्याने हळूहळू अजितसमोर उघडी केली. मनाची होणारी ओढाताण, आईअप्पांची काळजी

अन इतक्या वर्षांचं सुस्थापित आयुष्य सोडून येण्याची असमर्थता. सारं सारं बोलून टाकलं त्याने.

त्याचं बोलणं अजित अगदी मन लावून ऐकत होता.

मनातलं सारं बोलून टाकल्यावर रवी एकदम शांत बसला. एक दीर्घ श्वास घेऊन त्यानं अजितच्या चेहऱ्यावर नजर खिळवली. अन अचानक त्याला वाटलं,'हा काय वेडेपणा करून बसलो आपण? अजितची अन आपली ओळखही फार जुनी नाही. आपल्या कुटुंबात तो सामील झाल्यालाही फार काळ लोटला नाहीय. अशात मनाच्या एका दुबळ्या क्षणी सारंकाही त्याला सांगून बसलो आपण. त्याचं काय मत होईल आपल्याबद्दल आता? अन तो वयानंही फार मोठा नाहीय. काय सल्ला देऊ शकणार तो आपल्याला? छे, चुकलंच आपलं.'

जणू त्याच्या मनातले विचार ओळखल्यासारखा अजित हलकेच हसला.

'रविदादा, खरंतर मी वयानं एखाद वर्षानं लहानच आहे तुमच्यापेक्षा. पण मला वाटतं ते सांगतो तुम्हाला. मी आल्यापासून बघतोय, तुम्ही इथे आलाहात खरे, पण सतत आई अप्पांच्या

काळजीत, अन एक अपराधीपणाचं ओझं बाळगून असल्या-सारखेच वावरता आहात. तुमचं सारं आयुष्य तिकडे अगदी नीट सेटल झालंय. नोकरी, घर, अन इतर भौतिक सुखाच्या वस्तू जाऊ द्या एखादे वेळी, पण तुमचं सर्वात महत्वाचं माणूस, म्हणजे नीलिमाताई. अन त्या तर तिथल्या मातीत इतक्या घट्ट रुजल्या आहेत, की तुमच्या कोणत्याही निर्णयाचा परिणाम त्यांच्यावर अन राहुलवर आधी होणार आहे.

‘मला जे काही तुम्ही आत्ता सांगितलंत, अन घरातही सविताच्या अन आईअप्पांच्या बोलण्यातून जे काही कळलंय चार वर्षात, त्यावरून वाटतं की इथे येऊन इथल्या मातीत पाय रोवणं हे त्यांना फार फार कठीण होणार आहे. अशा परिस्थितीत त्यांना असं करायला भाग पाडणं, हा अन्यायच नाही का एकापरीनं? अन हा अपराधीपणा तुम्ही सर्वप्रथम मनातून काढून टाका की मला अन सविताला आई अप्पांचं करावं लागतय. आम्ही त्यांचे कोणीच नाही का? अन मनापासून सांगतो तुम्हाला, माझे आईबाबा मी फार लहान असतानाच गेलेत. त्यांचं काहीच मी करू शकलो नाही. तेव्हा सविताच्या आईबाबांचं करण्याचं भाग्य मला लाभतंय हे माझं मोठं सुदैवच समजतोय मी.’

भावनावेग अनावर होऊन अजितनं डोळे पुसले अन क्षणभर तो थांबला.

‘तेव्हा मनावर कुठलंही दडपण न येऊ देता इथलं चार दिवसांचं वास्तव्य सुखाचं होऊ द्या दादा तुम्ही. तिकडे गेल्यावर त्यांची काळजी वाटणं साहजिकच आहे. पण आपला धाकटा भाऊ भारतात आहे असं समजून निश्चिंत राहा तुम्ही.’

रवीनं अजितकडे एकदा बघितलं, अन त्याला घट्ट मिठी मारली.

थोडा वेळ गप्पा मारून तो झोपायला गेला तेव्हा अंथरुणावर पडल्यापडल्या त्याला गाढ झोप लागली.

सकाळी बऱ्याच उशिरा रवी जागा झाला. स्वैपाकघरातून सविता अन नीलिमाचे हळूहळू बोलण्याचे आवाज येत होते. आल्याच्या चहाचा अन निरशा दुधाचा वास हवेत दरवळत होता.

आळोखेपिळोखे देत रवी स्वैपाकघरात आला. सविता अन नीलिमा नाश्त्याच्या टेबलावर बसून एकमेकींशी काहीतरी बोलत होत्या. समोरच आईचा दागिन्यांचा डबा उघडा पडला होता.

‘काय चाललंय नणंदाभावजयांचं खलबत?’

‘दादा, अरे आईनं तिचे सगळे दागिने काढून दिलेत. मी वहिनीला सांगतेय की त्यातले हवे ते तिने घ्यावेत.’

रवीनं नीलीमाच्या चेहेऱ्याकडे बघितलं. तिच्या मनातले भाव त्याला कळले नाहीत. तिची काय प्रतिक्रिया होईल याचा अन्दाज त्याला करता येईना. जुन्या पद्धतीचे दागिने तिला कितपत आवडतील, त्याला शंकाच होती.

नीलीमा किंचितशी हसली. दागिन्यांचा डबा तिनं एका हातानं जवळ ओढला. जुन्या पद्धतीचे असले तरी चांगले वजनी, उत्तम सोन्याचे दागिने होते ते. त्यातली पेशवाई धाटणीची नथ अन ठुशी तिनं उचलली.

‘सविता, हे दोन दागिने फ़क्त ठेवतेय मी. बाकी सारं तुझंच आहे ग. माहेरकडून तुला भेट समज.’

‘अन एक गोष्ट मला आज सांगावीशी वाटतेय. रवीला ना विचारताच मी हा निर्णय घेतलाय. पण मला खात्री आहे की त्यालाही तो आवडेल. आता यापुढे दर वर्षी दिवाळीत आम्ही भारतात नक्की येऊ. यापुढची प्रत्येक दिवाळी आपली एकत्रच

असणार आहे. माझ्या राहुलला त्याच्या माणसांमधे दरवर्षी यायला मिळायलाच हवं.’

भरून आलेल्या डोळयांनी सवितानं नीलिमाकडे बघितलं.

‘दादा, वहिनी, तसंही या वर्षाअखेर यावं लागणारच आहे तुम्हाला.’

‘म्हणजे?’

रवीला काहीच कळेना.

तोच बागेत काम करत असलेला अजित हातात भलीमोठी फ़ुलांची करंडी घेऊन आत आला. त्याच्या दुसऱ्या हातात नुकताच तोडलेले टपोरे आवळे होते. ते त्यानं सवितासमोर ठेवले. ते बघून नीलिमा हलकेच हसली. अन रवीला सारा उलगडा झाला.’

‘अग लबाडे, असं आहे होय? अन पत्ता नाही लागू दिलास आल्यापासून?’

लाजलेली सविता पटकन नीलीमाच्या कुशीत शिरली.

परतीच्या रस्त्यावर रवीचं मन अगदी उल्हसित होतं. आयुष्यातली सारी गणितं सुटल्यासारखं वाटत होतं त्याला. कुठल्याच बेरजा वजाबाक्यांचे विचार करायची गरज नव्हती आता.

शेजारी बसलेल्या नीलीमाचा हात हातात घेऊन प्रेमभरानं त्यानं हलकेच दाबला. अन शिळेवर त्याची आवडती धून वाजवत तो गाडी चालवू लागला.

वरचं निरभ्र आभाळ अगदी त्याच्या कवेत आलं होतं.

# चांदणवेल

बंगल्याचं फाटक लावून घेत सुधीर आत वळला. सभोवताली फुललेल्या बागेचं नेहमीसारखंच मनातल्या मनात कौतुक करत, बहरलेल्या फुलांचा गंध छातीत भरून घेत तो मागच्या अंगणात आला.

नेहमीचंच दृश्य होतं तिथे. हिरवळीवर मांडलेल्या दोन खुर्च्या नि टेबलावर ठेवलेला मोगऱ्याचा भरगच्च गजरा... हवेवर तरंगत येणारा उदबत्तीचा प्रसन्न सुगंध नि या सगळ्यांवर कळस चढवणारा सरांचा खडा आवाज... पूजेची स्तोत्रं म्हणणारा...

‘आवाजही किती सुरेख आहे सरांचा...’

सुधीरच्या मनात आलं. देवघरात न जाताच त्याच्या डोळ्यांसमोर जांभळा कद नेसलेली, उंच, गोरीपान नि वयानुसार किंचित झुकलेली अशी सरांची मूर्ती आली. त्याच्याही नकळत तो सरांच्या पूजेशी तल्लीन झाला. कितीतरी वेळ सरांच्या गोड

आवाजाशी नि सगळ्या वातावरणाच्या पावित्र्याशी अगदी एकरूप होऊन गेला.

‘आलास सुधीर? अरे आज उशीर झाला तुला थोडा...’

आईंच्या स्निग्ध आवाजानं त्याची भावसमाधी उतरली. हातात वाफाळणाऱ्या चहाचा कप नि खाण्याची बशी घेऊन त्या सावकाश येत होत्या.

तत्परतेनं पुढे होऊन त्यानं त्यांच्या हातातलं खायचं घेऊन टेबलावर ठेवलं.

आतून आता मंत्रपुष्पांजलीचे स्वर लहरत येत होते.

‘चल घे लवकर... थंड होईल बरं.’त्याला बजावून त्या परत आत गेल्या.

साजुक तुपाचा शिरा नि घरचं गोड लिंबाचं लोणचं बघितलं नि काल रात्री आपण नीट जेवलोच नाहीय याची जाणीव झाली सुधीरला...

भराभर खाणं संपवून त्यानं चहाचा कप तोंडाला लावला. तोच पांढराशुभ्र झब्बा पायजमा घातलेले सर हातात बासरी घेऊन

आलेच. गडबडीनं कप नि खाण्याची बशी सुधीर आत ठेवून आला. सरांच्या पावलांना स्पर्श करून, अदबीनं मान झुकवून, पिशवीतून आपली बासरी काढून त्यांच्या समोर बसला.

अन मग रोजच्यासारखीच स्वरांची मैफल रंगली. पुढचा एक दीड तास आपण कुठे आहोत, भोवताली काय चाललं आहे याचं भान विसरल्या गेलं. सरांच्या बासरीतून झिरपणारे ते स्वर्गीय सूर नि ते आत्मसात करायची जिवापाड धडपड करणारा सुधीर... जणू या जगात त्या गुरुशिष्यांच्या नात्याखेरीज काही नव्हतंच. इतकं देखणं, इतकं हळुवार संगीत नि त्यात न्हाऊन निघणाऱ्या दोन जिवांचं ते अद्वैत...

सरांनी बासरी नीट पुसून खाली ठेवली तसा सुधीर या जगात आला. थोडा वेळ त्याला बोलणंही सुचेना.

खरंच, त्या शारंगधरानं उगाच नाही हे वाद्य निवडलं सगळ्या गोपींवर भूल टाकायला... हे मखमली सूर मनात विरघळल्यावर नि त्यातली आर्तता मनाच्या गाभाऱ्यापर्यंत भिडल्यावर गोपीच काय... सारं गोकुळच वेडावून जात असलं तर नवल नाही...

‘छान... छान वाजवलंस आज सुधीर...’

सर म्हणाले तसा तो भानावर आला. सरांना पुन्हा नमस्कार करून खुर्चीत सावरून बसला.

‘तुझ्या त्या नोकरीच्या मुलाखतीचं काय झालं रे... ?"

‘उद्या आहे सर... अकरा वाजता...’

‘मग उद्या हवंतर शिकवणी बंद ठेवूया...’

‘नाही नाही सर... बासरीत खंड नको पडायला... इकडे येऊन मग जाईन मी...’

त्याचं घाईघाईनं दिलेल्या उत्तरानं सर हसले.

‘बरं बरं... ये मग उद्या.’

हातातली बासरीची पिशवी छातीशी घट्ट धरत तो जायला उठला. आत जाणाऱ्या सरांच्या आकृतीकडे डोळे भरून बघत...

बसस्टॉप वर बसची वाट बघत उभ्या असलेल्या सुधीरच्या मनात चार वर्षातला स्मृतीगंध दरवळत होता.

गेली चार वर्षं सरांकडे तो शिकत होता. पण त्याचे नि सरांच्या कुटुंबाचे भावबंध अगदी वेगळ्याच पातळीवर जुळले होते.

आईवडिलांविना वाढलेला सुधीर... नातेवाईकांकडे राहून कसंबसं शिक्षण पूर्ण करत शेवटी ग्रॅज्युएट झाला होता. त्याचे वडील उत्तम बासरी वाजवत. लहानपणी वडिलांच्या हाताखाली शिकत होता तो... पण आईवडील गेले अन त्याची बासरी मुकीच झाली. अकरावी ला असतानाच मित्राबरोबर कुठल्याशा घरगुती मैफिलीत सरांची बासरी ऐकली होती त्यानं. नि झपाटूनच गेला होता तो पार. त्या सुरांचा नि सरांचा पाठपुरावाच केला होता त्यानं मग सतत. सर कुठे नि आपण कुठे याचा विचारही शिवला नव्हता तेव्हा त्याच्या मनाला. आधी सरांनी टाळाटाळ केली होती... पण

सुधीरची शिकण्याची दुर्दम्य इच्छा नि संगीताची जाण या दोन्ही गोष्टींनी सरांनाही त्याला विद्यादान द्यायला भाग पाडलं होतं.

अन या चार वर्षात नुसती बासरीच नव्हे तर इतरही अनेक गोष्टी शिकत होता तो सरांकडून...

बासरीवादनाच्या क्षेत्रात सरांचं नाव फार आदरानं घेतल्या जात असे. घरची गडगंज श्रीमंती असूनही तो लक्ष्मीपुत्र सरस्वतीच्या साधनेत अगदी लीन होता. त्यांच्या मैफिली मात्र अगदी निवडक ठिकाणी असत. पैसा कमावणं हा उद्देश कधीच नव्हता त्यांचा. त्यामुळे त्यांच्या कलेला एक आगळंच सौंदर्य होतं... ऐकणारा अगदी पार भावविभोर होऊन जाई त्यांच्या वादनानं...

अशा या अद्वितीय शिक्षकाचं मार्गदर्शन लाभल्याबद्दल सुधीर मनातल्या मनात देवाचे वारंवार आभार मानत असे.

सरांच्या पत्नी... त्यांनाही तो आईच म्हणायचा... आई संधिवातानं हैराण असायच्या. पण रोज सकाळी सुधीरसाठी नाश्ता ठेवायला त्या या चार वर्षात कधीही विसरल्या नव्हत्या. सुधीर

दूरच्या नातेवाईकांकडे राहतो... पडेल ते कष्ट करून शिक्षण नि बासरी या दोन्ही आघाड्यांवर जिवापाड झगडतो आहे याची पुरेपूर जाणीव त्यांना होती.

सरांची दोन्ही मुलं परदेशीच स्थायिक झाल्यानं मोठ्या बंगल्यात दोघे एकटेच असत. तेव्हा दर दोन दिवसांआड संध्याकाळी येऊन तो त्यांचं हवंनको पाहत असे, औषधं नि भाजी आणून देत असे. तेव्हाही सुधीर कितीही संकोचला तरी भाजीपोळी खाल्ल्याशिवाय आई त्याला जाऊ देत नसत. स्वैपाक करणाऱ्या वत्सलाबाई तर गमतीनं सुधीरला सरांचा तिसरा मुलगाच म्हणायच्या.

सरांच्या ओळखीनंच एका ठिकाणी कारकुनाच्या नोकरीची संधी आली होती. कमी पगाराची का होईना... नोकरी मिळाली की एक छोटीशी खोली भाड्यानं घ्यायची नि नोकरीचा वेळ वगळता सारा दिवस बासरीवादनात नि साधनेत घालवायचा हे स्वप्न केव्हाचं मनात बाळगलं होतं सुधीरनं...

‘संगीत म्हणजे चांदण्याची वेल असते बघ सुधीर... उंचच उंच... आभाळाला भिडणारी.

या वेलीच्या पायथ्याशी बसून अविरत साधना करावी लागते. पण एकदा का या तपश्चर्येला फळ आलं की ही वेल अगदी लडिवाळ होऊन झुकते खाली... नि मग त्या टपटपणाऱ्या चांदण्यांच्या वर्षावात अगदी न्हाऊन निघतो आपण...'

सरांनी त्याला एकदा बोलता बोलता सांगितलं होतं.

'ही चांदणवेल प्रसन्न होईल तेव्हा होईल... पण सध्या सरांच्या नि आईंच्या मायेच्या वर्षावात अगदी मनसोक्त न्हाऊन निघतोय आपण...'

हे असे कृतज्ञतेचे विचार नेहमीच सुधीरच्या मनात येत असत.

दुसऱ्या दिवशी मुलाखत झाल्याबरोबरच नेमणुकीचं पत्र हाती पडलं नि अपेक्षेपेक्षा थोडा जास्तच पगारही ठरला तसा आनंदानं वेडावूनच गेला सुधीर. घाईघाईनं सरांचे आवडते कंदी पेढे खरेदी करून तो बंगल्यावर गेला.

पण आजचं वातावरण थोडं वेगळंच वाटलं त्याला. नेहमीप्रमाणे'आलास सुधीर... जेवायचं झालंच आहे हं'असं

म्हणणाऱ्या आईंच्या आवाजात रोजचा उत्फुल्लपणा नव्हता. विचारात गढलेले सर झोपाळ्यावर बसून होते. नेहमी त्यांच्या झोपाळ्याची करकरही कशी आश्वासक, प्रेमळ वाटायची सुधीरला. पण आज तो आवाजही थोडा विचित्रच वाटला त्याला.

पेढे देऊन तो दोघांच्याही पाया पडला... तशी सरांनी त्याला आपल्यामागोमाग दिवाणखान्यात यायची खूण केली. मनाशी आश्चर्य करीतच तो त्यांच्याबरोबर गेला. सर कोचावर बसले तसा अदबीनं कोपऱ्यातल्या खुर्चीत बसला.

'मुलाचं पत्र आलंय अमेरिकेहून... आम्ही दोघांनी आता इथे एकटं राहू नये... तिकडेच कायमचं यावं असं वाटतंय दोघांनाही...'

मोठ्या प्रयासानं दोरीला धरून आभाळात उंच उंच चढावं नि ती दोरीच कुणीतरी निर्दयपणे घाव घालून तोडून टाकावी तसं झालं सुधीरला...

हे काय घडतंय्? आज किती आनंदी होतो आपण... इतक्या वर्षांचं असहाय, परावलंबी जिणं आज झटकून टाकल्या गेलं, आपण आपल्या पायांवर उभे झालो, मुक्त पक्ष्यासारखं आभाळात विहरायचं स्वप्न अखेर साकार झालं... नि या सगळ्या गोष्टींचा

शिल्पकार... आपला आधारवड आपल्या आयुष्यातून दूर होणार?'

'नि आपल्या बासरीचं काय होणार पुन्हा? तिच्या नशिबी परत मुकेपणच लिहिलेलं आहे की काय?...'

विजेच्या लोळासारखे हे सारे तप्त विचार सुधीरच्या मनाला जाळत, रखरखीत करत जात होते.

किती भरभरून शिकवलं या चार वर्षात सरांनी... अन या अन्नपूर्णेनंही किती जीव लावला आपल्याला... या काळात आईबाबांची असलेली पुसटशी आठवणही कधी डोकावून गेली नाही इतकं प्रेम केलं या उभयतांनी... नि आता आपण पुन्हा एकटेच राहणार...'

सरांच्या बोलण्यानं सुधीरची तंद्री भंगली.

'फार कठीण वाटतंय रे सुधीर... या बंगल्यात, या शहरात सारं आयुष्य गेलं आम्हा दोघांचं... आता संध्यासमयी परका देश, परकी जागा... कसे रुजणार आम्ही तिथे? पार एकटेपणा जाणवेल आम्हाला. नि इथले सारे बंध, साऱ्या आठवणी...'

‘वय झालं असलं तरी इथे बरंच काही करायचं होतं रे मला... अजून तुलाही खूप शिकवायचंय... तुझ्या मैफिलीला हजर राहायचंय...’

बोलता बोलता सर थांबले. सुधीरच्या डोळयातल्या पाण्याला त्यांच्या स्वरातली वेदना जाणवली नि मोत्यांची एक लड त्याच्याही पापण्यांना न जुमानता खाली निसटली.

आई मात्र शांत होत्या. नेहमीचा त्यांचा बोलकेपणा सरांकडे आला होता जणू...

सुधीरला आता मात्र तिथे थांबवेनाच. पेढ्यांचा डबा तसाच टेबलावर ठेवून तो उठला नि सरळ बाहेर पडला.

पाय नेतील तिथे भरकटत जात होता तो. डोक्यातलं विचारांचं काहूर काही शांत व्हायचं नाव घेत नव्हतं.

रात्री बराच वेळ तो जागाच होता. मग मात्र त्याच्या विवेकबुद्धीनंच त्याला भानावर आणलं.

'तसा विचार केला तर सरांनी नि आईंनी मुलांकडे जाणंच ठीक नाही का? आपण जाणूनबुजून परके. त्यांचं रक्ताचं नातं... त्यातून आयुष्याच्या संध्याकाळी मुला नातवंडांमधेच रमायला हवंय त्यांनी. आपल्या स्वार्थासाठी त्यांनी इथे एकटं कशाला रहायला हवं? आपणच समजावायला हवं त्यांना उद्या... म्हणजे हसत हसत, प्रसन्न मनानं जातील ते परदेशात. आपलं बासरीवादन काय... होईलच कसंतरी. सरांनी या चार वर्षात भरभरून दिलंय आपल्याला... त्या ठेवीच्या आधारावर सुरू ठेवू आपण आपली साधना...'

'अन आत्ता सरांना न आईंना जावंसं वाटत नाहीय ते उभा जन्म इथे घालवलाय म्हणून... पण मुलांच्या सोबतीत राहायला लागले की आपोआपच आनंदी होतील ते...'

हे नि असे कित्येक विचार-त्याच्या उदास मनाला उसनी का होईना उभारी द्यायला लागले तसा दोन दिवसांनी सुधीर आपणहूनच बंगल्यावर गेला.

'ये सुधीर, बरं नव्हतं का रे?'आईंनी विचारलं खरं... पण त्यांच्या डोळयात सारं काही जाणल्याचे भाव होते.

त्यादिवशीची शिकवणी संपल्यावर सरांनी त्याला मुद्दाम बसवून घेतलं.

‘सुधीर, आम्ही जायचं नक्की करतोय, पण सहा महिन्यांनी. या सहा महिन्यात तू संध्याकाळी पण यायचंस. संगीताच्या उपासनेला कितीही वेळ दिला तरी अपुराच... पण या सहा महिन्यात मी जमेल ते... जमेल तसं माझ्याकडचं जास्तीत जास्त तुला द्यायचा प्रयत्न करीन. येशील ना?’

‘जरूर येईन सर, पण माझ्याकरता... म्हणजे माझ्यासाठी तुम्ही तिकडे जाणं लांबवू नका... मी काय...’

त्याचं बोलणं सरांनी अर्ध्यावरच थांबवलं.

‘नाही रे, तसेही सहा महिने लागतीलच इथली सारी आवरासावर करायला... इतका मोठा व्याप आहे. तर तू येत जा. अन हो, रात्रीचं जेवणही इथेच बरं का...’

अन त्या दिवशीपासून सुधीरचं बासरीवादन पुन्हा जोमानं सुरू झालं. जणू स्वतःजवळचं सोनं लुटून देत होते सर त्याला... नि तोही आवेगानं ते दान पदरात पाडून घेत होता. ते सहा महिने सुधीरसाठी

स्वर्गीय आनंदाचे होते. अनुपम आमोदाच्या लाटांवर विहरत होता तो. किती शिकू नि किती नाही असं होऊन जायचं त्याला...

सोबत रात्रीच्या जेवणानंतर हिरवळीवर रंगणाऱ्या त्या तिघांच्या गप्पा... त्यात बऱ्याच घरगुती गोष्टीही सांगायचे सर नि आई त्याला...

यथावकाश बंगलाही विकल्या गेला. नवीन मालकाला ताबा मात्र सहा महिन्यांनीच द्यायचं ठरलं होतं.

सरांना परदेशी जायला पंधरा दिवस उरले तशी दोन्ही मुलंही आली. नातवंडांच्या किलबिलीनं बंगला गजबजून गेला. आता सर सुधीरला देवघराचं दार आतून बंद करून तिथे शिकवीत. त्याच्या शिकवणीत खंड पडू न द्यायची पुरेपूर काळजी आई नि ते घेत असत.

अन एक दिवस सुधीर बंगल्याहून रात्री येत नाही तोच शेजारी फोनवर निरोप आला की लगेच बोलावलंय. त्यादिवशी आईंची तब्येत थोडी बरी नव्हती. सर्दी खोकला जास्त झाल्यानं ताप वाढला नि न्युमोनियाची सुरुवात वाटतेय तेव्हा कदाचित

दवाखान्यात दाखल करावं लागेल असं डॉक्टरांनी सांगितलं होतंच. तेव्हा धावपळ करत सुधीर बंगल्यावर पोचला.

फाटक उघडतानाच त्याला शेजार पाजारचे लोक जमू लागलेले दिसले तसं त्याचं मन चरकलं. नेहमी समोर येणाऱ्या आईही व्हरांड्यात दिसल्या नाहीत तसं अशुभाच्या कल्पनेनं त्याचं काळीज थाड थाड उडू लागलं...

पण दिवाणखान्यात येताच त्याला दिसला सरांचा निष्प्राण देह. अगदी शांत झोपल्यासारखा. जणू तासा दीड तासांपूर्वी त्याला निरोप देतानाचं हसू चेहऱ्यावर कायम होतं. अशी'अखेरची आवरासावर' करून सर अनपेक्षितपणे दूर देशी निघून गेले होते. कधीही परत न येण्यासाठी.

भोवतालचे लोक'मेजर हार्ट अटॅक... डॉक्टरला आणायची संधीच मिळाली नाही'वगैरे बोलत होते. त्यात सुधीरला काही रस नव्हता. त्याचं भावविश्व कायमचं उध्वस्त झालं होतं. ते कशानं याला त्याच्या लेखी अर्थच नव्हता.

नंतरचे दहा बारा दिवस सुधीर एखाद्या वाईट स्वप्नासारखंच आयुष्य जगला. आईंचं सांत्वन करायला त्याच्यापाशी शब्द नव्हतेच. मनावर दगड ठेवून तो रोज बंगल्यावर येत असे. त्या वास्तूतल्या सरांच्या आठवणी, त्यांच्याबरोबर घालवलेले ने सोनेरी क्षण सारंकाही त्याच्या मनावर चरे उमटवत होतं आता. बासरी तर फडताळाच्या एका खणात पडून होती. तिला हातही लावावासा वाटत नव्हता त्याला.

आई नि मुलं निघायच्या दोन दिवस आधी सुधीरला एका दुपारी ऑफिसमधे फोन आला तसा मनाशी नवल करतच तो बंगल्यावर गेला.

सरांनी त्यांच्या मृत्युपत्रात त्याच्यासाठी काहीतरी ठेवलंय असं मोठा मुलगा म्हणाला तसा सुधीर आश्चर्यचकितच झाला. मुला सुनांच्या चेहऱ्यावर कुतूहल होतं. एकट्या आई मात्र सारंकाही माहीत असल्यासारख्या... चेहऱ्यावरच्या वेदनेतूनही किंचित हसल्या.

आत जाऊन त्यांनी एक निमुळती पेटी आणून सुधीरच्या हातात दिली.

आतल्या लाल मखमलीच्या कापडावर’ती’विसावली होती. सरांची बासरी.

नि शेजारीच मोगऱ्याचा सुकलेला गजरा...

एक क्षणभर काळ तिथेच थांबल्याचा भास झाला सुधीरला...

आषाढमेघ बरसून गेला होता. आपल्याजवळचं सारंकाही उधळून, तरीही रिता न होता गेला होता. आपल्या सुरांचा वारसा सोपवून गेला होता.

ती बासरीची पेटी एखाद्या अमूल्य खजिन्यासारखी छातीशी धरून सुधीर उठला. आईंच्या पायाशी वाकला नि वाहणारे डोळे पुसायचे कष्टही न घेता बाहेर पडला.

बंगल्याबाहेर पडताना आज त्याची पावलं जड नव्हती.

चांदणवेलीची फुलं अविरत बरसत होती... बरसतच राहणार होती.

# निर्णय

डोळ्यावरचं वर्तमानपत्र बाजूला करत नानासाहेबांनी मनगटावरच्या घड्याळाकडे बघितलं. चक्क सकाळचे अकरा वाजले होते. भिवानं आणलेला चहा समोरच्या टीपॉयवर ठेवल्या ठेवल्याच गार झाला होता. हलकीशी सायही जमून आली होती त्यावर. बाजूलाच एका बशीत सुबक चिरलेली फळं नि थोडा सुका मेवा होता. निरुत्साहानंच त्यांनी ती बशी बाजूला सरकावली नि तो गारढोण चहा तोंडाला लावला. एरवी असा चहा नजरेसमोरही येऊ दिला नसता त्यांनी... पण या सहा महिन्यात साऱ्याच गोष्टींच्या व्याख्या बदलल्या होत्या...

एक मोठा सुस्कारा टाकत त्यांनी दिवाणखान्यावर नजर फिरवली.

सुमित इंडस्ट्रीजच्या वैभवाच्या खुणा सगळ्या वस्तूंवर दिसत होत्या. मध्यभागी महागडा सोफासेट, खोलीच्या या टोकापासून ते त्या टोकापर्यंत पसरलेले मखमली गालिचे, जागोजागी विराजमान

झालेल्या छोट्या घडवंच्यांवर ठेवलेले उंची पुतळे, पुष्पपात्रं... नि हवेवर लहरणारे सुरेख पडदे...

या साऱ्या ऐश्वर्याला गालबोट लावल्यासारखं... खोलीच्या मुख्य भिंतीवर उदासवाणं दिसणारं सुमितचं... त्यांच्या थोरल्या मुलाचं छायाचित्र... चंदनी हार घातलेलं...

सुमितच्या हसऱ्या, रुबाबदार चेहऱ्यावरून मोठ्या कष्टानं नजर वळवीत त्यांनी भिवाला हाक दिली...

‘भिवा, अरे भिवा...’

आतल्या खोलीतून भिवा धावतपळतच आला.

‘काय मालक? च्या गरम करून आनू का?’

‘नको... सुनंदा काय करतेय?’

‘देवघरात हायेत... बलावू का?’

‘नको नको... जा तू...’

भिवा जरा अनिच्छेनंच मागे वळला.

नानासाहेब पुन्हा विचारात गढून गेले.

इतकं हसतंखेळतं घर... जणू कोणाचीतरी नजर लागावी तशी उलथापालथ झाली होती गेल्या सहा महिन्यात. नवीनच घेतलेल्या गाडीतून सहज फेरफटका मारायला म्हणून सुमित बाहेर पडतो काय नि कोपऱ्यावरच्याच मोठ्या वळणावर एक ताबा सुटलेला ट्रक त्याला उडवतो काय... ती वाईट्ट बातमी ऐकताच किंकाळी फोडून बेशुद्ध झालेल्या पत्नीचं सांत्वन करावं... की नातवाला छातीशी धरावं... की उरात दाटून येणारे उमाळे आवरावे... काहीच कळेनासं झालं होतं नानासाहेबांना.

हं... काय करावं हे अजूनतरी कुठे कळतंय आपल्याला? भरला संसार... नुकती चाळीशी ओलांडलेली पत्नी नि बारा वर्षांचा कोवळा सौरभ मागे सोडून गेला सुमित... नि कितीतरी प्रश्न अनुत्तरितच ठेवून गेला. गेल्या वीस वर्षात त्याच्या प्रयत्नानं केवढा विस्तार झाला होता कारखान्याचा...

नानासाहेब देशपांडे म्हणजे सुमित इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा... मोठं प्रस्थ... ऐन पंचविशीतल्या सुमितला... मोठ्या मुलाला हाताशी

घेऊन काढलेला कारखाना आता चांगलाच नावारूपाला आला होता. अनेक अवाढव्य उद्योग नि कारखान्यांत रूपांतर झालं होतं त्याचं...

नानासाहेबांना तीन मुलगे. थोरला सुमित... मधला सलील नि धाकटा संजय... पैकी फक्त सुमितच खऱ्या अर्थानं हाताशी आला होता त्यांच्या. मधला सलील कॉलेजमधे असल्यापासून संगीत विषयात रस घेणारा... नानासाहेबांच्या इच्छेविरुद्ध गाणं शिकला होता तो. तेव्हा खूप विरोध होता नानासाहेबांचा तरी जिद्दीनं संगीतातच करियर केलं होतं त्यानं... नि त्यात बऱ्यापैकी यशस्वीही झाला होता तो. मोठमोठ्या शहरात त्याचे कार्यक्रम होत... पेपरमधे फोटोही येत...

धाकटा संजय अमेरिकेतच उच्च शिक्षण घेत होता. त्याच्याकडूनही नानासाहेबांना फार आशा नव्हत्याच. आपण तिकडेच स्थायिक होणार असल्याचं त्यानं मागेच प्रामाणिकपणे नानासाहेबांना सांगितलं होतं. मुलं सगळीच उच्च विद्याविभूषित, सद्गुणी असली तरी एकट्या सुमितनंच व्यवसायाची धुरा सांभाळली होती.

अशात सुमितच्या अपघाती मृत्यूनं सगळ्याच स्वप्नांचा चुराडा झाला होता. नानासाहेब तर भान हरपल्यासारखंच वागत होते तेव्हापासून. त्यांची पत्नी... सुनंदा त्यामानानं लवकर सावरली होती. फक्त तिचं बोलणं मात्र कमालीचं आटलं होतं गेल्या काही दिवसात...

'ऐकलंत का...'

सुनंदा दारात उभी राहिली तसे केवढ्यानं दचकले नानासाहेब.

'काय म्हणतेस...'

स्वतःच्या आवाजातल्या यांत्रिकपणाने त्यांनाच कसंतरी झालं...

'कल्याणी माहेरी जायचं म्हणतेय काही दिवस...'

'कल्याणी?...'

काहीच न उमजल्यासारखे ते बघतच राहिले.

'हो... सौरभलाही घेऊन जायचं म्हणतेय...'

मनावरच्या दुखा:चे सारे पापुद्रे भराभर उलगडत जावे तसं काहीसं झालं नानासाहेबांना...

इतके कसे स्वार्थी झालोत आपण? त्या पोरीचा कसा विसर पडला आपल्याला? आपलंच दुखः कुरवाळत, पोसत बसलो... या सहा महिन्यात तिची काय अवस्था झाली असेल हा विचारही डोकावला नाही आपल्या मनात... गेल्या पंधरा वर्षात तिला सासरा असून बापाची माया दिली आपण... नि याच वेळी ती जबाबदारी कशी विसरलो?

वयाचं भान विसरून ते ताडकन उभे झाले. नि परत तसेच खाली बसले.

कोणत्या शब्दात सांत्वन करायचं पोरीचं? जमेल आपल्याला?

त्यांच्या मनातले विचार ओळखल्यासारखी पत्नी हळूच त्यांच्या शेजारी येऊन बसली.

‘किती दिवसांनी माणसात आल्यासारखे दिसताय तुम्ही.’

‘असं किती दिवस चालणार? अहो धीर धरावा लागेलच तुम्हाला. कारखान्यांचं कामही रेंगाळायला लागलंय आता... अन त्या पोरीशी बोला जरा... धीर द्या तिला. तुम्हीच असे हातपाय गाळून बसलात तर तिनं कुठे जायचं? आठवतं तुम्हाला... ती या घरात नववधू म्हणून आली तेव्हा तिला जवळ घेऊन तुम्ही म्हणाला होतात, ...’बेटा, तुझे वडील नाहीत असं यापुढे मुळीच वाटू द्यायचं नाही.’... नि आता तुम्हीच असे खचून जाता? तिच्याकडे तर बघवत नाहीय मला... कुठे मन गुंतवायचं त्या पोरीनं? सौरभसाठी उसनं अवसान आणून आयुष्य काढतेय ती...’

‘काय करू ग... सुमित सारा जीवनरसच सोबत घेऊन गेलाय माझा...’

नानासाहेबांच्या डोळयांतून आसवांची एक लड निखळली.

‘सगळं कळतं मला... पण असं होऊ द्यायचं नाही. अहो... जंगलातल्या हत्तींचा कळप... त्यातलं एक पिल्लू वाघ ओढून नेतो. पण दुखः करत बसायलाही सवड नसते त्या गजराजाला. बाकीच्या कळपाचं रक्षण जिवात जीव असेपर्यंत करायचं असतं त्याला... तीच भूमिका जगायची आहे तुम्हाला शेवटपर्यंत...’

नानासाहेबांनी पत्नीच्या हातावर अलगद आपला सुरकुतलेला हात ठेवला.

‘किती सोप्या शब्दात सगळं सांगते सुनंदा...’त्यांच्या मनात आलं...

‘का ग... कल्याणीच्या पुनर्विवाहाचं... म्हणजे बोलून बघायचं का?’

‘कालच बोलले मी तिच्याशी...’

सुनंदाचा चेहरा गंभीर होता.

‘तिनं ठाम नकार दिलाय. म्हणाली,’आता पुन्हा डाव मांडायची या वयात मला इच्छाही नाही नि गरजही नाही. सुमितच्या आठवणी नि सौरभचा भविष्यकाळ सोबत घेऊन पुढची वाटचाल करीन मी... या घरची सून म्हणून आले ते आता लेक म्हणून राहीन... इतकंच...’

‘मी बोलून बघू का?’

स्वतःच्या प्रश्नातला फोलपणा नानासाहेबांना ठाऊक होता. कल्याणीच्या निश्चयी स्वभावाची ओळख त्यांना यापूर्वीच कित्येकदा झाली होती.

मनाशी कसलासा विचार करत ते उठले.

‘ठीक आहे. रात्रीची जेवणं झाली की माझ्या स्टडीमधे ये तू... बोलू जरा आणखी...’

त्या रात्री नानासाहेब नि सुनंदाबाई कितीतरी वेळ स्टडीरूममधे बोलत होते. दिवा बराच वेळ जळत होता.

दुसऱ्या दिवशी तातडीने फोन करून नानासाहेबांनी दोन्ही मुलांना बोलावून घेतलं. सलील लगेच आला... संजय थोडा उशिरा... चार दिवसांनी.

संजय आल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी सुनंदाबाईंनी कल्याणीला तयार व्हायला सांगितलं. नानासाहेब मात्र सकाळपासून फोनवरच बोलत होते.

‘कुठे जायचंय आई?’

‘सांगते नंतर... जरा ती गुलाबी चंदेरी साडी नेस...’

कल्याणीनं जरा चमकूनच पाहिलं पण ती जास्त बोलायच्या मनस्थितीत नव्हती.

सगळं कुटुंब तयार झाल्यावर नानासाहेबांच्या आदेशाप्रमाणे ड्रायव्हरनं मोठी गाडी बाहेर काढली. गाडी कारखान्याच्या आवारात उभी झाली तसं कल्याणीला अजूनच आश्चर्य वाटलं...

सगळे मिळून नानासाहेबांच्या केबिनकडे गेले. केबिनचं दार नानासाहेबांनी ढकललं मात्र... आतल्या विशाल गोलाकार मेजाभोवती बसलेले कारखान्याचे इतर वरिष्ठ अधिकारी अदबीनं उभे राहिले.

गोंधळलेल्या कल्याणीला हाताशी धरून नानासाहेबांनी त्यांच्या खुर्चीजवळ आणलं.

‘ह्या माझ्या थोरल्या सूनबाई... आजपासून कारखान्याची जबाबदारी मी त्यांच्यावर सोपवली आहे. मी त्यांच्या पाठीशी

आहेच सदोदित... पण मला आपण सर्वांनी जो मान नि जे सहकार्य दिलंत ते त्यांनाही द्यावं ही माझी अपेक्षा आहे...’

बावरलेल्या कल्याणीनं सुनंदाबाईंकडे पाहिलं. त्यांच्या एका डोळ्यात हसू नि एका डोळ्यात आसू होते.

कल्याणी खुर्चीत बसली तसा सलील झटकन तिच्या पायाशी वाकला. संजयनंही त्याचंच अनुकरण केलं.

गेले सहा महिने झुकलेले नानासाहेबांचे खांदे आज पूर्वीसारखेच ताठ उभे होते.

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खरे न वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

आणि प्रगती म्हणजे केवळ ऐहिक समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com